- *झुंज : भाग १ -*

दुपारच्या वेळेस रावजी गडाच्या मुख्य दरवाजासमोर उभा राहिला. तो खूप दूर वरून रपेट करत आला असणार हे त्याच्या एकूणच अवतारावरून समजू शकत होते. काहीशा गडबडीतच त्याने घोड्यावरून खाली उडी टाकली. एकदा घोड्याच्या मानेवर थोपटले आणि दरवाज्याच्या दिशेने चालू लागला. त्याचा घोडाही धन्याच्या या अशा थोपटण्याने काहीसा शांत झाला. १५/२० पावलातच रावजीने दरवाज्यावर थाप मारली आणि परत काही पावले मागे येऊन उभा राहिला.

जास्तीत जास्त अर्धा मिनिट झाला असेल आणि दरवाज्याच्या वरच्या बाजूला असलेली छोटीशी झडप उघडली गेली. त्यातून एका व्यक्तीने डोकावून बाहेर पाहिले. त्याच्या नजरेच्या समोरच रावजी उभा असल्याने त्याने तिथूनच विचारले.

“कोन हाये?”

“म्या रावजी, किल्लेदारास्नी भेटायचंय.” रावजीने उत्तर दिले.

“काय काम हाये?” पुढचा प्रश्न विचारला गेला.

“त्ये किल्लेदारास्नीच सांगायचा हुकुम हाये.” रावजी उत्तरला आणि झडप बंद झाली. काही क्षणात परत ती उघडली गेली आणि पुढचा प्रश्न आला.

“कुन्कून आलायसा?”

“गडावरनं आलोय... राजांचा सांगावा घिवून.” रावजीने उत्तर दिले आणि परत झडप बंद झाली. काही वेळ गेला आणि साखळ्यांचे आवाज ऐकू आले. त्याच बरोबर मोठा लाकडी ओंडका सरकावल्याचा आवाज झाला. हळूहळू काहीसा आवाज करत दार उघडले गेले. तो पर्यंत रावजीने परत घोड्यावर बैठक मारली आणि तो दरवाजा पूर्ण उघडण्याची वाट पाहू लागला.

दरवाजा पूर्ण उघडला जाताच आतून चार पहारेकरी बाहेर येवून उभे राहिले. त्यांच्या मागून अजून एक जण बाहेर आला. कपड्यांवरून तो पहारेकऱ्यांचा अधिकारी वाटत होता.

“निशानी?” आल्या आल्या अधिकाऱ्याने काहीशा चढ्या आवाजात रावजीला विचारले. रावजीने आपल्या शेल्याला खोचलेली राजमोहोर बाहेर काढून अधिकाऱ्याच्या हातावर ठेवली. तिच्याकडे एकदा उलटसुलट निरखून पाहून त्याने ती निशाणी परत रावजीच्या हातात दिली आणि हातानेच दरवाजातून आत जाण्याची परवानगी दिली.

किल्लेदार त्याच्या निवडक अधिकाऱ्यांबरोबर सल्लामसलत करत मुख्य वाड्याच्या बैठकीत बसला होता. तेवढ्यात एक शिपाई त्यांच्या समोर आला आणि त्याने सगळ्यांना लवून मुजरा केला. किल्लेदाराचे लक्ष त्याच्याकडे जाताच त्याने इतर अधिकाऱ्यांना हातानेच थांबण्याचा इशारा केला.

“बोल रे..”

“माफी असावी सरकार, पन गडावरनं राजांचा सांगावा आलाय...” शिपाई किल्लेदाराच्या पायाकडे पाहत म्हणाला.

“आऽऽऽ राजांचा हुकुम? आरं मंग हुबा का? जा त्याला आत घीवून ये...”

घाईघाईतच किल्लेदाराने शिपायाला आज्ञा दिली आणि शिपाई माघारी वळला.

काही वेळातच रावजी किल्लेदारासमोर हजर झाला. आल्या आल्या त्याने किल्लेदाराला लवून मुजरा केला आणि मान खाली घालून उभा राहिला.

“काय हुकुम आहे राजांचा?” किल्लेदाराने रावजीकडे पहात प्रश्न केला.

“राजानं खलिता धाडलाय...” कमरेचा खलिता आदबीने काढून किल्लादारच्या हाती देत रावजी उत्तरला.

“अस्सं... गडावर समदं ठीक हाय नव्हं?” रावजीच्या हातून खलिता घेत किल्लेदाराने विचारले.

“व्हय जी...”

किल्लेदाराने खलिता वाचायला सुरुवात केली आणि हळूहळू त्यांच्या चेहऱ्यावरील भाव बदलू लागले. त्याच्या चेहऱ्यावर उमटलेली काळजी प्रत्येक तेरा वाचू शकत होता.

रामशेज किल्ला हा तसा जिंकायला अगदी सोपा वाटणारा. कुठल्याही दऱ्या किंवा सुळके आजूबाजूला नाहीत. फक्त एकच डोंगर. ज्यावर हा किल्ला बांधला गेला. त्याच्या चहुबाजूने पूर्ण पठार. वेढा द्यायचा म्हटला तर ५००० सैन्य देखील पुरेसे पडू शकेल असा किल्ला. सह्याद्रीच्या इतर किल्ल्यांप्रमाणे याला ना भव्यता, ना सौंदर्य. ना नैसर्गिक सुरक्षितता. काहीसा एकाकी. आणि अशा या एकाकी किल्ल्याकडे बादशहाची वाकडी नजर वळली होती. किल्ला लहान असल्याने त्यावर पुरेसा दारुगोळाही नव्हता. फौजफाटा आणि हत्यारे देखील अगदीच जेमतेम. आणि हेच मुख्य कारण होते किल्लेदाराच्या काळजीचे. संभाजी राजांनी जितके शक्य होईल तितकी कुमक पाठवली होती पण तरीही ती साठवायला जागाही पाहिजे ना? गडावर इनमिन ६०० लढवैये. काही स्त्रिया, वृद्ध आणि मुले.

“कोन रे तिकडे?” किल्लेदाराने आवाज दिला आणि एक शिपाई आत आला.

“याच्या राहन्याची, शिदोरीची यवस्था करा...” किल्लेदाराने हुकुम सोडला आणि रावजी मुजरा करून माघारी वळला.

किल्लेदाराने राजांचा निरोप सगळ्यांना सांगितला आणि यावर काय उपाय करावा याचे खलबत सुरु

*झुंज : भाग २ -*

औरंगजेब बादशहाचा दरबार खच्चून भरला होता. प्रत्येकजण आपापल्या हुद्द्याप्रमाणे बसलेला होता. तेवढ्यात द्वारपालाने हाळी दिली. बादशहाचे दरबारात आगमन झाले. आज बादशहा काहीसा खुशीत दिसत होता. तसेही आजकाल बादशहा नेहमीच खुश दिसत होता. त्याचे मुख्य कारण म्हणजे त्याचा सगळ्यात मोठा शत्रू शिवाजी महाराजांच्या निधनाची वार्ता त्याला समजली होती. ज्याच्यापुढे आपल्या मोठमोठ्या फौजा हतबल ठरल्या होत्या. ज्याने आपल्या प्रत्येक दक्षिण मोहिमेत अडसर निर्माण केला तो दख्खन का चुहा आपोआप मार्गातून बाजूला झाला होता. आणि म्हणूनच 'आल्लातालाची आपल्यावर मेहेर झाली आहे' असेच तो समजत होता. बादशहा गादीवर जाऊन बसला. त्याच्या पाठोपाठ त्याचे सगळे मानकरी, सरदार देखील आपापल्या जागी स्थानापन्न झाले आणि दरबाराच्या कामकाजाला सुरुवात झाली.

“शहाबुद्दीन खान...!” बादशाहने आपला मोर्चा शहाबुद्दीन खानाकडे वळवला.

“जी जहांपना...!” काहीसे उठत मान खाली घालून खानाने बादशहाला कुर्निसात केला.

“हमारा सबसे बडा दुश्मन कौन था?” आपली दाढी एका हाताने कुरवाळत बादशाहने प्रश्न केला.

“वो.., दख्खन का चुहा जहांपना...!” खाली मानेनेच खानाने उत्तर दिले. खानाचे उत्तर ऐकताच बादशहाच्या चेहऱ्यावर कुटील स्मित आले.

“अब तो वो नही है ना?” बादशहाचा पुढचा प्रश्न.

“नही जहांपना...!” खान फक्त विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देत होता. दरबारात पूर्ण शांतता होती. प्रत्येक जण बादशहा काय म्हणतोय हे कान देऊन ऐकत होता.

“तो फिर दख्खनके किले अभी हमारी सल्तनतमे क्यो नही है?” एकाएकी बादशहाचा आवाज चढला.

“हुकुम किजीये जहांपना. कुछ ही दिनोमे सारे किले अपनी सल्तनतमे शामिल होंगे.” खानाने आपली नजर वर उचलत आणि एक हात आपल्या तलवारीच्या मुठीवर ठेवत उत्तर दिले.

“ठीक है... जितनी भी फौज चाहो, तुम्हे मिल जायेगी..” बादशहा खुश झाला.

“गुस्ताखी माफ जहांपना...!” एक सरदार उठून कुर्निसात करत म्हणाला.

“बोलो... क्या बात है?” बादशहा काहीसा चिडला.

“जहांपना.. सिवा का बेटा संभा अपने बापसे दस कदम आगे है... आजतक हमारी फौजे उसको एक बार भी शिकस्त देनेमे कामयाब नही हुई है...” त्या सरदाराने खाली मानेनेच मनातील विचार बोलून दाखवला. मराठ्यांच्या छापेमारीने आणि पराक्रमाने हैरान झालेला बादशहा अजूनच भडकला. एक तुच्छ सरदार आपल्यापुढे आपलेच अपयश दाखवतोय हेच त्याला सहन होण्यासारखे नव्हते. पण राज्य टिकवायचे तर प्रत्येक गोष्टींचा विचार करणे हेही तितकेच महत्वाचे होते. त्यामुळे त्याने आलेल्या रागावर काहीसे नियंत्रण मिळवले पण चेहऱ्यावर आलेला संताप कुणापासूनही लपू शकला नाही.

“तो?” बादशहा काहीसा ओरडलाच.

“माफी जहांपना... पर संबाको शिकस्त देनी है तो पेहेले उसके मुलुखपर कब्जा करना पडेगा. अभी संबा रायगडपे है, हम गुलशनाबाद लेते है तो संबा अपने बीलसे निकलेगा, और हम आसानीसे उसे खात्म कर सकते है...!” सरदाराने आपला कुटील विचार बोलून दाखवला. हे ऐकून मात्र बादशहाचा संताप बराच कमी झाला. सरदाराने जे काही बोलला त्यात काहीच गैर नव्हते.

जोपर्यंत संभाजी सह्याद्रीच्या खोऱ्यात आहे तोपर्यंत त्याला शिकस्त देणे आपल्याला शक्य नाही हे बादशाह पक्के जाणून होता.

“ठीक है...!” बादशहा म्हणाला आणि सरदार खाली बसला. खान मात्र अजूनही उभाच होता. बादशहाने पुन्हा आपला मोर्चा खानाकडे वळवला.

“शहाबुद्दीनखान... तुम १० हजार की फौज लेकर गुलशनाबाद जावो. सबसे पहले वहां का सबसे छोटा किला रामसेज कब्जेमे लो. फिर त्र्यंबक, अहिवंत, मार्कंडा और साल्हेरपे आपना चांदसितारा लेहेरावो... अगर जरुरत पडे तो धोडपसे अलीवर्दीखान तुम्हे सहायता देगा.” बादशहाने हुकुम दिला.

“जी जहांपना...”

“रामसेज याद है ना? पेहेले भी तुमने कोशिश की थी, और खाली हाथ आए थे..!” बादशाहने खानाला मुद्दाम आठवण करून दिली. कारण जितका खान संतापेल तितका अधिक आक्रमक होऊन किल्ला लवकरात लवकर घेईल हेच बादशहा मानत होता.

“जी जहांपना..! पर तब बात अलग थी. अब बात अलग है. किलेपर कोई भी सरदार नही है. कोई नया किलेदार तैनात है. बहुत छोटासा किला होने के कारन वहां लोग भी ज्यादा नही है. और जो है उसमेभी बहोतसे बुढे और बच्चे है...!” संपूर्ण दरबारात बादशहाने आपल्याला खिजवले हे खानाला पसंत पडले नाही. त्याचा चेहराच ते सांगून जात होता.

“तो? कितने दिन चाहिये?” आपली मात्रा बरोबर लागू पडली हे पाहून खुश होत बादशहाने विचारले.

“सिर्फ एक दिन जहांपना... सिर्फ एकही दिनमे उसपर अपना चांदसितारा फडकेगा..!” खान आढ्यतेने म्हणाला आणि बादशहा खुश झाला.

“ठीक है, कलही १० हजार की फौज लेकर तुम निकलो.” बादशहाने हुकुम दिला आणि खान खाली बसला.

रायगडावर संभाजी राजे आपल्या मंत्रिमंडळाबरोबर मोहिमेची तयारी करत होते. तेवढ्यात एक दूत गुप्तहेराने पाठवलेला निरोप घेवून आला. बादशहाच्या दरबारात घडलेल्या सगळ्या घटना त्याने राजांच्या कानावर घातल्या. एकीकडे मुघल फौजांची एक तुकडी सह्याद्रीच्या खोऱ्यात धुमाकूळ घालत होती. त्यांचा बिमोड करण्यासाठी राजांना रायगड सोडता येणार नव्हता. बातमी तर खूपच गंभीर होती. नाशिक हातून जाणे म्हणजे स्वराज्याचे सगळ्यात मोठे नुकसान होणार होते. शेवटी सगळ्यांची चर्चा केल्यानंतर राजांनी रामशेजच्या किल्लादारासाठी एक खलिता पाठवला. त्यात जितका होईल तितका प्रतिकार करावा पण वेळप्रसंगी योग्य तो निर्णय स्वतःच घ्यावा असा निरोप पाठविण्यात आला.

हाच खलिता रावजी घेऊन आला होता.

*झुंज : भाग ३ -*

रामशेजचा किल्लेदार हा अगदी अस्सल मर्द मराठा. सहा साडेसहा फुट रांगडा गडी. पाहताक्षणी हा माणूस किमान १० जणांना तरी लोळविल हे कुणीही सांगू शकत होते. त्याच्या चेहऱ्यावर असलेला करारीपणा ठळकपणे उठून दिसत होता. त्याचा जरी दरारा किल्ल्यावर असला तरीही त्यात कुठेही भीतीची भावना नव्हती. प्रत्येकजण त्याचा आदरच करत होता. रामशेज गडावरील कुणीही अजूनपर्यंत त्याला विनाकारण चिडलेले पाहिले नव्हते. कितीही मोठा प्रश्न असेल तरी त्याच्या चेहऱ्यावर झळकणारी शांतता आजपर्यंत कधीही ढळली नव्हती. कोणताही निर्णय असो, छोटा किंवा मोठा, सगळ्यांना विश्वासात घेऊन आणि सगळ्यांशी सल्लामसलत करूनच घ्यायचा असेच त्याचे धोरण होते. आणि म्हणूनच गडावरील प्रत्येक जण किल्लेदारावर जीव ओवाळीत होता.

खलबत संपवून जेव्हा किल्लेदार माजघरात आला तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर काळजी स्पष्टपणे दिसत होती. किल्लेदाराच्या बायकोने यापूर्वी त्याला कधीही इतके काळजीत पाहिले नव्हते. किल्लेदारापुढे बोलायची हिम्मत तिच्यात नव्हती. काहीवेळ गंभीर शांततेत गेला. पण शेवटी तिने विचारलेच.

“काय सांगावा आलाय गडावरनं?” तिचा आवाज ऐकला आणि किल्लेदार काहीसा भानावर आला. तसे तिला सांगून किंवा न सांगून काही फरकही पडणार नव्हता. पण जर वेळ आली तर मात्र त्याला सगळ्यांचीच मदत घ्यावी लागणार होती. आणि म्हणूनच त्याने आपल्या बायकोला गरजेच्या गोष्टी सांगण्याचा निर्णय घेतला.

“बादशहाची वाकडी नजर हिकडं वळलीय..!” त्याने मोघम उत्तर दिले.

‘म्हंजी? म्या नाय समजले.” ती गोंधळली.

“राजानं खलिता धाडलाय. बादशहाची फौज येऊ ऱ्हायली. ज्ये शक्य आसंन त्ये करा.” हे बोलत असताना किल्लेदाराची नजर शून्यात होती.

तिच्या अंगावर सरसरून काटा आला. एकतर लहानपणा पासून तिने मुगल फौजांचा नंगानाच पाहिला होता. शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली आणि जनतेला चांगले दिवस आले. शिवाजी राजांच्या रूपाने देवानेच अवतार घेतला आहे अशी तिची ठाम समजूत होती. पण आता महाराज हयात नव्हते. जरी संभाजी महाराजांनी मोठ्या महाराजांचे कार्य आपल्या हाती घेतले होते तरीही यावेळेस ते मदतीला येऊ शकणार नव्हते. तसा खलिताही त्यांनी पाठवला होता. बादशहाबद्दल ज्या गोष्टी तिच्या कानावर आल्या होत्या त्यात एकही गोष्ट समाधानकारक नव्हती. जो बादशहा स्वतःच्या बापाचा, भावांचा झाला नाही तो जनतेचा काय होणार अशीच तिच्या मनाची समजूत होती. मध्येच बादशाहने त्याच्या मुलुखात जिझिया कर लावल्याच्या बातम्या येत होत्या. मुघल सैन्याने हिंदूंची मंदिरे, पवित्र स्थाने यांची तोडफोड आणि लुट केल्याच्या बातम्याही वरचेवर तिच्या कानावर येत होत्या. आणि त्याच बादशहाची फौज आपल्या गडावर चालून येते आहे म्हटल्यावर तिचे मन शहारले. ती जितके आपल्या नवऱ्याला ओळखत होती तितके तो कोणत्याही परिस्थितीत किल्ला मुघलांच्या ताब्यात सहजासहजी देणार नाही याची तिला पूर्ण खात्री होती. म्हणजेच युद्ध अटळ होते. आणि जेव्हा मुघल सैन्य युद्ध करून किल्ल्यात प्रवेश करेल त्यावेळेस त्यांच्यात आणि राक्षसात काहीच फरक असणार नाही, हेही ती जाणून होती. त्यामुळेच काय बोलावे हेच मुळी तिला सुचेना.

“तुला काय वाटतं?” एकाएकी किल्लेदाराने आपल्या बायकोला प्रश्न केला. त्याचा आवाज ऐकताच ती गोंधळली. काय उत्तर द्यावे तिला सुचेना. किल्लेदाराने परत तोच प्रश्न विचारला आणि आपल्याला उत्तर देणे भाग आहे हे ती समजून चुकली.

“म्या काय बोलणार? तुमी ज्ये काय ठरवलं आसंन त्येच करनार… पन म्या काय म्हन्ते, कितीबी मोठी फौज असुदे, आपन त्यास्नी जवर आपल्या जीवात जीव हाये तवर रोखायचं.” तिने उत्तर दिले आणि किल्लेदाराला आपल्या बायकोचा अभिमान वाटला.

“हंग अस्सं… आता कितीबी फौजफाटा असू दे… जवर ह्यो किल्लेदार जित्ता हाय तवर एक बी सैनिक हितं येऊ देनार नाई…!” किल्लेदाराच्या चेहऱ्यावर आता मात्र काळजीचे कसलेही चिन्ह दिसत नव्हते.

किल्ल्यावर आता धावपळ दिसत होती. काही वेळापूर्वीच किल्ल्यावर दवंडी फिरली होती. सगळ्यांना सर्यास्ताच्या वेळी वाड्यासमोरील पटांगणात हजर होण्यास सांगण्यात आले. हळूहळू प्रत्येक जण हजर झाला. जवळपास सगळे जमले आहेत याची खात्री करून किल्लेदाराने बोलायला सुरुवात केली.

“येक उल्शिक वाईट बातमी हाये. कालच्याला संबाजी राजांकडनं खलिता आलाय. त्यांनी सांगावा धाडलाय, बादशाची फौज आपला गड ताब्यात घ्यायला येऊ ऱ्हायली. चार सा दिसात समदी फौज हितं यील. फौज लैच मोठी हाये. धा बारा हजाराचा फौजफाटा हाये. संबाजी राजांनी आपल्यालाच निर्नय घ्यायचा सांगावा धाडलाय. आपन हितं ५००/६०० लोकं आन बादशाची फौज धा हजाराची, त्यात हत्ती, तोफा आन घोडेबी भरमसाट. युध केलं त किती दिवस आपला निभाव लागन आजच्याला सांगता येनार नाई. हारलो त लुटालूट हुईल. काय करायचं म्या ठरीवलं हाये पर एकडाव तुमचा इचार घ्येतलेला बरा.” आपले म्हणणे सांगून किल्लेदाराने सगळ्यांवर नजर टाकली. हळूहळू चुळबुळ वाढली. आवाजही वाढत गेला आणि त्यांच्यातून एकजण पुढे आला.

“किल्लेदार...! हुब्या आयुश्यात म्या कदी माघार घ्येतली नाई. म्याच काय पन ह्ये समदेबी माघार घीनार नाईत. ह्ये आपलं राज्य हाये. शिवाजी म्हाराजांच. त्यांनी आपल्यासाठी जीवाची पर्वा केली नाई आनी आता आपली बारी हाये. बादशाची फौज धा हजार असो वा पन्नास हजार. जवर जीवात जीव हाये तवर त्यास्नी येक पाऊल बी फुड टाकू द्यायचं नाई. तुमी फकस्त आज्ञा द्या. आई भवानीचं आशिर्वाद हाये आपल्यासंग. आपन लढायचं... हर हर महादेव...!” समोर आलेल्या तरुणाने आपले मत दिले आणि आसमंतात हर हर महादेवचा जयघोष घुमला. किल्लेदाराच्या अंगावर मुठभर मांस चढलं. ज्या रयतेच्या राजाला कित्येकांनी नीटसं पाहिलं देखील नव्हतं त्याचं राजासाठी प्रत्येकजण आपल्या प्राणाची आहुती द्यायला एका पायावर तयार होता.

काही क्षणातच किल्लेदाराचा चेहरा कठोर बनला. अंगात वीरश्री संचारली आणि त्याने घोषणा दिली.

“हर हर महादेव ! जय छत्रपती शिवाजी म्हाराज..!! जय छत्रपती संबाजी म्हाराज...!!!” त्याने घोषणा दिली आणि सगळ्यांच्याच अंगात एक नवे चैतन्य संचारले.

“ठरलं...! आता लढायचं. जवर जीवात जीव हाये तवर लढायचं.” किल्लेदार बोलत होता आणि एक म्हातारा पुढे आला.

“मला उल्शिक बोलायचं हाये...” त्याने किल्लेदाराकडे पहात म्हटले.

“बोला तात्या... काय हुकुम हाये आम्हास्नी?” किल्लेदाराने आदबीने विचारले.

“आपन लढायचं म्हनतो पन निस्त म्हनलं आन झालं असं ऱ्हातं व्हय? पराक्रम असला तरीबी काई गोष्टी आपल्याला आदीच करून ठीवाया लागतीन.” त्याने आपले वाक्य पूर्ण केले. किल्लेदारालाही हे पटले.

“म्या काय म्हन्तो, आदी पोटाचा इचार केल्याबिगर काय उपयोग नाई.” त्याने मुख्य मुद्दा उपस्थित केला.

“तात्या... आपल्याकडं दोन तीन वर्ष पुरलं इतका धान्यसाठा हाये.” किल्लेदाराने सांगितले.

“आरं पर अनुभवानं येक गोष्ट मला म्हाईत हाये. बादशाच्या फौजेनं येढा दिला मंग त्यो कितीबी दिस तसाच ऱ्हाईल. येकदा का आपलं धान्य संपलं मंग आपन युध न करता उपासमारीनं मरू. त्याचा काय उप्योग?” त्याने आपला विचार बोलून दाखवला आणि त्यावर किल्लेदार गंभीर झाला. गोष्ट विचार करण्यासारखीच होती. प्रत्येक गोष्ट तपासून पाहणे तितकेच गरजेचे होते. शेवटी त्यांने तात्यांनाच प्रश्न केला.

“तुमी म्हंता त्ये समदं बरुबर हाये. पन मंग?”

“म्या काय म्हन्तो, बादशाची फौज आजूक चार दिस त हितं येत नाई. तवर धा बारा जनांनी त्रंबकगडाकडं जावं. तितंल्या लोकास्नी रानवनस्पती आन कंद ठावं हायती. त्याची माहिती घीवून हितं यावं. ते कंद एकदा खाल्ली की मंग दोनदोन दिस कायबी खान्याची गरज पडत नाई. आपन त्याचा वापर करू.” तात्याने आपला विचार सांगितला आणि किल्लेदार खुश झाला.

त्याने लगेचच १० जणांची निवड करून त्यांना त्र्यंबकगडाकडे रवाना केले.

पुढचा प्रश्न होता तो प्रत्यक्ष लढाईचा. दोन वार आपण केले तर एकवार त्यांचाही झेलावा लागणार. शेवटी मानवी शरीर म्हटल्यावर जखमा होणारच. त्याने ताकद हळूहळू कमी देखील होणार. यावर काय उपाय करावा हाच किल्लेदारापुढे आता मोठा प्रश्न होता. इतक्या मोठ्या फौजेला आपण काही शेकडा लोकं कसे थोपवून धरणार? आणि एकाएकी त्याच्या डोक्यात विचार आला. समजा फौजेला किल्ल्यापर्यंत पोहचू दिलेच नाही तर? हाच विचार त्याने सगळ्यांपुढे मांडला आणि एकेक करत काही जण पुढे आले.

‘किल्लेदार... म्या दगड फोडून देतो. किल्ल्यावर लय साठा हाय बगा दगडांचा. आपन त्ये वरून टाकले तरी १०/१२ जन एकाच दगडात मरतीन.” रामा लोहार म्हणाला.

“आन म्या लाकडाची तोप करतू... पन त्यासाठी चामडं बी लागन...” तुका सुतार उत्तरला.

“आरं मंग म्या हाय ना. तू तोप बनव. चामडं म्या काढतो.” सदू म्हणाला आणि किल्लेदार आश्चर्यानं पहातच राहिला. संभाजी राजांनी पाठवलेला दारुगोळा तोफेविना काहीच कामाचा नाही असेच तो समजून चालत होता. पण मनात जिद्द असेल तर कोणतीच गोष्ट अशक्य नाही हेही त्याला हळूहळू समजत होते.

“म्या येक बोलू का?” जमलेल्या लोकांमधून एक पोरगं पुढं आलं. किल्लेदाराने आता पर्यंत प्रत्येक जण किती महत्वाचे योगदान देतो आहे हे पाहिले होते. आता हे लहानसं पोरगं काय सांगणार याचाच तो विचार करू लागला.

“हा बोल की...!” किल्लेदार कौतुकाने त्याच्याकडे पहात म्हणाला.

“आमी पोरं पिकांच राखन करन्यासाठी गोफन चालीवतो. येका दगडात येक पाखरू मारतो. त्येचा वापर केला तर? संग गलोरीबी हायेत.” त्याने आपला विचार बोलून दाखवला आणि जमलेल्या मंडळीत खदखद पिकली. एवढ्याशा गोफणीने आणि गलोरीने कुणी मरेल हा विचारच करणे तितकेसे योग्य वाटत नव्हते. लोकांना हसताना पाहून ते पोरगं काहीसं हिरमुसलं. किल्लेदार मात्र गंभीर झाला. गोफणीतून सुटलेला एक दगड जेव्हा वरून खाली जाईल तेव्हा त्याचा वेग आपोआपच वाढलेला असेल. तसेच दगड लागलेला माणूस स्वतःचा तोल सांभाळता न आल्याने खाली कोसळेल यात काहीच शंका करण्यासारखे नव्हते. गलोरीने एकेक जण टिपता येणार होता. मुलाच्या त्या विचाराने किल्लेदार अगदीच खुश झाला. त्याने मुलाला जवळ बोलावले. त्याच्या पाठीवर शाब्बासकीची थाप मारली आणि त्याचा विचार कसा उपयोगी आहे हे सगळ्यांना सांगितले. बरे गोफण फिरवायला आणि गलोरी वापरायला मुले, म्हातारे आणि स्त्रिया सगळ्याच सक्षम असल्याने हेच त्याने आपले प्रमुख हत्यार बनवले. किल्लेदाराच्या या निर्णयामुळे जे लोक प्रत्यक्ष युद्धात भाग घेऊ शकणार नाही असे वाटत होते तेही स्वराज्याचे शिलेदार बनले.

चार दिवसात लढाईसाठी ज्या ज्या गोष्टी गरजेच्या वाटत त्या सगळ्यांची पूर्तता करून किल्लेदार आणि त्याचे सगळे सैनिक बादशहाच्या फौजेची वाट पाहू लागले.

*झुंज : भाग ४ -*

राजांचा खलिता मिळून जवळपास आठ दिवस झाले होते. शहाबुद्दीन खान येताना शक्य होईल तितकी धार्मिक स्थळे उध्वस्त करत येत होता. त्याबरोबरच गरीब जनतेचे धर्मांतर करण्यास त्याने सुरुवात केली होती. जे लोक आपला धर्म सोडत नव्हते त्यांच्यावर अनन्वित अत्याचार चालू झाले होते. त्याच्या या कामात कित्येक हिंदू सरदारही बादशहाचा रोष आपल्यावर येऊ नये म्हणून त्याला मदत करत होते. या सगळ्याच बातम्या किल्लेदाराकडे रोजच येत होत्या. शहाबुद्दीनखान किती क्रूर आणि उलट्या काळजाचा आहे याची माहिती किल्ल्यावरही येऊन धडकत होती. आपली जर अशी कीर्ती गुलशनाबाद प्रांतात पसरली तर आपल्या भीतीने तेथील किल्लेदार लढाई करण्याच्या फंदात न पडता किल्ले आपल्या स्वाधीन करतील असेच त्याला वाटत होते. आणि ह्याच कारणाने त्याने येताना अशा गोष्टी आरंभल्या होत्या.

किल्ल्यावरील लोकांमध्ये मात्र अशा बातम्या ऐकून भीतीऐवजी त्याच्याबद्दल राग उत्पन्न होत होता. शेवटी तो दिवस उजाडला. खानाचा तळ किल्ल्याच्या पायथ्याशी पडला. किल्ल्यावरून जिकडे नजर जाईल तिकडे हिरवे झेंडे आणि कापडी तंबू दिसू लागले. खानाने आणलेली दहा हजाराची फौज आणि वाटेत त्याला सामील झालेली दोन हजाराची फौज असा बारा हजाराचा फौजफाटा किल्ल्याच्या पायथ्याशी जमा झाला. आल्या आल्या खानाने किल्ल्याला वेढा दिला. त्यामागे उद्देश हाच होता की यामुळे किल्लेदारावर दबाव येईल आणि तो स्वतःहून किल्ला आपल्या सुपूर्द करेल.

किल्ल्याला वेढा देऊन दोन दिवस उलटून गेले पण किल्लेदाराचा कोणताही दूत खानाकडे येण्याचे चिन्ह दिसेना. शेवटी खानानेच आपला एक दूत किल्ल्यावर पाठवायचे ठरवले. त्यासाठी एका मराठी माणसाची नियुक्ती करण्यात आली. मराठी माणसाची नियुक्ती करण्यामागेही खानाचा कुटील हेतू होता. कोणताही मुसलमान अधिकारी पाठवला असता तर त्याच्यावर किल्लेदाराने कितपत विश्वास ठेवला असता हे सांगणे कठीण होते. जर दूत मराठी असेल तर त्याच्यावर जास्त विश्वास ठेवला जाईल असेच त्याला वाटत होते. तसेच किल्लेदाराचे मन वळवण्याचा प्रयत्न फसला तरी दूत मराठी असल्याकारणाने त्याला कोणतीही इजा केल्याशिवाय परत पाठवले जाईल हेही खान चांगलेच जाणून होता. दूत जिंवत परत येणार म्हणजे किल्ल्यावर किती फौजफाटा आहे, आपल्याला किती प्रतिकार होऊ शकेल हे सगळेच त्याला समजणार होते.

तिसऱ्या दिवशी सकाळच्या वेळेस खानाचा दूत किल्ल्याच्या मुख्य दरवाज्यासमोर उभा राहिला. शिरस्त्याप्रमाणे पहारेदाराने दरवाज्याच्या झडपेतून त्याला विचारले.

“कोन हाये?”

“म्या सरदारांचा दूत हाये. किल्लेदारास्नी भेटायचंय. खानसायबांनी निरोप धाडलाय किल्लेदारासाठी.” दूताने आपले येण्याचे कारण सांगितले. एकटाच कुणी दूत असेल तर त्याला बेलाशक आत घ्या असा किल्लेदाराने आपल्या पहारेकऱ्यांना आधीच हुकूम सोडला असल्याने महाद्वाराला लागून असलेला एक छोटा दरवाजा उघडला गेला आणि दुताला त्याचा घोडा बाहेरच ठेवून आत घेण्यात आले.

दूत जसा छोट्या दारातून आत आला, त्याच्याकडून हत्यारे काढून घेतली गेली. त्याच्या डोळ्यांवर पट्टी बांधण्यात आली. त्याला एका घोड्यावर बसवण्यात आले आणि काही वेळातच त्याला किल्लेदारासमोर उभे करण्यात आले.

“डोळ्याची पट्टी काढा !” किल्लेदाराचा आवाज घुमला आणि दूताच्या डोळ्यावरील पट्टी उतरवली गेली. दूत एका काहीशा मोठ्या खोलीत उभा होता. खोलीच्या खिडक्यांवर पडदे टाकण्यात आले होते. समोरच किल्लेदार एका आसनावर बसला होता. त्याच्यापासून थोड्या दूर अंतरावर एक कारकून हाताची घडी घालून उभा होता. दोघेही दुताकडे रोखून पहात होते. दोघांच्या मनात काय विचार चालू आहे याचा काहीसा अंदाज घेण्याचा दूत प्रयत्न करत होता.

“बोल...! काय संदेश हाये?” किल्लेदाराने काहीसे दरडावून विचारले.

“जी...!” काहीसा भानावर येत दूताने आपल्या कमरेला खोचलेला खलिता किल्लेदारासमोर धरला. किल्लेदाराचा आवाज ऐकूनच त्याच्यापुढे बोलण्याची दूताची हिंमत झाली नाही. किल्लेदार जागेवरून मुळीच हलला नाही. अगदी चपळाईने कारकून पुढे आला. दूताच्या हातातील खलिता आपल्या हातात घेतला आणि तो आदबीने किल्लेदाराच्या सुपूर्द केला.

किल्लेदाराने खलिता हातात घेतला आणि नंतर काहीसा विचार करत परत कारकुनाच्या हाती देत त्यांनी त्यालाच तो वाचण्यास सांगितले. कारकुनाने खलिता मोठ्याने वाचण्यास सुरुवात केली.

-------------

किलेदार रामसेज,

बादशहा सलामत, आलमगीर औरंगजेब के हुकुमसे जितने जल्द हो सके, किला सरदार शहाबुद्दीनखान के सुपूर्द करे | किलेपर जितने भी लोग है वो, बादशहा सलामत की रयत होगी | आजसे उनको बादशहा सलामत को लगान देनी होगी | इनमे जितने भी काफर होंगे उनको अलगसे जिझियाकर देना होगा | अगर कोई इसे देनेसे इन्कार करेगा तो उसे बगावत मानी जायेगी और उसका सर कलम किया जायेगा | लेकीन अगर कोई इस्लाम कबूल करता है तो उसे जिझिया देनेकी जरुरत नही है | महान शहनशहा आलमगीर उसको अपनी फौजमे शामिल करेंगे | अगर किलेदार किला देनेसे इन्कार करता है तो किलेपर हमला किया जायेगा | उसे माफी नही मिलेगी | उसका सर कलम करके किलेके दरवाजेपर लटकाया जाएगा | अगर किलेदार राजीख़ुशीसे किला सरदारके सुपूर्द करता है तो उसपर बादशहा सलामत की रहम होगी | उसे अच्छासा इनाम दिया जाएगा |

सरदार शहाबुद्दीन खान |

सिपेसालर शहंशाह आलमगीर औरंगजेब ||

----------------

कारकून जसजसा खलिता वाचत होता, किल्लेदाराचा चेहरा लाल होत होता. दूत मात्र आता मनातून घाबरला होता. खलिता वाचत असताना त्याने मान खाली घातली होती. त्यातल्या त्यात समाधानाची गोष्ट फक्त एकच होती. किल्लेदार त्याच्याच धर्माचा होता. किमान त्याचा विचार करून तरी त्याला कोणतीही इजा झाल्याशिवाय तिथून बाहेर पडण्याची आशा होती. खलिता वाचून पूर्ण झाला आणि दूताने मान वर करून किल्लेदाराकडे पाहिले. किल्लेदाराच्या डोळ्यात अंगार फुलत होते. दुताला खानाने इतके पढवून पाठवले होते पण किल्लेदारापुढे बोलण्याची त्याची हिंमतच झाली नाही.

“ठिक हाये, तुज्या खानाला निरोप सांग. ज्ये काय करायचं असंल त्ये कर, पर ह्यो किल्लेदार जवर जित्ता हाये तवर किल्ल्यावर तुजी सावली सुदिक पडायची नाई. आन ह्ये बी सांग, तुज्या त्या बादशाला वळखत नाई आमी. आमचा राजा येकच हुता. शिवाजी राजा आन आता संबाजी राजा आमचा राजा हाये. जा... ह्योच निरोप दे खानाला.” इतके बोलून किल्लेदार उठून उभा राहिला.

“ए कोन हाय रे, याचे डोळे बांधा आन याला सलामत किल्ल्याच्या भायेर काढा. दगाबाजी करायला आमी काय बादशा नाई.” शेवटचे वाक्य किल्लेदाराने मुद्दामच उद्गारले होते. एकजण धावतपळत आत आला. त्याने दूताचे डोळे बांधले आणि त्याला सुखरूप किल्ल्यातून बाहेर पाठवले.

दूताने आणलेला निरोप ऐकून शहाबुद्दीन खान पुरता चवताळला. त्याने जितकी माहिती मिळवली होती त्यानुसार किल्ल्यावर जास्तीत जास्त ८०० माणसे होती. त्यातही मुलांचा, वृद्धांचा आणि महिलांचा समावेश. म्हणजे लढणारे सैनिक असतील तर ते पाचशेहून अधिक नसणार हाच त्याने मनाशी विचार केला. आणि त्या पाचशे लोकांच्या जीवावर किल्लेदार आपल्याला असा संदेश पाठवतो हेच मुळी त्याच्या डोक्यात शिरत नव्हते. आपल्या माणसांचा विचार न करणारा किल्लेदार नक्कीच वेडा असावा असा त्याचा समज झाला. वेड लागल्याशिवाय का कुणी बारा हजाराच्या फौजेशी फक्त ५०० लोक घेऊन लढाईची गोष्ट करेल? बरे १२ हजार फौजही कुणाची? तर ज्याने आपल्या साम्राज्याचा विस्तार अफगाणिस्तानपर्यंत वाढवला त्या आलमगीर शहंशहाची. ५०/६० तोफा, मुबलक दारुगोळा आणि कसलेले शिपाई असलेली फौज कुठे आणि ५०० सैनिक कुठे. आणि म्हणुनच दूताने आणलेल्या संदेशावर विश्वास ठेवणे त्याला अवघड जात होते.

आजपर्यंत त्याने बादशहाच्या अनेक मोहिमेत हिरीरीने भाग घेतला होता. कित्तेक मोहिमा त्याने फत्ते केल्या होत्या. कित्येक जण तर त्याच्या क्रौयाच्या कथा ऐकूनच युद्ध न करता शरण आलेले होते. बघता बघता त्याचा चेहरा तापला.

“कौन है बाहर?” त्याने मोठ्याने आवाज दिला आणि एक शिपाई अगदी धावतपळत तंबूत आला.

“जाव जल्दी और मानेको बुलाव..!” त्याने हुकुम सोडला.

काही वेळातच त्याचा हेर त्याच्या पुढ्यात उभा होता.

“कितने लोग बताये तुमने किलेपर?” त्याने दरडावून विचारले. आडदांड शरीराचा संतापलेला खान त्याच्या हेराला मूर्तिमंत यमदूत भासला.

“सब मिलाकर ८०० लोग ही होंगे सरदार…!” हेराने घाबरत उत्तर दिले.

“और बताव…!”

“उनमे बुढे, बच्चे और औरतेभी है, किलेपर एक भी तोप नही है. आमनेसामने की लढाई होती है तो वो आधा दिन भी नही टिक पायेंगे.” हेराने जे आधी सांगितले होते तेच परत सांगितले. हे ऐकताना सरदाराची नजर हेरावर खिळली होती. हेर आपल्याशी खोटे तर बोलत नाहीना याचीच खान खात्री करून घेत होता.

“ठीक है, जाव…! और सिपाई को अंदर भेजो.” म्हणत खानाने त्याला आज्ञा दिली.

*झुंज : भाग ५ -*

खानाच्या तंबूत त्याच्या सह एकूण ६ जण मसलत करत होते. किल्लेदाराकडून आलेला निरोप खानाच्या अगदी जिव्हारी लागला होता. युद्ध तर अटळ होते. पण इतक्या दिवसात खानाला मराठ्यांच्या युद्धकलेची चांगलीच ओळख झालेली होती. आणि त्यामुळेच तो प्रत्येक गोष्ट सावधगिरीने करत होता. तसे पाहिले तर एका नजरेत भरणारा किल्ला घ्यायला कितीसा वेळ लागणार? त्यातून त्याच्या आजूबाजूला दऱ्याखोऱ्याही नाहीत. गडावर देखील काहीशे माणसे. शस्त्रसाठाही तिथे कितीसा असणार? आणि तरीही त्याचे मन काहीसे साशंक होते. म्हणूनच त्याने किल्ल्यावर चढाई करण्यापूर्वी आपल्या अधिकाऱ्यांशी मसलत करण्याचा निर्णय घेतला होता. प्रत्येक जण आपापले मत मांडत होता पण एकमत होत नव्हते. शेवटी बऱ्याच वेळाने एक हजाराच्या फौजेनिशी हजारीने किल्ल्याच्या मुख्य दरवाजावर हल्ला चढवावा. आणि किल्ला ताब्यात घेऊन किल्लेदाराला कैद करून खानापुढे हजर करावे असे ठरले. खानालाही ही योजना पसंत पडली. एकतर त्याने दोन गोष्टी साध्य होणार होत्या. जे नुकसान होणार होते ते युद्धाच्या मानाने खूपच कमी असणार होते. आणि दुसरे म्हणजे ज्या किल्लेदाराने आपला हुकुम मानण्यास नकार दिला, त्याला कैद करून खानाचा अभिमान सुखावणार होता.

सकाळ झाली तसे हजारीने आपले सैन्य गोळा केले. जवळपास अडीचशे घोडेस्वार आणि साडेसातशे पायदळ गडाच्या पायथ्याशी जमा झाले. प्रत्येक जण हा कसलेला योद्धा होता. आजपर्यंतच्या अनेक लढायांमध्ये त्यांनी आपले शौर्य गाजवलेले होते. राजपुतांना पाणी पाजून आलेली सेना या छोट्याशा गडावर चाल करून जाणार होती. समोरासमोर लढाई सुरु झाल्यावर जास्तीत जास्त दोन तीन घटकेतच गड काबीज करून किल्लेदाराला खानापुढे हजर करू अशी शेखी हजारी मिरवत होता. स्वराज्यातील इतर गडांच्या तुलनेत या गडाची चढाई म्हणजे अगदीच किरकोळ म्हणता येण्यासारखी होती. चढणीचा रस्ता जरी लहान होता तरी चढण अगदीच अंगावर येणारी नव्हती.

सगळे सैन्य जमले आहे याची खात्री झाल्याबरोबर हजारीने सुरुवात केली.

“महान शहंशाह आलमगीर के सिपाहियो... आजतक आप जिस जंगमे उतरे हो, सिर्फ फतेह हासील की है, खुद आलमगीर शहंशाह को भी आपपर विश्वास है... और इसी विश्वास को आपको फिरसे साबित करना है... ये किला तो बहुत ही छोटासा है. आपके सामने ये आधे दिन भी टिक नही पायेगा... तो चलो, लेलो उसको अपने कब्जेमे. फेहेरावो उसपर चांदसितारा... काफिर किलेदार को जहन्नूम का रास्ता जो भी दिखायेगा उसे बादशहा खुद इनाम देंगे... अल्ला हु अकबर...” हजारीने केलेल्या वीरश्रीयुक्त भाषणाने प्रत्येक शिपायाच्या अंगावर मुठभर मास चढले. प्रत्येकाचे मन युद्धासाठी तयार झाले. आसमंतात ‘अल्ला हु अकबर’ चा स्वर निनादू लागला. मुघल सेनेच्या तुकडीने गडाच्या दिशेने कूच केले. हजार शिपायांचा तांडा छोट्याश्या किल्ल्याची धूळधाण करण्यासाठी सज्ज झाला होता. ‘अल्लाहु अकबर’च्या घोषणा गगनाला भिडत होत्या.

इकडे किल्ल्यावर मात्र अगदी पूर्ण शांतता पसरली होती. ना कोणता आवाज येत होता ना कोणती हालचाल दिसून येत होती. मुघल सैन्याच्या प्रत्येक शिपाई वर पहात गड चढत होता. किल्ल्यावरून काहीच आवाज होत नसल्यामुळे किल्लेदार आणि किल्ल्यावरील सैन्य पुरते घाबरले असून लढाई न करताच किल्ला आपल्या ताब्यात येणार याची जवळपास खात्रीच प्रत्येक सैनिकाला झाली होती. आणि याच आनंदात त्यांचा गड चढण्याचा वेग वाढला. सगळीकडे अल्ला हु अकबरच्या घोषणेबरोबरच धुळीचे लोट आसमंत झाकोळून टाकत होते.

मुघल सैन्याच्या तुकडीने जवळपास अर्ध्यापेक्षा जास्त डोंगर चढला आणि एकाएकी ‘हर हर महादेव’ चा जयघोष आसमंतात घुमला. हा जयघोष इतका मोठा होता की एक हजार माणसांच्या अल्ला हु अकबरच्या घोषणा देखील त्यापुढे कमजोर वाटू लागल्या. एकाएकी किल्ल्याच्या तटबंदीवर अनेक लोकं दिसू लागले. किल्लेदार घाबरून किल्ला आपल्या सुपूर्द करेल ही त्यांच्या मनातला विचार क्षणार्धात मावळला. काही वेळ होतो न होतो तोच ढगांचा गडगडाट व्हावा तसा आवाज ऐकू येऊ लागला. सोबत वरून धुळीचे लोळ पायथ्याच्या दिशेने झेपावू लागले. काय होते आहे हे लवकर हजारीच्या लक्षात देखील आले नाही. आणि जेव्हा त्याच्या लक्षात आले तेंव्हा वेळ निघून गेली होती. अनेक मोठमोठ्या शिळ्या त्यांच्या रोखाने गडगडत येत होत्या. त्यांचाच गडगडाट आसमंत भेदून राहिला होता. खानाच्या सैन्याला आता माघार घेणेही शक्य नव्हते. पुढे जावे तर वरून दगड धोंड्यांचा पाऊस. मागे फिरावे तर जागेचा आभाव. आणि पहिला धोंडा सर्वात पुढे असलेल्या शिपायांवर आदळला. ५/६ जण तर त्याखालीच चिरडले गेले. त्यांच्या तोंडून आवाजही फुटू शकला नाही. तो धोंडा मात्र त्याच्या मार्गात

येणाऱ्या जवळपास पंचवीस तीस सैनिकांना स्वर्गाचा रस्ता दाखवूनच थांबला.

एकामागोमाग एक शिळा वरून खाली झेपावत होत्या. एक धोंडा चुकवावा तर दुसरा धोंडा समोर येत होता. त्याला चुकवावे तर त्याच्या धक्क्याने कोसळणारा सैनिक अंगावर येत होता. खानाच्या सैन्यात आता मात्र हाहाकार माजला. 'अल्लाहू अकबर' घोषणेची जागा किंकाळ्यांनी घेतली. जो तो वाट फुटेल तिकडे पळत सुटला. त्यातही कित्येक जण फक्त तोल सावरता आला नाही म्हणूनही आपला जीव गमावून बसले. सैन्याच्या या तुकडीचे नेतृत्व ज्या हजारीकडे होते तो तर कधीचाच आडवा झाला होता. जिकडे पाहावे तिकडे प्रेतांचा खच पडला होता. अगदी काही वेळातच खानाच्या १००० फौजेची पूर्ण वासलात लागली. आसमंत मुघल सैन्याच्या किंकाळ्या आणि गडावरील मराठा सैन्यःच्या शिवाजी महाराज आणि संभाजी महाराजांच्या जयकाराने दणाणून गेला.

खानाचे सैन्य मागे फिरले हे जेव्हा किल्लेदाराने पाहिले त्यावेळेस त्याने लगेचच आपल्या लोकांना इशारा केला. त्याबरोबर गडावरून टाकण्यात येणाऱ्या दगडांचा पाऊस देखील पूर्णतः थांबविण्यात आला. गडावर एकच उत्साह संचारला होता.

चढाईवर गेलेल्या सैन्याच्या तुकडी मधील अगदी बोटांवर मोजता येतील इतकेच लोकं सुखरूप परतले. जवळपास साडेतीनशे लोक कायमचे जायबंदी झाले. चारएकशे लोकं प्राणास मुकले तर दोनशे लोकं किरकोळ जखमी होऊन परत फिरले. अडीचशे घोडेस्वारामधील एकही व्यक्ती सुखरूप नव्हता. बरेच जण तर त्यांच्याच घोड्यांच्या पायाखाली तुडवले गेले होते. जवळपास १०० घोडे कायमचे जायबंदी झाले होते. आणि उरलेल्या घोड्यांपैकी कित्येक वाट फुटेल तिकडे पळून गेले होते.

खानासाठी हा सगळ्यात मोठा धक्का होता. सगळ्यात जास्त संताप त्याला या गोष्टीचा होता की, आपली १००० लोकांची फौज जाऊनही किल्ल्यावरील एकाही माणसाला साधी जखमही करू शकली नव्हती. किल्ल्यावरील लोकांचे मनोधैर्य चौपट वाढले होते, तर खानाच्या फौजेचे मनोधैर्य निम्म्याने कमी झाले होते. त्यातही पोटार्थी सैनिक आणि स्वराज्याच्या ध्येयाने लढणारे सैनिक यात फरक होताच की. शेवटी पूर्ण पंधरा दिवसांचा आराम करून नंतर परत नव्या जोमाने किल्ल्यावर आक्रमण करण्याचे खानाने ठरवले. पण या दिवसात किल्ल्याला दिलेला वेढा मात्र अजूनच सक्त करण्यात आला.

इकडे गडावर मात्र आनंदी वातावरण होते. मुघल फौज कितीही संख्येत आली तरी आपण तिला तोलामोलाची टक्कर देऊ शकतो हे प्रत्येक व्यक्तीच्या मनावर पूर्ण ठसले होते. किल्लेदारही सगळ्यांच्या पाठीवर शाब्बासकीची थाप देत होता. त्याच बरोबर अगदी दिवस रात्र त्याचा किल्ल्यावर वावर होत होता. गेल्या पंधरा दिवसात खानाच्या फौजेने कोणत्याही प्रकारे आक्रमण केलेले नसले तरी त्याचा तळही हलला नव्हता. म्हणजेच आज ना उद्या परत आपल्यावर आक्रमण होणार हे किल्लेदाराला चांगलेच उमजले होते.

खानाच्या तंबूत रोजच खलबते होत होती. आक्रमणाच्या अनेक नवनवीन योजना समोर येत होत्या. पण त्यातील कोणतीच योजना खानाला भरवशाची वाटत नव्हती. आता तो चांगलाच सावध झाला होता. विचार करता करता त्याला एक योजना सुचली. १ हजाराची फौज एकाच बाजूने गेली आणि त्यामुळे त्यांना पराभव पत्करावा लागला. एकाच वेळी कमी लोकांसह जर किल्ल्याच्या सगळ्याच बाजूने चढाई सुरु केली तर? नुकसानही कमी होईल आणि किल्ला काही वेळातच ताब्यात येईल. त्याचा विचार त्यालाच पसंत पडला. आपण आधीच हा विचार का केला नाही म्हणून तो स्वतःवरच चरफडला.

काही वेळातच फौजेचे मुख्य सेनानायक त्याच्या तंबूत हजर झाले. त्याने आपली योजना सगळ्यांना बोलून दाखवली. परिस्थितीचा विचार करता सगळ्यात योग्य अशीच ती योजना होती. फौज विखुरलेली असल्यामुळे आता वरून गडगडत येणारे दगड चुकवणे त्याच्या सैनिकांना सोपे जाणार होते. नुकसानही अगदीच कमी होणार होते. खान चांगलाच खुश झाला. पाहिजे तितकी सावधगिरी न बाळगल्यामुळे आपली एक हजाराची फौज हकनाक कमी झाली याची त्याच्या मनात असलेली खंत आता कुठल्या कुठे पळाली.

*झुंज : भाग ६ -*

खान यावेळेस मात्र कोणतीही घाई करण्याच्या मनस्थितीत नव्हता. तसेच तो कोणत्याही परिस्थितीत किल्लेदाराला हलक्यात घेणार नव्हता. तसेही जो किल्लेदार आपल्या माणसांना साधी जखमही होऊ न देता एक हजाराची फौज परतवून लावू शकतो त्याच्या कल्पकतेला दाद देणे खानाला क्रमप्राप्तच होते. हाच विचार करत गेल्या १५ दिवसांपासून खान नीट झोपू देखील शकला नव्हता.

“हुजूर...” द्वारपालाचा आवाज आला आणि खानाची तंद्री भंग पावली... त्याने एकवार हुजऱ्याकडे पाहिले. तो खाली मान घालून उभा होता.

“आ गये सब?” खानाने विचारले.

“जी हुजूर...”

“अंदर भेजो...” हुजऱ्याला आज्ञा देत खान आपल्या जागेवर जाऊन बसला. काही वेळातच ७/८ जण खानाच्या शामियान्यात शिरले.

“बैठो...!!!” खानाचा हुकुम होताच प्रत्येक जण आपापल्या मानाप्रमाणे आसनस्थ झाला.

“करीमखान... इससे पेहेले हमे शिकस्त क्यो झेलनी पडी?” खानाने एकदम मुद्द्यालाच हात घातला.

“सरदार... मुझे इसकी सिर्फ एक वजह दिखती है... हमारी फौज सिर्फ एक तरफ थी...” काहीसे बिचकत करीमखान उत्तरला.

“बराबर...! लेकीन आज हम वो गलती नही करेंगे... आज शामतक किलेपर अपना चांदसितारा फडकेगा...” खान आढ्यतेने म्हणाला आणि सगळ्यांनी त्याच्या सुरात सूर मिसळला.

“करीमखान... तुम चारसौ लोग लेकर सामनेसे जाओगे... दौलतखान... तुम पाचसौ लोग लेकर पिछेसे हमला करोगे... देशमुख... तुम जंगलकी तरफसे पाचसौ सिपाई लेकर हमला करोगे और नाईक पाचसौ सिपाई लेकर जंगलकी दुसरी तरफसे हमला करेगा... एक बात सबको याद रखनी है... हर एक सिपाई दो तीन गज की दुरी बनाकर ही आगे बढेंगे.” खानाने आपली योजना सांगितली. “बहोत बढीया सरदार... आज शाम या तो किलेदार आपके सामने होगा या उसका सर...” करीमखान म्हणाला आणि बाहेर पडला. त्याच बरोबर इतर सर्वजण देखील बाहेर पडले.

किल्ल्याच्या तटावरून पाहणी करणाऱ्या किल्लेदाराला आज खानाच्या फौजेमध्ये जरा जास्तच हालचाल दिसत होती. त्याचाच अर्थ आजच पुन्हा आपल्यावर आक्रमण होणार हे त्याने ओळखले. पण एक गोष्ट मात्र त्याला विचार करायला भाग पाडत होती. आणि ती म्हणजे त्याला कोणत्याही बाजूला खानाची फौज एकवटलेली दिसत नव्हती. याचाच अर्थ खानाने यावेळेस आक्रमण करण्यासाठी नवीन योजना आखली होती. एकाएकी त्याच्या मनात विचार आला. नक्कीच आपल्या किल्ल्यावर चहुबाजूने हल्ला करण्याचा खानाचा विचार असणार. पाहता पाहता किल्लेदार गंभीर झाला. कारण मोठ्या संख्येने जर चहुबाजूने आक्रमण झाले तर मात्र आपला निभाव लागणे कठीण आहे हे त्याने जाणले.

काही वेळातच मुगल सैन्याने चारही बाजूंनी डोंगर चढायला सुरुवात केली. यावेळेस सैन्य जास्तच होते, तसेच ते विखुरलेले होते. प्रत्येक सैनिक हा एकमेकांपासून बरेच अंतर राखून वर चढत होता. आता जर किल्ल्यावरून दगड लोटले तरीही ते चुकवणे त्यांना शक्य होणार होते आणि हाच सगळ्यात मोठा धोका किल्लेदाराने ओळखला.

गनीम तर अगदी तयारीने पुढे येत होता. परत एकदा अल्लाहू अकबरचा स्वर गगन भेदत जवळजवळ येत होता. यावर काहीतरी उपाय लवकरात लवकर करणे किल्लेदाराला गरजेचे होते आणि त्याचे डोळे चमकले. त्याने लगेचच आपल्या लोकांना आवाज दिला. अनेक उमदे तरुण त्याच्यापुढे हजर झाले.

“जी किल्लेदार...!” त्यातील एकाने आदबीने विचारले.

“आपले पोरं हाय नव्हं, त्यास्नी बोलवा.” किल्लेदाराने आज्ञा केली आणि काही वेळातच सगळे पोरं किल्लेदारासमोर हजरझाले.

“काय रे पोरांनो… आपल्या राज्यासाठी लढनार ना?” काहीसे हसत त्याने विचारले आणि सगळ्यांनी एकमुखाने होकार दिला.

“मंग आता असं करायचं. तुमची ती पाखरं मारायची गलोरी हाय नव्हं. ती घ्यायची आन या येनाऱ्या गनिमावर तानायची. एकेकाला टिपायचा. जवर त्यो कोसळत नाई तवर त्याला सोडायचं नाई… काय?” किल्लेदाराने आज्ञा दिली आणि पोरांना आनंद झाला. आज खऱ्या अर्थाने ते स्वराज्यासाठी, आपल्या संभाजी राजांसाठी प्रत्यक्ष युद्धात भाग घेणार होते.

“आन हा… ज्या कुनाला गोफन चालविता येते त्यांनी बी या पोरास्नी मदत करायची. ध्यानात ठिवा… येक बी मानुस नाय सुटला पायजेल.” किल्लेदाराने हुकुम सोडला. मुलांच्या बरोबरीने बायकाही युद्धात सामील झाल्या. सगळेजण किल्ल्याच्या चहूबाजूंनी तटावर आले आणि गोफण फिरायला सुरुवात झाली.

गनीम बराच पुढे आला होता. आपल्या माराच्या टप्यात येताच गलोरीतून एक छोटा दगड सुटला. एक सैनिक वर पहात पुढे येत होता. तो बरोबर त्याच्या नाकावर बसला. त्या छोट्याश्या दगडाला इतका वेग आलेला होता की त्या सैनिकाचे नाक फुटले. वेदनेने विव्हळत तो खाली वाकला आणि त्याचा तोल गेला तसा तो खाली कोसळला. बाकी सगळे काम उताराने चोख बजावले. दगडांवर ठेचकाळत जो जेव्हा थांबला तेंव्हा त्याच्या शरीरातून प्राण कधीच निघून गेले होते.

“हंग अस्सं… भले शाब्बास…!!!” किल्लेदाराने त्या मुलाला शाब्बासकी दिली आणि त्या चिमुरड्याची छाती अभिमानाने फुगली. हळूहळू गोफणीतून एकेक दगड सुटू लागला आणि वर येणारा एकेक जण खाली कोसळू लागला.

खान आपल्या काही निवडक लोकांसह चहुबाजूने आपल्या फौजेवर नजर ठेवण्यासाठी फिरत होता. जसजशी त्याची माणसे एकेक करून कोसळू लागली, तो पुरता चवताळला. या वेळेस वरून एकही मोठा दगड गडगडला नव्हता. आणि तरीही एकेक जण टिपला जात होता. आता मात्र डोंगर चढणाऱ्या सैनिकांचा धीर हळूहळू सुटत चालला. आपल्या बरोबर असलेला माणूस फक्त ओरडतो आणि कोसळतो इतकेच त्यांना दिसत होते. ना त्यांच्यावर एखाद्या शस्त्राचा वार ना रक्ताचे पाट. आणि तरीही एकेक करून वर चढणारे सैन्य कमी कमी होत होते. या वेळीही कित्येक जण किल्ल्याच्या अर्ध्या डोंगरावरच जायबंदी झाले. आता मात्र जीव वाचवायचा तर माघार घेणेच जास्त गरजेचे होते. माघारी पळून जाण्याशिवाय त्यांना पर्याय होताच कुठे?

आपले सैन्य माघार घेते आहे हे काही वेळातच करीमखानाच्या लक्षात आले. परत फिरणे म्हणजे स्वतःचा मान कमी करून घेणे होते. त्याने आपल्या घोड्याला टाच दिली आणि तो सगळ्यात पुढे झाला. वरून होणारा दगडांचा मारा बिलकुल कमी होत नव्हता. पण करीमखानाला मात्र आता कशाचीच फिकीर नव्हती. त्याला फक्त एकच गोष्ट दिसत होती, आणि ती म्हणजे कसेही करून किल्ल्यावर विजय मिळवायचा. त्याच्या पाठोपाठ पन्नास एक जणांनी आपले घोडे भरधाव फेकले. किल्लेदार हे सगळेच ताटावरून पहात होता. काही वेळासाठी त्याचे मन कचरले. जर यातील एकही जण किल्ल्याजवळ पोहोचला तर मुगल सैन्याचे मनोबल वाढणार होते. किल्ल्यावरून होणारा दगडांचा मारा अंगावर झेलत खान पुढे झाला आणि इथेच त्याने चूक केली. परत एकदा किल्ल्यावरून एक मोठी शिळा त्याच्या रोखाने गडगडत आली. करीमखानाच्या घोड्याने वेग घेतला असल्यामुळे ती चुकवणे त्याला शक्य होऊ शकले नाही आणि त्याचा तोल गेला. तो खाली पडतो न पडतो तोच आणखी एक दगड गडगडत आला आणि त्याच्या खाली करीमखान चिरडला गेला. आपल्या डोळ्यादेखत आपला सेनानायक पडलेला पाहून खानाच्या मागे असलेल्या सैनिकांचे धैर्य संपले.

“या खुदा…” करत एकेकाने आपले घोडे मागे फिरविण्याचा प्रयत्न केला पण तो पर्यंत अनेक दगड आपले काम चोख बजाऊन गेले होते. जी गत करीमखानाची झाली होती काहीशी तशीच गत इतर बाजूंनी चाल करण्यासाठी गेलेल्या मुगल सैन्याची झाली होती. नाईक जायबंदी झाला होता, देशमुख दगडाखाली चिरडला गेला होता आणि दौलतखानाने पूर्णतः माघार घेतली होती. किल्ल्यावर चढाईसाठी गेलेली दोन हजाराची फौज देखील कुचकामी ठरली होती.

खान आपल्या तंबूत फक्त येरझाऱ्या घालत होता. त्याला आजही कोणतीच बढत मिळाली नव्हती. जवळपास सहाशे सैनिक कामी आले होते. पाचएकशे सैनिक गंभीर जखमी झाले होते. करीमखानाबरोबर गेलेल्या घोडदलापैकी एकही जण जिंवत परत आला नाही. दौलतखानाने वेळीच माघार घेतल्यामुळे त्याच्या बरोबर गेलेल्या सैन्याची मात्र जास्त हानी झाली नव्हती.

आणि आजही किल्ल्यावरील एकही इसम साधा जखमीही झालेला नव्हता. याआधीही खानाला हा किल्ला घेता आला नव्हता आणि याही वेळेस त्याची गत पूर्वीसारखीच होती. त्यावेळेस किल्लेदार वेगळा होता, या वेळेस वेगळा. पण परिणाम मात्र एकच

होता. खान पूर्ण हट्टाला पेटला. रोज खानाचे लोक किल्ल्यावर चढाई करण्यासाठी जात आणि त्यातील बरेचसे कमी होऊन माघारी येत. जवळपास दोन महिने हेच चालू होते. आता तर किल्ल्यावर मोठमोठ्याने होणारा शिवाजी महाराजांचा, संभाजी महाराजांचा जयजयकार खानाच्या सवयीचा एक भाग झाला होता. दोन महिने प्रयत्न करूनही जेव्हा किल्ला हाती येत नाही याची खानाला खात्री झाली त्यावेळेस त्याने शेवटचा पर्याय वापरण्याचा विचार केला. हा पर्याय होता तोफांचा वापर.

*झुंज : भाग ७ -*

खरे तर इतका छोटा किल्ला घेण्यासाठी तोफांचा वापर करणे खानाला कमीपणाचे वाटत होते. आणि म्हणूनच तोफखाना जवळ असून देखील त्याने तोफांचा वापर करणे टाळले होते. पण आता त्याशिवाय दुसरा कोणता पर्यायच किल्लेदाराने त्याच्यापुढे शिल्लक ठेवला नव्हता. काहीशा नाराजीनेच त्याने दरबानाला आवाज दिला.

“जी हुजूर...” आल्या आल्या खानाला कुर्निसात करत तो मान खाली घालून उभा राहिला.

“तोपची खुदाबक्षको बुलाव...” त्याच्याकडे लक्षही न देता खानाने आज्ञा केली. परत एकदा त्याला कुर्निसात करत दरबान बाहेर पडला. काही वेळाने तो परत आत आला.

“हुजूर... तोपची खुदाबक्ष आए है...” त्याने वर्दी दिली.

“उसे अंदर भेजो...” खानाचा हुकुम होताच दरबान बाहेर गेला आणि पाठोपाठ खुदाबक्ष शामियान्यात हजर झाला...

“हुजूर...”

“खुदाबक्ष... तुम्हारे पास कितनी तोपे है?” खानाने प्रश्न केला.

“हुजूर... बीस बडी और पचास छोटी...”

“ठीक है... आज हमे किलेपर चांदसितारा देखना है...”

“हुजूर... जरूर दिखेगा...”

तोफांचा वापर करून किल्ल्यावर हल्ला केला जाणार हे समजताच खानाच्या सैन्यात नवचैतन्य आले. किल्ला घेणे आता आपल्याला काहीच अवघड नाही असेच ते समजून चालत होते. एकेक करून सगळ्या तोफांनी आपली जागा घेतली.

किल्ल्याच्या तटबंदीवरून किल्लेदार देखील हे पहात होता. खानाचे दोन डावपेच तर त्याने उध्वस्त केले होते. पण आता वेळ आणीबाणीची होती. तोफांना तोंड देणे तितकेसे सोपे काम नव्हते. तोफगोळ्यांनी एखादा बुरुज ढासळला तरी गनीम शिरजोर ठरणार होता. आता मात्र किल्लेदाराने परत सगळ्यांना गोळा केले.

“मंडळी... येळ आनिबानीची हाये... खानाच्या तोपा गडाखाली दिसून ऱ्हायल्या. आपला किल्ला तोपांपुढं किती तग धरंल ह्ये काय आताच सांगता यायचं नाई. तवा समदे पोरं आनी बायामाणसं हायेत त्यास्नी आदी धान्याच्या कोठारात धाडून द्या. आन प्रत्येकानं दबा धरून बसायचं हाये. एकादा बुरुज ढासळला तर फौज तितून यायचा प्रयत्न करील. तवाच समद्यांनी तितं तुटून पडायचं. येक बी गनीम जित्ता नाय रायला पायजे. आपल्या शिवाजी राजानं येळप्रसंगी २०० लोकास्नी घिवून दोन हजारच्या सैन्याला धुळ चारली. आपन तर पाचशे मानसं... आपले शंभूराजे येकाच येळेला पाचपाच शत्रू अंगावर घेतेत. मंग आपन कामून मागं ऱ्हायचं? आपला देव आपल्यासंग हाये तवा घ्या देवाचं नांव आन तुटून पडा शत्रूवर... हर हर महादेव...” किल्लेदाराचे भाषण प्रत्येकाच्या अंगात नवचैतन्य फुलवून गेले. प्रत्येकाने एकदा शिवाजी राजांचा, संभाजी राजांचा जयघोष केला आणि शक्य तो आडोसा घेतला. त्याच बरोबर त्यांच्या तलवारी म्यानातून बाहेर आल्या.

सगळ्या तोफां आग ओकण्यासाठी सज्ज झाल्या होत्या. सगळ्यात मोठी तोफ खुदाबक्षाने गडाच्या दरवाज्याच्या बाजूने उभी केली. सर्वात आधी मोठी तोफ डागली जाणार होती. खुदाबक्ष स्वतः त्याला आग देणार होता. लवकरच एक मोठा गोळा तोफेत ढकलण्यात आला. तोफेची मागची बाजू दारूने ठासून भरण्यात आली आणि खुदाबक्षाने आपल्या कानात कापसाचे बोळे सरकवले. दारू भरणारे लोकं पटापट बाजूला झाले. त्यांनीही आपले पागोटे आपल्या कानाभोवती गुंढाळले. तसेच ते तोफेच्या बाजूने पाठ करून उभे राहिले. खुदाबक्षने पलिता पेटवला आणि तो तोफेच्या आग देणाऱ्या तोंडाजवळ नेला.

त्याबरोबर सरसरत वाट पेटली. काही क्षणांचा अवकाश आणि कानठळ्या बसवणारा आवाज करत तोड धडधडली.

तोफेच्या या आवाजाने पहिल्यांदाच खऱ्या युद्धाला तोंड फुटले होते. आता कोणत्याही पक्षाला माघार घेणे माहित नव्हते. फक्त मारणे किंवा मरणे यापैकी एकच गोष्ट त्यांच्यापुढे शिल्लक राहिली होती.

आता मात्र किल्लेदारासह सगळ्यानीच शक्य तो आडोसा घेतला. पण झाले भलतेच. तोफेच्या तोंडून निघालेला गोळा किल्ल्याच्या तटबंदीपर्यंत पोहचू शकला नाही. त्यानंतर एकानंतर एक आवाज होतच राहिले पण एकही गोळा तटबंदीपर्यंत पोहचत नव्हता. बऱ्याच वेळानंतर तोफांचे गोळे आपल्या पर्यंत पोहचत नाहीत हे लक्षात आल्याबरोबर एकेक करून सगळ्यांनी परत एकदा तटबंदीजवळ गर्दी केली. तोफा धडाडत होत्या आणि गडावरील लोकं फक्त त्यांची गंमत पहात होते. खानाचा हा तिसरा डावपेच देखील पूर्णतः फोल ठरला. देव पूर्णपणे आपल्या बरोबर आहे याची जणू खात्रीच गडावरील लोकांना झाली. खानाचा जळफळाट झाला तर किल्लेदाराच्या चेहऱ्यावर स्मितरेषा उमटली.

आठ दहा दिवस किल्ल्याच्या दिशेने तोफांचा मारा चालूच होता पण त्याचा काहीही उपयोग आतापर्यंत झालेला नव्हता. तोफेचे तोंड वरील बाजूला असल्यामुळे तिची मारकक्षमता कमी होत होती. आता जो पर्यंत यावर कोणता नवीन तोडगा निघत नाही तोपर्यंत विश्रांती घेणेच खानाने क्रमप्राप्त झाले.

अनेक वेळेस प्रयत्न करूनही किल्लेदार सैन्याला किल्ल्यापर्यंत येऊ देत नव्हता. अनेक दिवस विचार केल्यानंतरही जेव्हा खानाची बुद्धी चालेना त्यावेळेस त्याने आपल्या सैन्यातील अधिकारी लोकांची सभा बोलावली. सगळे लोकं आलेले पाहताच खानाने कोणतेही आढेवेढे न घेता मूळ मुद्द्याला हात घातला.

“सब जानते है, वो काफर किलेदार अभीतक हम सबको चीढा रहा है, हमे यहां आये बहोत दिन हो गये पर हम एक छोटेसे किलेपर अपना चांदसितारा लेहेरानेमे नाकामयाब रहे है. हम बादशहा को क्या मुह दिखाएंगे? हम चढनेकी कोशिश करते है तो वो पत्थर फेकते है. क्या ये हम बादशहा को बोलेंगे? हमारे पास तोपे है फिर भी हम काफिरोंको शिकस्त देनेमे कामयाब नही हो पाए. अब जो कोई इसका हल निकलेगा उसे बादशहा सलामत की तरफ से दस गांवकी जहागिरी दी जाएगी...” खान बोलायचे थांबला आणि अधिकाऱ्यांमध्ये चुळबुळ चालू झाली. प्रत्येक जण एकेक कल्पना मांडत होता आणि दुसरा ती कशी चुकीची आहे हे सिद्ध करण्याचा प्रयत्न करत होता.

“हुजूर... मनमे एक खयाल है, इजाजत हो तो...” इतके बोलून तो अधिकारी अडखळला.

“हां... बोलो...” खानाने फर्मावले.

“पर हुजूर... थोडा वक्त लगेगा...”

“ठीक है... जो भी है बोलो.”

“हुजूर, अगर हम यहांपर उस किलेजितना उंचा दमदमा बना ले और उसपर अपनी तोपे ले जाए तो हम किला आसनीसे ले सकते है.” यावर सगळ्यांमध्ये एकच हशा पिकला. कारण किल्ल्याच्या उंचीचा दमदमा बनवणे बिलकुल सोपे काम नव्हते. बरे नुसते दमदमा बनवून चालणार नव्हते. त्यावर मोठ्या तोफा चढवल्या जाणार होत्या. म्हणजेच तो दमदमा तितका मजबूतही पाहिजे होता. सगळे हसत असताना फक्त दोनच जण गंभीर होते. एक म्हणजे ज्याने हा विचार मांडला आणि दुसरा शहाबुद्दीन खान.

“चूप रहो सबलोग...!” खान भडकला. वातावरण एकदम शांत झाले.

“हां... तुम बोलो...” विचार मांडणाऱ्या अधिकाऱ्याकडे पाहत खान म्हणाला.

“हुजूर... अपने पास अभीभी आठ हजार लोग है. अगर १ हजार लोग किलेको घेरे रहेंगे तो भी सात हजार लोग चाहे तो हम ये कर सकते है. उसके लिए जो लकडी लगेगी वो इसी जंगलको काटकर हम ले सकते है.” त्याने आपली कल्पना सांगितली आणि खान खुश झाला.“बहोत खूब...! जैसे ही किलेपर चांदसितारा फडकेगा, तुम्हे तुम्हारा इनाम दिया जाएगा...!”आनंदात

खान म्हणाला आणिसभा संपली.

*झुंज : भाग ८ -*

किल्लेदार नेहमीप्रमाणे जय्यत तयारीनिशी तटावर हजर होता. खानच्या सैन्यात वाढलेली हालचाल त्याला काहीसे व्यथित करत होती. कारण त्याचा अर्थ होता की नवीन तयारीनिशी खान परत किल्ल्यावर आक्रमण करणार. आता पर्यंत जरी त्याचे मनसुबे सफल झालेले नसले तरी युद्धामध्ये कधी काय घडेल काही सांगता येत नव्हते. त्यामुळेच जराही गाफील राहणे किल्लेदाराला मंजूर नव्हते. दोन घटका होऊनही अजून किल्ल्यावर चढाईचा प्रयत्न झालेला नव्हता. सैन्याची हालचाल तर दिसत होती. किल्लेदाराच्या चेहऱ्यावर चिंता पूर्णपणे दिसून येत होती. जर संपूर्ण सैन्याने आक्रमण केले तर किल्लेदाराची मुश्कील वाढणार होती.

चार घटका झाल्या आणि खानाचे सैन्य आजूबाजूला पांगू लागले. गडावर चढण्याऐवजी ते गडाच्या विरुद्ध दिशेला कूच करत होते. खानाने माघार घेतली म्हणावे तर वेढा कायम होता. त्यामुळे खानाची यामागे काय रणनीती असावी याचा किल्लेदाराला काहीच अंदाज येईना.

किल्लेदाराचा संपूर्ण दिवस फक्त वाट पाहण्यात गेला. या संपूर्ण दिवसात त्याने जेवणाचीही पर्वा केली नव्हती. थोड्या थोड्या वेळात किल्ल्याच्या संपूर्ण भागात जाऊन त्याची पाहणी चालूच होती आणि तरीही त्याला जे दिसत होते त्यावर त्याचा विश्वास बसत नव्हता. खान आजूबाजूला जाऊन नवीन सैन्य घेऊन येतोय असे समजावे तर त्याच्याजवळ असलेले सैन्यही काही कमी नव्हते. बरे जादा कुमक मागवायची तर त्यासाठी संपूर्ण सैन्याची गरज ती काय? चार सहा घोडेस्वार देखील त्यासाठी पुरेसे होते. वेढा तर जराही ढिल्ला पडलेला दिसत नव्हता. शेवटी विचार करून किल्लेदाराचे डोके दुखू लागले पण खान काय करतो आहे याचा काहीही बोध त्याला होईना.

संध्याकाळ झाली. खानाचे पांगलेले सैनिक परत आपापल्या ठिकाणी गोळा झाले पण त्यांच्याकडून किल्ल्यावर आक्रमण होण्याचे कोणतेही चिन्ह दिसेना. सूर्य मावळला तसे गार वारे वाहू लागले. गारठा क्षणाक्षणाला वाढू लागला. पण किल्लेदाराला मात्र तो जाणवत नव्हता. त्याचे लक्ष फक्त आणि फक्त किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या मुगल सैन्यावर होते. रात्र झाली तसा त्याने त्याच्या सहकाऱ्याला आवाज दिला.

“तात्या...”

“जी किल्लेदार?” तात्या काहीसा धावतच त्याच्या पुढ्यात आला.

“आज काई म्या वाड्यावर जानार नाई... कुनाला तरी वाड्यावर धाडा. आन माह्यासाठी हितच भाकर बांधून आना... ह्यो खान येवढा सरळ मानुस नाई. त्यो काय ना कायतरी डाव टाकनार. आपन गाफील ऱ्हायलो तर मंग किल्ला त्याच्या ताब्यात जायला कायबी येळ लागायचा नाई...”

“व्हय जी... पर म्या काय म्हनतो, आमी हाय नव्हं त्याच्यावर पाळत ठिवायला?” तात्यानं चाचरत प्रश्न केला.

“आरं त्ये समदं ठीकच हाय पर म्या हितं ऱ्हायलो तर समदे लोकं डोळ्यात तेल घालून पहारा देतीन...” किल्लेदाराने तात्याची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. तसे किल्लेदाराचा हुकुम मोडणे तात्याला शक्यही नव्हते त्यामुळे काही न बोलता तो स्वतःच किल्लेदाराचे जेवण आणण्यासाठी वाड्याकडे रवाना झाला.

संपूर्ण रात्र किल्लेदार आणि त्याचे सहकारी अगदी डोळ्यात तेल घालून पहारा करत होते पण खानाच्या फौजेने कोणत्याही प्रकारची चढाई केली नाही. शेवटी पहाट झाली तशी किल्लेदार आपल्या सहकाऱ्यांवर टेहाळणीची जबाबदारी टाकून वाड्याकडे निघाला.

किल्लेदार घरी पोहोचला त्यावेळेस त्याची बायको वाटच पहात होती.

“काय मंडळी... आजूक वाट बघतायसा?” त्याने काहीशा थट्टेच्या सुरात विचारले.

“मंग... धनी जागे ऱ्हायल्यावर आमच्या डोळ्याला डोळा सुदिक लागनं व्हय?”

“आवो... पर आमची जिंदगी आमची नाई, या रयतेची हाये... त्यावर रयतेचा अधिकार...”

“ठावं हाय मला पन आमची जिंदगी तर तुमची हाये नव्हं...!!!” किलेदाराची बायको लाजत लाजत म्हणाली आणि किल्लेदाराचा पूर्ण शीण नाहीसा झाला. एकतर सध्याच्या काळात जी परिस्थिती उद्भवली होती त्यात स्वतःसाठी फक्त असे काहीसे क्षणच चोरावे लागत होते.

“बरं मंडळी... आम्हास्नी आमची हार कबूल हाय...” किल्लेदार बायकोकडे पहात मिश्किलपणे म्हणाला आणि त्याच्या खाली मान घातलेल्या बायकोने तोंड वर केले.

“नाई... काय बी झालं आन समोर कुनीबी असलं तरी तुमी हार मानायची नाई. तुमास्नी शिवाजी राजाची शपथ हाये...” तिच्या चेहऱ्यावर किल्लेदाराने वापरलेल्या ‘हार’ या शब्दाबद्दलची नापसंती ठळकपणे दिसून येत होती. यावर काय बोलावे हेच त्याला कळेना.

“हंग अस्सं... आता बादशा आला तरी हार माननार नाई... आता तू बी उल्शिक आराम करून घे.” सांगत किल्लेदार आराम करण्यासाठी निघून गेला आणि त्याची बायको मात्र उठून कामाला लागली.

दिवसांमागून दिवस जात होते. वेढा कायम होता. अधूनमधून तोफाही धडधडत होत्या पण त्याची त्रिव्रता नसल्यातच जमा होती.

खानाचा तळ अजूनही हललेला नव्हता. आणि एक दिवस किल्लेदाराला काही सैन्य परत येताना दिसले. जाताना खाली हाथ गेलेले खानाचे सैनिक येताना काहीतरी घेऊन येत होते. अनेक बैलगाड्या, घोडागाड्या यावर लाकडे आणली जात होती. किल्ल्याच्या आजूबाजूचा हिरवा परिसर काहीसा कमी होत होता. आजूबाजूला दिसणाऱ्या हिरव्या रंगाची जागा तपकिरी काळ्या रंगाने घेतली होती. याचा अर्थ साफ होता. लढाई अजूनही संपलेली नव्हती. उलट ती आता जास्त आक्रमकपणे लढली जाणार होती.

गडाच्या पायथ्याशी लाकडांचे ढीग पडू लागले. कित्येक जण त्या लाकडांपासून फळ्या / खांब तयार करू लागले. खान आता जास्तच सक्रीय होऊन लाकूडकाम करणाऱ्या लोकांवर लक्ष ठेवू लागला. या काळात त्याने किल्ल्यावर करण्यात येणारे आक्रमण पूर्णपणे थांबवले होते. जसजसे दिवस जाऊ लागले, किल्लेदाराला खान काय करतो आहे याचा अंदाज येऊ लागला. त्याने लगोलग तुका आणि सदूला बोलावले.

“गड्यांनो... वर्स होत आलंय पन खान अजूकबी हितंच हाये. त्यो काय करतोय ते तुमी बी बघितलं. त्यानं जर गडाच्या उंचीचा बुरुज बनविला मंग आपल्याला नमतं घ्यावं लागन. त्यापरीस आपन त्याचा ह्यो बेत हानून पाडायचा. आनी त्यासाठी आपल्याला लाकडाची तोप बनवावी लागन. तुका हाये ना तुज्या ध्यानात?”

“व्हय जी...” तुकाने सांगितले.

“मंग लागा कामाला...” किल्लेदाराने हुकुम सोडला आणि दोघही इतर काही जणांना मदतीला घेऊन कामाला लागले. जवळपास २५ दिवसात पहिली तोफ तयार झाली आणि किल्ल्यावरील लोकांमध्ये एकच चैतन्य संचारले. संभाजी महाराजांनी पाठविलेला दारुगोळा आता सगळ्यात जास्त उपयोगी पडणार होता. इकडे लाकडी बुरुजाचे कामही खूप जोरात चालू होते. खानाच्या सैन्याचे संपूर्ण लक्ष फक्त लाकडी बुरुज बनवण्यावर होते. बुरुज वर वर चढत होता आणि खान मनातून खुश होत होता.

नवीन बनविलेली लाकडी तोफ तटाजवळ आणली गेली. चामड्याच्या खळग्यात गोळा ठेवण्यात आला आणि किल्लेदाराचा हुकुम होण्याची सगळेजण वाट पाहू लागले. किल्लेदाराने हुकुम दिला. गोळा सुटला आणि आपले श्रम उपयोगी पडले याचे समाधान तुका आणि सदूच्या चेहऱ्यावर उमटले. पण त्यांचा हा उत्साह फक्त काही क्षणच टिकला. गोळा ज्या ठिकाणी पडला

तिथपासून खानाचे सैन्य बरेच लांब होते. जी गत खानच्या तोफगोळ्यांची होत होती काहीसी तशीच गत या गोळ्याची देखील झाली. त्यानंतर दोघांच्याही चेहऱ्यावर नैराश्य दिसू लागले.

“भले शाब्बास !!!” किल्लेदाराची शाब्बासकीची थाप तुकाच्या आणि सदूच्या पाठीवर पडली. आपले श्रम वाया गेले असे त्यांना वाटत होते पण किल्लेदाराची शाब्बासकी मिळतात त्याच्या मनात आलेले नैराश्य कुठल्या कुठे पळाले.

“गड्यानो... मला तुमचा अभिमान हाये... जवर तुमच्यासारखी मानसं संबाजी राजासंग असतील, तवर स्वराज्यावर कुनी बी चालून आला तरी त्याला मागं फिरावं लागंन. आज गोळा हितं पडला हाये. आपन उल्षिक प्रयत्न केला त त्यो सैन्यापोतूर बी पोचन. या तोपेचा पल्ला कमी पडू ऱ्हायला पन त्यावर बी आपन कायतरी उपाय शोधू...” किल्लेदाराच्या शेवटच्या वाक्यात काहीशी चिंता दिसून येत होती. पण त्याचा त्याच्या माणसांवर पूर्ण विश्वास बसला होता. पण नवीन तोफ बनवायची म्हटली म्हणजे परत काही दिवस जाणार होते. शेवटी खानाकडून हल्ला होईस्तोवर शांत राहायचे धोरण किल्लेदाराने स्विकारले. दुसरीकडे मात्र लाकडी बुरुजाचे काम अव्याहतपणे चालूच होते.

खानाचा किल्ल्याला वेढा पडून जवळपास दोन वर्ष होत आले होते. लाकडी बुरुजाचे कामही जवळपास पूर्ण झाले होते. जवळपास पाचशे माणसे एकाच वेळेस बुरुजावर उभे राहू शकतील इतका मोठा बुरुज बनविण्यात आला होता. खान जरी शत्रू होता तरी त्याच्या या बुरुजाबद्दल किल्लेदाराने मनोमन त्याचे कौतुक केले. पण आता त्याची चिंता अनेक पटीने वाढली होती. किल्लेदार जरी मनातून खचला नव्हता तरी खानाच्या या बुरुजाची तोड त्याला अद्याप मिळाली नव्हती त्यामुळेच तो काळजीत होता.

*झुंज : भाग ९ -*

खान आज खूपच खुशीत होता. लाकडी बुरुजाचे काम पूर्ण झाले होते. या बुरुजाची मजबुती कशी आहे हे खान जातीने लक्ष घालून पहात होता. इतक्या दिवसांच्या परिश्रमाचे त्याला मिळालेले हे फळ नक्कीच गोड होते. आता फक्त बुरुजावर तोफा चढवायच्या आणि जास्तीत जास्त चार दिवसात रामशेजवर चांदसितारा फडकवायचा याची त्याने मनाशी खुणगाठच जणू बांधली होती.

किल्लेदार मात्र मोठ्या काळजीत पडला होता. जो माणूस किल्ल्याच्या उंचीचा बुरुज आपल्या सैन्याकडून उभारून घेऊ शकतो तो किती चिवट असणार याची चांगलीच खात्री किल्लेदाराला आली होती. त्यामुळेच गडावर सगळीकडे चिंतेचे वातावरण पसरले होते. गडावरील लोकं जरी उघड उघड बोलून दाखवीत नव्हते तरी ते मनातून काहीसे हादरले होते. त्यातल्या त्यात एकच गोष्ट किमान अजून तरी समाधानकारक होती. ती म्हणजे इतके होऊनही किल्लेदार नाउमेद झालेला नव्हता. त्याच्या प्रत्येक सभेत, चर्चांमध्ये तो पहिल्या इतकाच उत्साही होता.

“आवो...! दोन घास खाऊन घ्या...!” किल्लेदाराला चिंतेत पाहून त्याच्या बायकोने म्हटले.

“आं... काई म्हनालीस?” किल्लेदार बायकोच्या आवाजाने काहीसे भानावर आला.

“म्हनलं... आदी दोन घास खाऊन घ्या...!!!”

“नाई... खान्यावरची वासनाच उडलीय बगं... येकदा का तोपा चढल्या बुरजावर मंग काय खरं नाई...!!!” किल्लेदाराच्या स्वरात काहीसा हताशपणा दिसून येत होता. जवळपास दोन वर्षांपासून कुणालाही गड उतरता आला नव्हता. खानाने दिलेला वेढा जराही ढिल्ला पडला नव्हता. किल्ल्यावर जमविलेली रसदही हळूहळू संपत होती. जास्तीत जास्त महिना दोन महिने पुरेल इतके धान्य अजूनही किल्ल्यावर होते पण खानाने बनविलेला हा लाकडाचा बुरुज किल्लेदारासाठी राक्षस बनला होता. त्याच वेळेस संभाजी महाराजांच्या पाच पाच मोहिमा चालू असल्यामुळे त्यांच्याकडूनही मदत आलेली नव्हती.

“तुमास्नी काय वाटलं... मला काय ह्ये ठावं नाय? पर आपल्याकडं समदे बघू ऱ्हायलेत. काय झालं तरी खानाला ह्यो किल्ला आसाच द्यायचा नाई.” शेवटचं वाक्य तिने त्वेषात उद्गारले. किल्लेदाराला पुन्हा एकदा आपल्या बायकोचा अभिमान वाटला.

पुन्हा एकदा किल्लेदाराने सगळ्या लोकांना बोलावले. आजची रणनीती नेहमीच्या रणनीती पेक्षा खूपच वेगळी होती. आज किल्लेदाराने तोफेच्या हल्ल्यात तटबंदीला खिंडार पडले तर कुणी कुठे थांबायचे आणि खानाच्या सैन्याला कापून काढायचे याची अगदी बारकाईने आखणी केली होती. आता प्रत्यक्ष लढाई होणार यात काही संशय उरला नव्हता. प्रत्येकाने आपले शीर हातावरच घेतले होते.

खानाने देखील सभा बोलावली. प्रत्येकाला त्यांची कामे आखून दिली. दोन दिवस तोफा बुरुजावर नेण्यास लागणार होते. त्यानंतरचे दोन दिवस फक्त त्या तोफांचा किल्ल्यावर मारा करून किल्ल्याचे आणि तेथील लोकांचे जितके शक्य होईल तितके नुकसान करायचे आणि नंतर एकदम हल्ला चढवायचा असा बेत नक्की करण्यात आला. ही आखणी चालू असतानाच एक दूत घाईघाईत तिथे येऊन हजर झाला.

“हुजूर... बादशा आलमगीर का आपके नाम संदेश आया है...” त्याने खानाला सांगितले.

“हां... उसे अंदर लेके आव...!” खानाने फर्मावले.

काही वेळातच बादशहाचा दूत खानासमोर हजर झाला. त्याने खानाला लवून कुर्निसात केला आणि आपल्या जवळील खलिता खानाच्या हाती दिला. खानाने तो आपल्या हाती घेत त्याला खुणेनेच जाण्याची आज्ञा दिली. सगळे जण बादशहाचा काय निरोप आहे हे ऐकायला उत्सुक झाले होते.

खानाने मनातल्या मनात खलिता वाचायला सुरुवात केली. सगळे जण अगदी टक लावून त्याच्याकडे पहात होते. खान जसजसा खलिता वाचत होता तसतसे त्याच्या चेहऱ्यावरील भाव बदलत होते. अगदी काही वेळापूर्वी अगदी खुशीत असलेला खान आता चांगलाच संतापलेला दिसत होता. त्याचा तो चेहरा पाहून सभेला उपस्थित असलेल्यांपैकी एकाचीही खानाला काही विचारण्याची हिंमत झाली नाही. खानही काही बोलत नव्हता आणि इतर कुणी काही विचारण्याची हिम्मत करत नव्हते. नक्कीच बादशहाकडून असा काहीतरी हुकुम आला होता ज्याने खानाचा अभिमान डिवचला गेला होता. शेवटी खानाचा आवाज शांततेचा भंग करीत वातावरणात घुमला.

“तुम सब जाव...!!!” काहीशा घुश्यात खानाचा आदेश आला आणि काहीही न बोलता प्रत्येकजण शामियान्यातून बाहेर पडला. आता मात्र खान चिडलेल्या वाघासारखा येरझाऱ्या घालत होता. आतापर्यंत कितीतरी वेळा त्याने खलिता वाचला होता आणि प्रत्येक वेळेस त्याचा संताप वाढतच होता. जसजसा वेळ जाऊ लागला तसतशी संतापाची भर ओसरली. तसेही चिडून संतापून घडणाऱ्या घटनेत काहीही फरक पडणार नव्हता. पुन्हा एकदा त्याने पहारेकऱ्याला आवाज दिला आणि परत सभा बोलावली.

काही वेळातच सर्वजण खानाच्या शामियान्यात हजर होते. एव्हाना खानाचा चेहरा बराच शांत झाला होता. आवश्यक ते सर्वजण जमल्याची खात्री झाल्यावर खानाने बोलायला सुरुवात केली.

“शहंशहा आलमगीरका फर्मान आया है... मुझे वापस आने का हुकुम मिला है पर अभी जंग खतम नही हुई. मेरी जगह फतेह खान लेगा...” खान बोलायचा थांबला. खलित्यातील सगळ्या गोष्टी सांगणे मात्र त्याने टाळले. त्याचे हे बोलणे चालू असतानाच बाहेर गलका वाढला. तेवढ्यात दारावरील पहारेकरी आत आला.

“क्या है? इतना शोर कैसा?” खानाने संतापून पहारेकऱ्याला विचारले.

“हुजूर... बाहर हवालदार आये है, आपसे मिलना चाहते है...” त्याने मान खाली घालून उत्तर दिले.

“ठीक है, भेजो अंदर...” खानाने फर्मावले. काही क्षणातच हवालदार खानापुढे हजर झाला.

“बोलो हवालदार...”

“हुजूर... एक बुरी खबर है...” त्याने काहीसे घाबरत सांगितले. आता आणखीन कोणती वाईट बातमी आली याचा खानाला विचार पडला. हवालदार मात्र मान खाली घालून फक्त उभा होता.

“रुक क्यो गये? बोलो...” खानाचा आवाज वातावरणात घुमला.

“हुजूर... हमने जो दमदमा बनाया है, उसे आग लग गयी... और वो पुरी तरहसे बरबाद हो गया है...” त्याने बिचकत बिचकत सांगितले.

“क्या? कैसे हुवा ये सब?” खान ओरडलाच.

“हुजूर... किलेपरसे एक गोला आया और...” त्याला पुढचे बोलण्याची गरजच पडली नाही. खान धावतच बाहेर आला. त्याच्या डोळ्यासमोर त्याची वर्षभराची मेहनत राख होताना दिसत होती. मुघल सैन्यात हाहाकार मजला. आगीच्या ज्वाळा आकाशाला भिडत होत्या. जवळपासचे कित्येक सैनिक आपला जीव वाचवीत दूर पळाले. कित्येक जण आगीत भाजून निघाले. दमदम्यापासून खानाचा शामियाना बराच दूर असून देखील त्यालाही त्या आगीची धग स्पष्ट जाणवत होती. खानाच्या डोळ्यात अंगार फुलला. खानाचा बराचसा दारुगोळा आगीत स्वाहा झाला. आणि त्याच वेळेस किल्लेदार मात्र तुका, सदू आणि त्याच्या साथीदारांना शाब्बासकी देत होता. आज खऱ्या अर्थाने किल्ल्यावर दिवाळी साजरी होत होती.

*झुंज : भाग १० -*

जवळपास दोन दिवस दमदमा जळत होता. हळूहळू त्याची आग विझत होती तसाच खानाचा चढलेला पाराही ओसरत होता. त्याच्या मनातील संतापाची जागा असूयेने घेतली. बादशहाने केलेला त्याचा अपमान त्याच्या जिव्हारी लागला होता. त्याने घेतलेल्या संपूर्ण मेहनतीवर बादशहाच्या एका खलित्याने पाणी फिरवले. आता जो कुणी नवीन सरदार त्याची जागा घेणार होता त्याला परत पहिल्यापासून सगळी सुरुवात करावी लागणार होती. आणि हीच गोष्ट त्याच्या मनातील राग शांत करण्यास कारणीभूत ठरली.

नवीन येणाऱ्या सरदाराची वाटही न पाहता खानाने परतण्याची तयारी सुरु केली. या कालावधीत किल्ल्याचा वेढा काहीसा ढिल्ला पडला. खानाने आपले पूर्ण लक्ष काढून घेतले होते.

किल्ल्यावरून सैन्यात धावपळ दिसत होती पण त्यात कुठेही चैतन्याचा लवलेशही नव्हता. ही गोष्ट किल्लेदारासाठी काहीशी आश्चर्यकारक आणि काहीसी न उमजणारी होती. तो सैन्याच्या हालचालींकडे निरखून पाहू लागला आणि त्याच्या मनात एक विचार चमकला. क्षणाचाही विलंब न लावता त्याने सभा बोलावली.

“गड्यांनो... दोन दिसापासून खानाच्या सैन्यात लगबग दिसून ऱ्हायली. त्याचा मनसुबा तुमी समद्यांनी हानून पाडला. या दोन दिसांमधी त्याच्याकून कायबी उत्तर आलं नाई. त्याच्या तोपाबी थंडच हुत्या. पन आपल्याला बेसावध राहून चालायचं नाई. कारन अजूक त्यानं गडाचा वेढा उठीवला नाई. तवा दोन जनांनी रातच्याला जाऊन सैन्याची बातमी घिवून यायची हाये. काम लई जोखमीचं हाय... सैन्याच्या हाती गावले त जीत्ते परत यायचे नाईत. तुमच्या पैकी कोन ह्ये काम अंगावर घ्यायला तयार हायेत त्यांनी पुढं या...” किल्लेदार बोलायचे थांबला तसा जवळपास सगळीच माणसे पुढे सरकली. आपल्या लोकांच्या या कृतीचा किल्लेदाराला अभिमान वाटला.

“आरं समदेच गेलेतर मंग हितं कोन ऱ्हाईल?” किल्लेदार हसत म्हणाला आणि मग त्याने दोघांची निवड केली. दोघेही अगदीच किरकोळ शरीरयष्टीचे होते.

रात्रीच्या अंधारात दोन सावल्या गडावरून खाली उतरत होत्या. प्रत्येकाने अंगावर घोंगडी पांघरली होती. त्यामुळे रात्रीच्या कुट्ट अंधारात दोघेही हरवले होते. दोघांचेही डोळे जरी अंधाराला सरावले होते तरी त्यांना सावधगिरी बाळगावी लागत होती. एक चुकीचे पाऊल आणि समोर मृत्यू हे अधोरेखित होते. तसे दोघांपैकी कुणीही मृत्यूला घाबरणारा नव्हता पण त्यांचा मृत्यू हा किल्लेदारासाठी नुकसानदायक ठरणार होता. आणि याच एका कारणाने दोघेही अगदी काळजीपूर्वक हालचाल करत होते. एरवी एकदीड तासात पूर्ण गड उतरणारे ते शूर शिपाई आज मात्र प्रत्येक पाऊल आधी कानोसा घेऊन टाकत होते.

काही वेळातच त्यांना खानाच्या वेढ्यातील एक छावणी दिसू लागली. छावणीत एकूण सहा तंबू उभारण्यात आले होते. त्यातील फक्त एक तंबू काहीसा लहान आणि बाकी जरासे मोठे होते. लहान तंबूसमोर दोनजण पहारा देत होते. म्हणजेच तो एखाद्या अधिकाऱ्याचा असणार यात शंका नव्हती. मोठ्या तंबूसमोर मात्र एकेक जण दिसून येत होता. बहुतेक ते सैनिकांना आराम करण्यासाठी उभारण्यात आले होते. इतर पहारा देखील दिसत होता पण त्यांच्यात कोणतीही सावधगिरी दिसून येत नव्हती. तसेही यावेळेस गडावरील दोघांनाही देण्यात आलेले काम हे फक्त बातमी मिळविण्याचे होते. त्यामुळे पहारेकऱ्यांचा जिथपर्यंत आवाज येईल त्यापेक्षा पुढे जायचे नाही अशी सक्त ताकीद किल्लेदाराने दोघांनाही दिली होती.

काही वेळ गेला आणि पहाऱ्यावरील एकाने शेकोटी पेटवली. थंडीचा कडाका वाढतच होता त्यामुळे एकेक करून पहाऱ्यावरील शिपाई शेकोटीभोवती जमू लागला. तसेही इतकी मोठी फौज असताना कोणताही प्राणी जवळ येईल याची सुतराम शक्यता नव्हती.

हळूहळू शेकोटीने चांगलाच पेट घेतला आणि प्रत्येक शिपाई हात शेकून घेऊ लागला. हळूहळू त्यांच्यात बोलणे सुरु झाले.

प्रत्येक शब्द दोघाही हेरांना स्पष्टपणे ऐकू येत होता.

“काय रे... सरदार कामून चिडले व्हते?” एका शिपायाने विषय काढला.

“अरे... लय मोठा किस्सा हाय त्यो...” दुसऱ्याने तोंड उघडले.

“किस्सा?”

“हां मंग...! आपला सरदार हाय नव्हं, त्याला बादशाचा हुकुम आला. परत बोलीवला हाय... आन निस्ता बोलीवला न्हाई तर लय श्या दिल्यात म्हने बादशाने खलीत्यात. सरदारानं त्यो काय कुणाला दावला बी नाई. आन आता चार सा दिवसात फतेखान येनार हाय.” त्या शिपायाने जितके माहित होते तितके सांगण्याचा प्रयत्न केला.

“ह्ये येक लैच चांगलं झालं बग...” पहिला शिपाई उद्गारला.

“काय चांगलं झालं?” तिसऱ्या शिपायाने मध्येच तोंड उघडले.

“आरं ह्यो सरदार... लय हरामी... आपल्या देखत आपल्या देवाचे मंदिर फोडले. माह्या मागं बायका पोरं नसती ना, त्याला तितंच आडवा केला असता...” पहिल्या शिपायाच्या बोलण्यात खानाबद्दलचा राग चांगलाच दिसून येत होता.

“ह्या ह्या ह्या... कायबी बोलून ऱ्हायला... तू कुटं, त्यो खान कुटं..!!! तुज्यासारखे उजूक धा गेलेना चालून त्याच्या अंगावर तर त्या समद्यांना पानी पाजन त्यो...” तिसऱ्या शिपायाने पहिल्या शिपायाची पूर्णतः खिल्ली उडवली.

“हां... त्ये बी खरं हाय म्हना... साला राक्षस हाय पुरता...” पहिल्या शिपायाने माघार घेतली.

“आरं... बाकी त्ये काय बी असू दे... पुढचे चार सा दिस आपल्याला आराम हाय... जवर नवीन सरदार येत नाई तवर काय घोर नाई बग...” चौथा शिपाई म्हणाला आणि सगळ्यांनी त्यावर होकारार्थी माना हलवल्या.

“म्या काय म्हनतो... देवानच सरदाराला अद्दल घडीवली असनार... तुमी देवाची मूर्ती फोडनार आन त्यो तुमाला यवस्थित ठिवनार व्हंय? आतापोतूर आपन सरदारासंग काय कमी लढायात भाग घ्येतला? कोनच्याच लढाईत हार झाली नाई. पन आज दोन वर्स झालं, येक पाऊल सुदिक पुढं पडून नाई ऱ्हायलं.” पाचव्या शिपायाने पहिल्यांदाच तोंड उघडले.

गडावरील दोघाही हेरांच्या चेहऱ्यावर एक आनंद फुलला. त्यांना किल्लेदाराने दिलेली कामगिरी अगदी सहजपणे पार पडली होती. अजून काही वेळ थांबून परतण्याचा दोघांनीही निर्णय घेतला.

पहाटेच्या वेळेला किल्ल्याच्या दरवाज्यावर खुणेचा आवाज आला आणि दरवाज्याची लहानशी झडप उघडून तिथे एक चेहरा दिसू लागला. खुणेचा आवाज म्हणून त्याने एक शिळ घातली आणि त्याला लगेचच प्रत्युत्तर मिळाले. क्षणाचाही विलंब न करता झडप बंद झाली आणि पुढच्याच क्षणाला किल्ल्याचा लहान दरवाजा उघडला गेला. कामगिरीवर गेलेले दोघेही जण त्यातून आत शिरले. काही पायऱ्या चढून ते वर आले तो त्यांच्या पुढे स्वतः किल्लेदार उभा होता.

“काय रे माह्या वाघांनो... काय खबर हाय?” त्याने अगदी बारकाईने दोघांच्याही चेहऱ्याकडे निरखून पाहत प्रश्न केला.

“किल्लेदार... देव आपल्याच बाजून हाय...” दोघांपैकी एकाने अगदी खुशीत उत्तर दिले आणि किल्लेदार खुश झाला. नंतर एकेक करत दोघांनीही पूर्ण बातमी किल्लेदाराला दिली आणि त्याच्या चेहऱ्यावर समाधान पसरले.

“वा रं माह्या पठ्ठ्यांनो... लैच मोठं काम केलं हाये तुमी... जा आता उल्शिक आराम करा...” त्याने दोघांच्याही पाठीवर शाब्बासकीची थाप देत त्यांना आराम करायला पाठवले.

“किल्लेदार... आता तुमीबी आराम करा... दोन दिस झालं, तुमीबी काईच आराम केला नाई...” तात्या उत्तरला आणि ते खरेही होते. दोन दिवसांपासून रात्रीची झोप अशी किल्लेदाराला माहितीच नव्हती. त्यामुळे त्यानेही तात्याच्या बोलण्याला मान देत

आपली पावले वाड्याकडे वळवली.

*झुंज : भाग ११ -*

सकाळ झाली तशी किल्लेदाराने परत सभा बोलावली.

“गड्यांनो… आपला देव आपल्यासंग हाये. बादशानं खानाला परत बोलीवलं अशी बातमी कालच्याला जीवाशिवानं आनली. जवर नवीन सरदार येत नाई तवर किल्ला सुरक्षित ऱ्हाईल. त्यो यायला चार सा दिस लागतीन. तवर त्रंबकगडावर जाऊन आपल्याला मदत मागावी लागनं. पन त्यासाठी मुगल फौजेचा येढा तोडून ह्ये काम करावं लागनार. ही कामगिरी कोन घ्येनार अंगावर?” परत एकदा अनेकजण समोर आले. पण तेवढ्यात त्याच्यातील एकाचा आवाज आला.

“किल्लेदार… मै लेता है…” अली हसन पुढे येत म्हणाला.

किल्लेदाराने आवाजाच्या दिशेने पाहिले. एक २०/२२ वर्षाचा युवक त्याच्यासमोर उभा होता. किल्लेदार बाकी काही बोलणार तेवढ्यात त्या युवकाने सुरुवात केली.

“ह्ये कुनी गेले आन फौजेच्या हाती गावले तर काम ऱ्हाईल… म्या मुसलमान हाये. कुनीच संशय घेनार नाई… काम फत्ते हुनारच…” किल्लेदाराला त्याच्या आश्वासक शब्दांचे कौतुक वाटले तसेच ही गोष्टही त्याला मनोमन पटली.

काहीवेळातच त्र्यंबकगडाच्या किल्लेदारासाठी एक खलिता बनविण्यात आला. त्यावर किल्लेदाराने आपली मोहोर उठवली आणि तो अलीच्या ताब्यात देण्यात आला.

अली अगदी सावधगिरीने गड उतरत होता. त्याने जरी आश्वासकपणे कामगिरी फत्ते करण्याबद्दल किल्लेदाराला सांगितले होते तरीही त्याच्या मनात याबद्दल पूर्णतः खात्री नव्हती. तशी ती कुणाच्याही मनात नव्हतीच. इतर वेळेस गोष्ट वेगळी होती. पण यावेळेस मुघल सैन्याचा वेढा पडलेला होता. आणि अशा वेळेस कुणीही त्याची झडती घेतली असती आणि त्याच्याकडील खलिता त्यांच्या हाती लागला असता तर तो जीवानिशी गेला असताच, पण कामगिरीही अर्धवट राहिली असती. यासाठीच त्याला शक्य तितकी काळजी घ्यावी लागत होती.

काही वेळातच त्याला मुघल सैन्याच्या छावण्या दिसू लागल्या. दोन छावण्यांमधील अंतर हे जास्तीत जास्त दोन फर्लांगाचे. पण दैव अलीच्या बाजूने होते. छावणीत सैनिक तर दिसत होते पण काहीसे सुस्त. एका क्षणासाठी त्याचे मन कचरले. पण त्याला थांबून चालणार नव्हते. त्याची एका क्षणाची भीती ही अनेकांना उपासमारीने तडफडून मरण्यास कारणीभूत ठरणार होती. ज्या माणसांबरोबर आपण लहानाचे मोठे झालो, ज्यांच्या घासातला घास त्यांनी आपल्या बरोबर खाल्ला त्या लोकांशी दगा करायचा? शक्यच नाही. स्वराज्यासाठी मरण आले तर जन्नत मिळणारच. अलीचे मनाने उभारी घेतली आणि त्याची पावले पुढे पडू लागली. दोन छावण्यामधून गेलो तर लोकांचे लक्ष जाणारच हे त्याच्या लगेचच लक्षात आले आणि त्याने एका छावणीच्या बाजूने पुढे सरकायला सुरुवात केली. लवकरच तो एका तंबूच्या जवळ पोहोचला. सैनिकांचे आवाज त्याला स्पष्ट ऐकू येत होते. अर्थात त्याला त्याच्याशी काहीही देणेघेणे नव्हते. कसेही करून त्याला ती छावणी पार करून वेढ्यातून बाहेर पडायचे होते. एका ठिकाणी त्याला पहाऱ्यावरील सैनिक बाजूला झाल्याचे दिसले आणि त्याने त्याबाजूला आपली पावले वळवली. अगदी सावधगिरीने तो पुढे चालला होता. काही क्षणातच त्याने छावणी पार केली आणि तो सुटल्याचा श्वास घेतो न घेतो तोच त्याला आवाज आला.

“ए… कोन है? ठहेरो…!!!” आवाज आला तसा तो आहे त्या ठिकाणीच थांबला. पुढे पळाला असता तर नक्कीच तो सैन्याच्या हाती सापडला असता. त्याने एकदा अल्लाचे नाव घेतले आणि तो मागे वळला.

“ए… इधर आव…” पहाऱ्यावरील अधिकाऱ्याचा आवाज आला.

“जी हुजूर…” अली त्या अधिकाऱ्यासमोर उभा होता.

“कोन हो तुम... इधर कायको आया?” अधिकाऱ्याने दरडावून विचारले.

“हुजूर... इधर मै नही आया... मेरी भैसका बछडा आया...” अलीने बावळटपणाचा आव आणत सांगितले.

“भैस का बछडा?”

“जी हुजूर...”

“और तुम उसके पीछे आया?”

“जी हुजूर...”

“तुमको पता नही है क्या... यहां से आगे जाना मना है?”

“हुजूर... मेरेको पता है पर उसको पता नही है...” अली अधिकाऱ्याच्या नजरेला नजर देत उत्तरला.

“नाम क्या है?” अधिकाऱ्याने पुढचा प्रश्न केला.

“छोटू हुजूर...” अलीच्या चेहऱ्यावर बावळटपणाचे भाव पुरेपूर दिसून येत होते.

“छोटू? ये कैसा नाम है?”

“हुजूर... अभी छोटा है ना... इसलिये सब छोटू बोलते है...”

“अबे चूप... तुम तो छोटा नही दिखता...” अधिकारी काहीसा वैतागला.

“हुजूर... ये मेरा नही, उस बछडेका नाम है...”

“क्या पागल हो? मैने तुम्हारा नाम पुछां है...” अधिकारी पूर्णच वैतागला.

“हुजूर... मेरा नाम अली है... अली हसन...”

“तुम मुसलमान हो? रहेते कहां हो?” अधिकारी काहीसा नरम पडला.

“हुजूर... वो झोपडे है ना? वहीच...” दूरवर विरुद्ध बाजूला बोट दाखवत अलीने सांगितले.

“चलो जाव इधरसे... नही तो अल्ला को प्यारे हो जावोगे... भागो...” अधिकाऱ्याने फर्मावले आणि अलीने मनोमन अल्लाचे आभार मानले. किल्लेदाराने त्याच्यावर सोपवलेली कामगिरी जवळपास अर्धी फत्ते झाली होती.

वेढ्यातून बाहेर पडल्यावर मात्र अलीने एक क्षण देखील वाया घालवला नाही. त्र्यंबकगडाखाली तो पोहोचला त्यावेळेस जवळपास अंधार पडला होता. रात्रीच्या वेळेस गडाचे दरवाजे काही केल्या उघडले जाणार नाहीत हे तो पक्के जाणून होता. त्यामुळे मग त्याने गडाच्या पायथ्याशी महादेवाच्या मंदिराजवळ आराम करण्याचा निर्णय घेतला.

एकतर थंडीचे दिवस. त्यात अंगावरील कपडे देखील बेताचेच आणि रात्रीचा अंधार. बरे या भागात रात्रीचा बिबटे, तरस अशा जनावरांचा वावर. शेवटी अल्लाचे नाव घेत त्याने महादेव मंदिराचा दरवाजा ठोठावला. काही वेळ शांततेच गेला आणि नंतर मुख्य दरवाज्याजवळ त्याला हालचाल ऐकू आली.

“कोन ए?” आतून आवाज आला.

“मै अली..., रामशेजवरनं किल्लेदाराचा खलिता आनलाय. त्रंबकगडावर देन्यासाठी. पन रातच्याला किल्ल्याचे दरवाजे बंद

ऱ्हातेत...” अलीने सगळे खरे सांगून टाकले. काही वेळ परत शांततेत गेला आणि परत आवाज आला.

“किती लोकं हायेत?”

“येकलाच हाये...” अलीने उत्तर दिले आणि दरवाजा उघडला गेला.

मंदिराचा पुजारी हातात मशाल घेऊन उभा होता.

“रामराम...” अलीने मुद्दाम सलामच्या ऐवजी रामराम म्हटले होते.

“रामराम... पन.., रामशेजला तर बादशाच्या फौजेचा वेढा हाये?” पुजारी काहीसा साशंक झाला.

“हा... म्हनून तर किल्लेदाराने मदत मागितली... ही पहा संबाजी राजाची खून...” अलीने पुजाऱ्याला किल्लेदाराने त्रंबकच्या किल्लेदारासाठी दिलेली खुणेची मुद्रा दाखवली आणि पुजाऱ्याचा संशय मिटला.

“वाईज धीर धर... तुज्या राहन्याची व्यवस्था करतो...” अलीला दारातून आत घेत आणि मंदिराचा दरवाजा बंद करत पुजारी त्याच्या राहण्याची व्यवस्था करण्यासाठी निघून गेला. काही वेळाने पथारी आणि घोंगडी घेऊन तो परत आला.

“ह्ये घे... आन त्या कोपऱ्यात मांड पथारी. पहाटेला कोंबडा आरवला की गडावर जा... आता आराम करून घे...”

“लई उपकार झालं...” अलीने त्याचे आभार मानले.

“अरे... संबाजी राजाचा शिपाई तू... येवढं तर करूच शकतो ना...” असे म्हणत पुजारी निघून गेला आणि अलीने पथारीवर अंग टाकले.

*झुंज : भाग १२ -*

पहाटे पक्षांचा किलबिलाट सुरु झाला तसा अलीला जाग आली. पहाटेची थंडी अंगाला बोचत होती तरीही तो उठला. कपडे आवरले आणि पुजाऱ्याचा निरोप घेऊन तो बाहेर पडला.

त्र्यंबकगडावर पोहोचला त्यावेळेस पूर्ण उजाडले होते. गडाचा किल्लेदार दिवाणखान्यात हजर झाला होता. सर्वात प्रथम अली किल्लेदारासमोर हजर झाला.

“नाव काय तुजं?” किल्लेदाराने प्रश्न केला.

“अली… अली हसन…”

“गडावर समदं ठीक हाय नव्हं?”

“जी हुजूर… आजूक तरी समदं आलबेलं हाय… पर…” अलीने वाक्य अर्धेच तोडले.

“पर काय?” किल्लेदाराने विचारले.

“आमच्या किल्लेदारानं सांगावा धाडलाय. ह्यो खलिता…” खाली मानेन त्याने किल्लेदारासमोर रामशेजच्या किल्लेदाराचा खलिता पुढे केला. किल्लेदाराने त्याच्या चिटणीसाला मानेनंच खुण केली आणि चिटणीसाने पुढे होत खलिता स्वतःच्या हाती घेतला.

“तू वाईज आराम कर…” किल्लेदाराने अलीला हुकुम केला. तसेच दारावर असलेल्या पहारेकऱ्याला आवाज दिला.

“आज्ञा किल्लेदार…” पहारेकरी आत येत मुजरा करीत म्हणाला.

“याच्या न्याहारीची आन जेवनाची यवस्था करा…”

“जी किल्लेदार…” म्हणत पहारेकरी अलीला घेऊन बाहेर पडला.

“दिवाणजी… काय लिवलंय किल्लेदारानं?” त्र्यंबक किल्लेदाराने विचारणा केली.

“सरदार… रामशेज किल्लेदार मदत मागून ऱ्हायले… गडावरची रसद संपायला आली आन मुगल सैन्याचा येढा निघायचं नांव नाई. आता बादशानं शहाबुद्दीन खानाला माघारी बोलीवला. तो रवाना झाला आहे पन नवा सरदार यायला चार सा दिस लागतीन. तवर काई मदत पोचीवता येईल का म्हनून इचारलं हाये त्यांनी.”

“अस्सं… दोन वर्स झाली, पठ्ठ्यानं गड लढीवला… मानायला पायजे… असं करा आपला येक दूत अहिवंत गडाकडे रवाना करा. त्याच्यासंग येक खलिता धाडा. आन आपल्या लोकास्नी गोळा करा…” किल्लेदाराने हुकुम सोडला आणि चिटणीस मुजरा करून बाहेर पडला.

दुपारच्या वेळेला त्र्यंबकगडावर सैन्य अधिकारी जमले होते. जवळपास सगळ्यांनाच सभा कशासाठी बोलविली याची कुणकुण लागली होती. रामशेजवरून माणूस आला म्हटल्यावर त्याचे कारण काय असणार हे वेगळे सांगण्याची गरजच नव्हती. सभा सुरु झाली. किल्लेदाराने कोणताही वेळ न दवडता विषयाला हात घातला.

“समद्यांना ठावं हाय, दोन वर्सापासनं रामशेजचा किल्लेदार मुगल सैन्याशी लढून ऱ्हायला. पन आता गडावरली रसद संपाया लागली. त्यानं मदत मागितली हाये. गडाचा येढा आजूकबी उठलेला नाई. तवा आता आपन दोन गोष्टी करायच्या. येक म्हंजी

आपल्यातले काई लोकं मुगल सैन्यावर हल्ला करनार आनी एकदा का घमासान चालू झाली की मंग बाकीच्यांनी रामशेजवर रसद पुरवायची. तसा सांगावा अहिवंत गडाच्या किल्लेदारालाबी पाठवला हाय. पन आपल्याला आताच त्याबद्दल कायबी ठरीवता येनार नाई. संबाजी राजानंबी पयलेच रामशेजच्या किल्लेदाराला मदत कराया सांगितली हाये. मंग आता घ्या महादेवाचं नांव. पन येक गोष्ट करायची. येकदा का रसद गडावर यवस्थित पोचली की मंग लगोलग माघारी फिरायचं. समजलं?” त्र्यंबकच्या किल्लेदाराने फर्मान सोडले आणि हर हर महादेवचा जयघोष झाला.

क्षणाचाही विलंब न करता दोन हजार माणसे कामगिरीवर निघाली. रामशेज किल्ला जसा जवळ आला तसा दोन हजाराची फौज दोन भागात विभागली गेली. त्यातील एका भागात दीड हजार माणसे होती. ज्यांचे काम अचानक मुगल फौजेवर हल्ला करण्याचे होते आणि उरलेले पाचशे जण हे या वेळात गडावर रसद पोहोचवणार होते. अली देखील याच पाचशे जणांबरोबर होता.

अलीला जाऊन दोन दिवस झाले होते. त्याच्याकडील काहीही हाकहवाल किल्लेदाराला समजली नव्हती. तो वेढा भेदून बाहेर पडला किंवा पकडला गेला याबद्दल काहीही सांगता येण्यासारखे नव्हते. पण नक्कीच तो वेढा भेदण्यात यशस्वी झाला असणार असे त्याची मनोदेवता त्याला सांगत होती. तसे या काळात देखील जिवाशिवा परत एकदा हेरगिरी करून आले होते आणि कुणी पकडला गेला आहे अशी कोणतीही कुणकुण त्यांना लागली नव्हती.

तिसरा दिवस उजाडला. किल्लेदार नेहमीप्रमाणे तटावर जाऊन दूरवर नजर टिकवून होता. काही वेळात त्याला दोन दिशांनी धुळीचे लोट दिसू लागले. सैन्याची एक तुकडी नाशिकच्या बाजूने पुढे सरकत होती आणि दुसरी तुकडी दिंडोरीच्या बाजूने गडाकडे येत होती. येणारे सैन्य आपल्या बाजूचे की विरुद्ध बाजूचे हेच त्याला नीट उमजेना. पण जसजसे सैन्य पुढे येऊ लागले तसतसा त्याच्या चेहऱ्यावर आनंद दिसू लागला. दोन्ही कडील सैन्याबरोबर घोडागाड्या, बैलगाड्या दिसून येत होत्या. तसेच त्यांचे पेहेराव देखील मुगल सैन्यासारखे नव्हते. म्हणजेच अलीने त्याचे काम चोख बजावल्याची ती खुण होती.

मुगल सैन्य मात्र काहीसे बेसावध होते. एकतर अनेक दिवसांचा पहारा असल्यामुळे त्यांना थकवा जाणवत होता. दोन दिवसांपासून जरा कुठे त्यांना सवड मिळाली होती. एकदा का फत्तेखान आला की परत आराम असा मिळणारच नव्हता. काही वेळ होतो न होतो तोच त्यांना मराठा सैन्य दोन बाजूने येते आहे असे समजले. तसे इतर मनसबदार, जहागीरदार आणि सैन्य अधिकारी त्यांच्याबरोबर होतेच पण तरीही त्यांच्यात एकवाक्यता म्हणावी अशी नव्हती. त्यांनी इतर तयारी करेपर्यंत मराठा सैन्याने दोन बाजूंनी आक्रमण केले. दीड हजाराची कुमक त्रंबकगडावरून आली होती आणि जवळपास हजार माणसांची कुमक अहिवंत गडावरून आली होती.

समोरासमोर युद्धाला सुरुवात झाली. मुगल सैन्य तसे सहा सात हजाराचे होते पण थकलेले. त्यामानाने मराठा सैन्य जरी कमी होते तरी पूर्ण ताजेतवाने. तसेच असा गनिमी हल्ला करण्यात त्यांचा हात कुणी धरू शकणार नव्हता. तलवारींना तलवारी भिडल्या. सगळीकडे खणखनाट सुरु झाला. रक्ताचे पाट वाहू लागले. हर हर महादेव आणि अल्ला हु अकबरच्या घोषणांनी आसमान दणाणले. मुगल सैन्य हळूहळू माघार घेऊ लागले. आणि त्यातच त्रंबक गडावरून रसद घेऊन निघालेली तुकडी पुढे झाली. सगळ्यात पुढे अली स्वतः होता. त्या तुकडीला गडाचा वेढा भेदण्यास काहीही वेळ लागला नाही. किल्लेदार गडावरून हे सगळे पहात होता. त्याचे मन आनंदाने उजळले होते. अली जसा किल्ल्याच्या मुख्य दरवाज्यावर पोहोचला तसे किल्ल्याचे दरवाजे उघडले गेले. धान्याच्या पोत्यांनी भरलेल्या गाड्या दरवाज्यातून आत जाऊ लागल्या. काही वेळातच अहिवंत गडावरून आलेली कुमकही किल्ल्यावर पोहोचली. गडावरील लोकांमध्ये नवचैतन्य संचारले आणि मुगल सैन्य मात्र वाट फुटेल तिकडे पळत सुटले.

*झुंज : भाग १३ -*

मराठा सैन्याने ज्या प्रकारे हल्ला केला अगदी त्याच प्रकारे माघारही घेतली. जवळपास एक हजारावर मोगल सैनिक गारद झाले. जवळपास दीड ते दोन हजार जायबंदी झाले आणि बाकीचे मात्र स्वतःला वाचविण्यासाठी वाट फुटेल तिकडे पळून गेले. या वेळात संपूर्ण रसद गडावर पोहोचली होती. पण त्र्यंबकगड असो वा अहिवंत किल्ला दोन्ही ठिकाणी सुरक्षा देणे तितकेच महत्वाचे असल्यामुळे दोन्हीकडून आलेले मराठा सैन्य मागे फिरले. मराठा सैन्याने अतुलनीय पराक्रम गाजवला. तशी मराठा सैन्याची देखील हानी झालीच पण ती मोगलांच्या मानाने अगदीच नगण्य होती.

जवळपास ८ दिवसांनी फत्तेखान तीस हजाराची फौज घेऊन गडाखाली पोहोचला. त्याच्या बरोबर यावेळेस लांब पल्ल्याच्या तोफा, दारुगोळा, बंदूक दस्ता तसेच जवळपास तीन हजार घोडदळही होते. आधीची जवळपास दहा हजाराची फौज देखील त्याला मिळणार होती. त्यामुळेच हा किल्ला काही दिवसातच आपल्या ताब्यात येईल याबद्दल तो आश्वस्त होता. पण तिथे पोहोचल्यानंतर मात्र त्याचा पूर्णतः हिरमोड झाला. शहाबुद्दीन खानाने दिलेल्या वेढ्याचा पूर्ण बिमोड झालेला होता. सगळीकडे उध्वस्त छावण्या, मुगल सैन्याची प्रेते आणि जळके तंबू एवढेच काय ते दिसत होते. कित्येक जण तर फक्त जखमी झाल्यावर व्यवस्थित औषधोपचार न मिळाल्याने काळाच्या घशात गेले होते. शिकार न करता आयतेच खाद्य मिळाल्याने आजूबाजूच्या हिंस्र प्राण्याचा संचारही त्या ठिकाणी वाढलेला दिसून येत होता. बराचसा दारुगोळा नष्ट झाला होता. कित्येक दगडी तोफा निकामी करण्यात आल्या होत्या. मुगल सैन्याच्या अन्नधान्याच्या छावण्यांना आग लावण्यात आली होती आणि सगळीकडे एक प्रकारची प्रेतकळा पसरली होती.

१० हजार मुगल सैन्याची अशी अवस्था पाहून फत्तेखानाचा पारा चढला.

“सैय्यदशा... जल्दी जाव... यहां आसपास जितनेभी गांव है उसको जला दो. औरतोंको कैद करके यहां लेके आव. अगर कोई बच्चा, बुढा है तो उसका वहीपर सर कलम कर दो... अगर काई जवान हो तो उसको कैद कर लो... इन मरहट्टोको पता चलने दो... फत्तेखान क्या चीज है...” हुकुम देताना फत्तेखान रागाने थरथरत होता.

“जो हुकुम हुजूर...” म्हणत खानाला कुर्निसात करत सैय्यदशा बाहेर पडला. त्याने बरोबर तीनशे लोक घेतले आणि तो आशेवाडी गावाच्या दिशेने निघाला. तो जेव्हा गावात पोहोचला तेंव्हा संपूर्ण गांव ओस पडले होते. सगळ्या घराची दारे बंद होती. छोट्याशा गल्ली बोळात फक्त काही तरस आणि लांडगे फिरताना दिसत होते. मनुष्यप्राणी औषधालाही सापडत नव्हता. हे पाहून सैय्यदशा देखील चवताळला. त्या रागातच त्याने दिसेल ती झोपडी जाळायला सुरुवात केली. तो जेव्हा तिथून निघाला तेंव्हा तिथे फक्त राखेचे ढीग तेवढे उरले होते. हीच काहीशी अवस्था जवळपासच्या इतर पाड्यांचीही होती.

हे सगळेच किल्लेदाराला गडावरून दिसत होते पण त्याला फक्त बघ्याची भूमिका घेण्याखेरीज काहीही करता येणार नव्हते. तसे अशा गोष्टींनी विचलित होणे किल्लेदाराला शोभणार देखील नव्हते. त्याच्यापुढे आता वेगळाच प्रश्न उभा ठाकला होता. अन्नधान्य तर मुबलक मिळाले होते पण यावेळेस आलेला बादशहाचा फौजफाटा तिप्पट होता. त्याच बरोबर त्यांच्याकडे लांब पल्ल्याच्या तोफाही होत्या. दोन वर्ष किल्लेदाराने मोठ्या हिमतीने लढा दिला होता पण तीच हिंमत आपल्या सैन्यातही टिकवून ठेवण्याची कामगिरी त्याला करावी लागणार होती.

परत एकदा गडाला वेढा पडला. यावेळेसचा वेढा जरा जास्तच कडक होता. आधी दोन छावण्यांमधील अंतर दोन फर्लांगाचे होते. यावेळेस ते फक्त एक फर्लांग इतकेच ठेवले होते. थोडक्यात वेढा भेदणे आता जवळपास अशक्यच झाले होते. खानाने आक्रमण करण्याआधी सगळ्या मनसबदार, जहागीरदार, फौजदार यांची सभा बोलाविली. आधीच्या सैन्यातील जितके जण स्वतःचा जीव वाचवून पळाले होते त्यातील बरेच जण परत आले होते. आणि अशा लोकांची संख्या देखील काही कमी नव्हती. आधीच तीस हजारांची नव्या दमाची फौज आणि त्यात त्यांना मिळालेले जवळपास तीन ते चार हजार अपमानाने पोळलेले मुगल सैनिक.

एकेक करून सगळे अधिकारी फत्तेखानाच्या शामियान्यात जमू लागले. सगळे जमले आहेत याची खात्री केल्यावर खानाने सुरुवात केली.

“महान शहंशहा आलमगीर औरंगजेब और मुगल सल्तनत के वफादारों… दो साल से हम एक छोटेसे किलेपर अपना चांदसितारा लेहेरानेकी कोशिश कर रहे है, पर वो मरहट्टे, बुजदिलोकी तरह हमपर पथ्थर फेंक रहे है… ये मुगल फौजके लिए बेहद शर्म की बात है… अगर हम इस किलेपर फतेह नही करते तो हमे मुगल फौजके सिपाही केहेलानेका कोई हक नही है… क्या तुम सब भूल गये, तुमने कितनी जंगे जीती है? तो फिर इस बार क्या हुवा? तुट पडो उन चुहोपर… आलमगीर शहंशाहने ऐलान किया है, जो भी मुगल सिपाही उस काफर किलेदारका सर काटकर बादशहाको पेश करेगा उसे तुरंत पाच हजारकी मनसब और बादशहाकी खिलतसे नवाजा जायेगा. उसके साथ ही उसे दसहजार सोनेकी मोहरे बादशाहकी तरफसे भेंट की जायेगी…”

खानाचे बोल ऐकून नवीन सैनिकात उत्साह संचारला. जो तो मनसब मिळण्याची स्वप्ने पाहू लागला. अपवाद फक्त जुन्या सैनिकांचा होता. काहीसे असेच बोल शहाबुद्दीन खान बोलला होता आणि त्याची १० हजाराची फौज फक्त चार हजारांवर आली होती. तसेच त्याला अपमानास्पद रीतीने परत फिरावे लागले होते.

“गुस्ताखी माफ हुजूर…” उपस्थित अधिकाऱ्यांमधून आवाज आला. खानाने आवाजाच्या रोखाने पाहिले. शहाबुद्दीनच्या सैन्यातील एक अधिकारी मान खाली घालून उभा होता.

“बोलो… क्या बोलना है?” काहीसा तिरस्कारयुक्त दृष्टीक्षेप त्याच्याकडे टाकत खानाने विचारले.

“हुजूर… हमारी तोपोंके गोले वहां तक जातेही नही… इसीलिये अभीतक हमारी फतेह नही हुई…” त्याने खाली मानेनेच उत्तर दिले.

“तो?” खानाला त्याच्या बोलण्यातील आशय नीटसा समजला नाही.

“हुजूर अगर हम शुरुवात बडी तोपोंसे करेंगे तो जरूर फतेह हमारी होगी…”

“ठीक है…” खानाचा स्वर मवाळ बनला.

“दलेरखान… कल हम बडी तोपे दागेंगे… उसकी तय्यारी करो…” खानाने हुकुम सोडला आणि इतर काही गोष्टीची चर्चा करून सभा संपली.

किल्लेदार मात्र काहीसा चिंतीत बनला होता. त्याला गडावरून खानाने आणलेल्या नवीन लांब पल्ल्याच्या तोफा दिसत होत्या. याचाच अर्थ आलेला नवीन खान पुऱ्या तयारीनिशी आला होता. एक गोष्ट मात्र किल्लेदाराला समाधानकारक वाटत होती. ती म्हणजे त्याच्या माणसांनी बनविलेल्या लाकडी तोफा. आता खानाच्या तोफांना गडावरूनही काही प्रमाणात प्रत्युत्तर मिळणार होते. उरलेला प्रश्न होता तो फक्त मुगल फौजफाटा गडावरील सैन्यापेक्षा कैक पटीने जास्त होता या गोष्टीचा. आणि या प्रश्नांचे उत्तर फक्त एकच होते आणि ते म्हणजे एकेकाने दहा जणांना पुरून उरणे.

*झुंज : भाग १४ -*

दिवस उजाडला. खानाचा तोफखाना सिद्ध झाला. इकडे गडावर देखील किल्लेदाराने सगळ्यांना जमवून योग्य त्या सूचना दिल्या.

परत एकदा तोफा धडाडल्या. यावेळेस त्यांचा आवाज आधीच्या तोफांपेक्षा जास्त होता. तोफेच्या तोंडून बाहेर पडलेला गोळा बुरुजाच्या पायथ्याशी पडला आणि किल्लेदाराचे धाबे दणाणले. यावेळीही तोफगोळे बुरुजापर्यंत पोहोचणार नाही असेच किल्लेदार समजून होता पण या पहिल्याच तोफगोळ्याने त्याला वास्तवात आणले. त्याला काही समजायच्या आतच दुसरा गोळा बुरुजाला येऊन धडकला. जबरदस्त मोठा आवाज झाला आणि किल्लेदाराने सावधगिरी म्हणून किल्ल्याच्या तटाजवळ असलेल्या बायकामुलांना सुरक्षितजागी नेण्याचा हुकुम केला.

वेळ खरंचच आणीबाणीची होती. तटाजवळ थांबणे धोकादायक होते. पण तिथून बाजूला होणे त्यापेक्षाही धोकादायक ठरणार होते. काहीही करून खानाच्या तोफखान्याला निर्बंधित करणे गरजेचे होते. पण कसे? उत्तर एकच... प्रतिहल्ला...

“तुका...” किल्लेदारानं आवाज दिला.

“जी किल्लेदार...” तुका काहीसा पळतच किल्लेदाराजवळ हजर झाला.

“पुन्यांदा तुजी तोप वापरायची हाय आपल्याला...” किल्लेदाराने सांगितले आणि गडावर लगबग सुरु झाली. तुकाने बनविलेल्या दोन्ही तोफा दोन बाजूला ठेवण्यात आल्या. त्यातील एका तोफेच्या चामडी भागात तोफगोळा ठेवण्यात आला आणि काही वेळातच तो तोफेतून सुटला. हा गोळा खानाच्या तोफखान्याच्या काही अंतर समोर पडला आणि त्याचा स्फोट झाला. गोळ्याचे तुकडे इतस्ततः विखुरले गेले. कित्येक तुकड्यांनी बंदुकीच्या गोळीप्रमाणे आपले काम चोख बजावले. समोर असलेले अनेक जण जखमी झाले. काही वेळासाठी खानाची तोफ थंडावली. हा किल्लेदारासाठी शुभशकून होता.

“भले शाब्बास...” किल्लेदाराचा उत्साह दुणावला. किल्लेदाराच्या शाब्बासकीची थाप पाठीवर पडल्यामुळे गडावरील सैन्यात देखील उत्साह आला.

इकडे मात्र तोफखान्याच्या समोरच तोफगोळा पडल्याचे पाहून खान पूर्णतः संतापला.

“या अल्ला... इन मरहट्टोके पास तोपे कहांसे आयी? मैने तो सुना था, इस किलेपर एक भी तोप नही है?” त्याने त्याच्या अधिकाऱ्याला विचारले.

“हुजूर... जितना पता चला है... उपर एक भी तोप नही है...” त्याने घाबरत घाबरत उत्तर दिले.

“तो? ये जो गोला किलेपरसे आया है वो क्या किसीने हाथसे फेका है?” खानाने संतापून विचारले.

“-“ काय बोलावे हे न समजल्याने तो अधिकारी मान खाली घालून उभा राहिला.

“बोलो...” खान परत गरजला...

“गुस्ताखी माफ हुजूर...”

खरे तर जी अवस्था अधिकाऱ्याची होती तशीच काहीशी अवस्था खानाचीही होती. काय होते आहे ते त्याला तरी कुठे समजत होते? तेवढ्यात एका घोडेस्वाराने खानाजवळ येवून मुजरा केला.

“हुजूर... अल्ला कि मेहेर हुई है... पीछे की तरफ से किलेकी तटबंदी तुट गयी है...” त्याने खानाला माहिती दिली आणि खानाचा राग कुठल्या कुठे पळाला.

“बहोत बढीया...” म्हणत खानाने घोड्याला टाच मारली आणि तो गडाच्या मागील बाजूस निघाला.

खान आला त्यावेळेस तोफखान्याचा गडावर जोरदार मारा चालू होता. काही वेळापूर्वी गडावरून येणारे तोफगोळे काहीसे थांबले होते. खानाने वर पाहिले त्यावेळेस गडाच्या तटबंदीला खिंडार पडले होते. सैय्यदशा तिखट मारा करत होता.

“सय्यदशा... किलेपर हमला करो...” त्याने उत्साहात सांगितले...

“जी हुजूर...” म्हणत सय्यदशाने जवळपास २ हजार पायदळ बरोबर घेतले आणि गड चढायला सुरुवात केली. गडावरून काहीही प्रतिसाद येत नव्हता त्यामुळे त्याचा उत्साह वाढत होता. जवळपास अर्धा गड चढून झाला आणि परत अघटीत घडले. किल्ल्यावरून हर हर महादेवच्या घोषणांनी परिसर दणाणला. कुणाला काही समजण्यापूर्वीच मोठमोठे दगड खाली घरंगळत आले आणि त्यांनी त्यांचे काय चोखपणे बजावले. हा अनुभव जुन्या सैन्याला असला तरी खानाच्या नवीन सैन्यासाठी पूर्णतः नवा होता. त्यामुळे त्यांच्यात हाहाकार माजला. एकेक जण जायबंदी होऊ लागला आणि मुगल सैन्याला पुढे पाऊल टाकणे दुरापास्त झाले. शेवटी त्यांना माघार घ्यावी लागली. स्वतः सैय्यदशा देखील अगदी थोडक्यात बचावला होता.

माघारी परतणारे सैन्य पाहून मात्र खानाचा पारा चढला. पण वरून होणारा दगडांचा मारा इतका तिखट होता की स्वतः खानाला देखील माघार घ्यावीच लागली असती.

आतापर्यंत सूर्य अस्ताला गेला होता. थंडीचा कडाका वाढला होता. सैन्य देखील थकले होते त्यामुळे मग दुसऱ्या दिवशी सकाळीच गडावर पुन्हा तोफांचा मारा करण्याचे त्याने ठरवले. या वेळेस देखील जवळपास हजार जण निकामी झाले होते.

सकाळ उजाडली तसा तोफखाना तोफगोळ्यांचा मारा करण्यासाठी सज्ज झाला. सैय्यदशा तोफखान्याजवळ पोहोचला. त्याने वर पाहिले आणि त्याचे डोळे विस्फारले. डोके गरगरले. आपण काय पाहतो आहोत त्यावर त्याचा विश्वासच बसेना. तेवढ्यात खानही तिथे आला. त्याचीही गत सैय्यदशा सारखीच होती. ज्या ठिकाणी तटबंदीला खिंडार पडले होते ते रात्रीतून बुजवण्यात आले होते. किल्ल्याची तटबंदी पुन्हा पहिल्या सारखीच दिमाखात उभी होती. त्याला ती आपल्यावर हसते आहे असा भास झाला. आणि त्याच्या मनात आता फक्त एकच विचार घोळत होता... तो म्हणजे... “किल्ल्यावर माणसेच आहेत की भुते???”

*झुंज : भाग १५ -*

आज खान काहीसा शांत होता. खरे तर त्यांचे शांत राहणे ही नव्या वादळाची चाहूल होती. एकीकडे त्याचे शामियान्यात फेऱ्या घालणे चालू होते तर दुसरीकडे त्याचा दाढी कुरवाळण्याचा चाळाही चालूच होता. त्याला इथे येऊन देखील बरेच दिवस झाले होते. या काळात त्यानेही अनेकदा गडावर चढाई करण्याचा प्रयत्न केला पण प्रत्येक वेळेस त्याला माघारच घ्यावी लागली. हा गड ताब्यात घेणे त्याला आधी जितके सोपे वाटले होते तितकेच ते किती आवघड आहे हेही त्याला मनोमन पटले. पण हार मानणे हे त्याच्या स्वभावात नव्हते. जी नामुष्की शहाबुद्दीन खानावर आली ती आपल्यावर येऊ नये हेच त्याला वाटत होते. तसे झाले तर त्याने मारलेल्या मोठमोठ्या बढाया चारचौघांत उघड्या पडणार होत्या. त्यातून बादशहाची मर्जी खफा होणार हे वेगळेच. विचार करता करता त्याला एक कल्पना सुचली आणि त्याच्या चेहऱ्यावर उत्साह दिसू लागला. त्याने त्या आवेशातच आवाज दिला.

“कौन है बाहर…”

“जी हुजूर…” लवून कुर्निसात करत एक पहारेकरी आत आला.

“जाव… सैय्यदशा को बुलाके लाव…” त्याने फर्मान सोडले.

“जी हुजूर…” म्हणत पहारेकरी आला तसा बाहेर पडला. काही वेळातच सैय्यदशा त्याच्या समोर हजर होता.

“सैय्यदशा… कल जैसे ही सुरज ढलने लगे… तुम छोटी तोपोसे किलेपर आगेसे हमला करोगे…” त्याने सैय्यदशाला हुकुम सोडला.

“गुस्ताखी माफ हुजूर… पर… छोटी तोपे?” सैय्यदशा गोंधळला.

“हां… छोटी तोपे…”

“हुजूर… बडी तोपोके गोले भी कभी कभी किलेतक जाते नही, फिर छोटी तोपे?” त्याने अडखळत विचारले.

“वो इसलिये के हमे हमला आगेसे नही, पिछेसे करना है…” गालातल्या गालात हसत खान म्हणाला आणि सैय्यदशाच्या डोक्यात प्रकाश पडला.

संध्याकाळ झाली तसा खानाचा तोफखाना सक्रीय झाला. तोफा धडधडू लागल्या. तोफांचे गोळे किल्ल्याच्या दिशेने पडू लागले. पण एकही गोळा किल्ल्याच्या तटबंदीपर्यंत पोहोचत नव्हता. किल्ल्यावरील सर्वजण मुगल सैन्याचा हा उद्योग पहात होते. किल्लेदार स्वतः तटावर उभा राहून मुगल सैन्यावर नजर ठेऊन होता. बराच वेळ झाला पण या एका गोष्टीशिवाय इतर कोणतीही हालचाल दिसत नव्हती. हळूहळू अंधार वाढत होता. अमावस्या असल्याने आकाशात आज चंद्रही नव्हता. सगळीकडे मिट्ट काळोख. उजेड फक्त खानाच्या छावणीत आणि तोफ डागल्यावर जो धमाका होत होता त्याचाच. आता मात्र किल्लेदाराच्या मनात संशय उत्पन्न झाला. आज अचानक मुगल सैन्याला काय झाले असावे? लहान तोफांचा गोळा किल्ल्यापर्यंत पोहोचत नाही हे माहिती असूनही चढाईसाठी लहान तोफांचा वापर? यात नक्कीच काहीतरी काळेबेरे आहे. आणि त्याच्या डोक्यात प्रकाश पडला. त्याने धावत जाऊन आपला घोडा गाठला. इतरांना मात्र किल्लेदाराच्या मनात काय चालू आहे हेच समजेना. एका उडीतच त्याने घोड्यावर मांड ठोकली. घोड्याने जणू आपल्या धन्याचे मन वाचले होते. काडीचाही विलंब न करता त्याने रपेट चालू केली. काही क्षणातच तो किल्ल्याच्या मागील तटबंदीवर पोहोचला.

अंधार वाढला तसा सैय्यदशाने जवळपास तीनशे शिपाई गोळा केले. प्रत्येक जण हा अगदी तयार गडी. एकाच वेळेस चार जणही अंगावर घेऊ शकेल असा. सैय्यदशाने सगळ्यांना योग्य त्या सूचना दिल्या आणि त्यांची पावले गडाच्या मागील दिशेस वळली. रात्री एरवी मशाली किंवा टेंभे हाती घेवून निघणारे सर्वजण आज चक्क अंधारात डोळेफोड करत निघाले होते. सैय्यदशा या सगळ्यांचे नेतृत्व करत होता. मुगल सैन्याच्या या तुकडीने गड चढायला सुरुवात केली. प्रत्येकाचे पाऊल अंधारात

देखील अगदी सावधगिरीने पडत होते. कुणाच्याही तोंडून साधा चकार शब्दही ऐकू येत नव्हता. काही ठिकाणी काही जण ठेचकाळत होते पण तरीही त्यांच्या तोंडून अवाक्षरही बाहेर पडत नव्हते. सैय्यदशाचा तसा हुकूमच होता. तसे अर्धा डोंगर पार करणे त्यांच्यासाठी काही विशेष नव्हते. खरा धोका होता तो त्यानंतर. कारण आतापर्यंत गडावरील लोकांनी जो पर्यंत अर्धा डोंगर चढून होत नाही तो पर्यंत कोणताही प्रतिहल्ला केला नव्हता. एकतर नाशिकची थंडी. त्यातून रात्रीच्या वेळेस वाहणारे गार वारे आणि तशातच मुगल सैनिक आपल्या जीवाची पर्वा न करता गड ताब्यात घ्यायचाच या ध्येयाने झपाटले होते. यातील कित्येक जणांच्या मनात प्रत्येक वेळेस माघार घ्यावी लागल्याच्या अपमानाची सलही होतीच. कधी नव्हे तो त्यांनी पूर्ण डोंगरमाथा सर केला होता. तोही रात्रीच्या अंधारात. गडावरून मात्र कोणतीही हालचाल दिसत नव्हती. सगळीकडे निरव शांतता पसरली होती. आवाज फक्त रातकिड्यांचा.

किल्लेदार जसा गडाच्या मागील बाजूस आला तेव्हा त्याला तेथील सर्वच जण अगदी सावध असलेले दिसले.

“काय रे... काई हालचाल दिसून ऱ्हायली का?” त्याने आल्या आल्या प्रश्न केला.

“व्हय जी, आता तुमाकडं निगालो व्हतो...” कुनीतरी दबा धरून येऊ ऱ्हायले.

“अस्सं? यीवू द्या... त्यांना बी पानी पाजू आपन...” किल्लेदाराच्या चेहऱ्यावर स्मित उमटले.

मुगल तुकडी पूर्णपणे गडाच्या बुरूजाजवळ जमा झाल्याची खात्री करून सैय्यदशाने तटबंदीवर दोर टाकण्याचे फर्मान सोडले. अर्थात दिलेला हुकुम अगदी हळू आवाजात होता. अंगावर दोराचे गुंढाळे घेतलेले १०/१२ जण पुढे आले. त्यांनी दोराला गाठ बांधायला सुरुवात केली. अगदी थोड्याच वेळात हे काम पूर्ण झाल्यावर दोराच्या एका टोकाला लोखंडी कड्या बांधण्यात आल्या आणि दोर तटबंदीवर फेकले गेले. त्यानंतर त्याला हिसका देऊन ते व्यवस्थित खाचेत आडकले आहेत याची खात्री करून, एकेकाने दोराच्या साह्याने बुरुजाच्या बाजूने तटबंदी चढायला सुरुवात केली.

किल्लेदारासह तेथील पहारेकरी दबा धरून बसलेलेच होते. तसे मशालींचा मिणमिणता उजेड त्यांना तटबंदीच्या आतल्या बाजूला काय हालचाल चालू आहे हे दिसण्यासाठी पुरेसा होता. मुगल सैन्याने फेकलेल्या दोरावर पडत असलेला ताण त्यांना स्पष्ट दिसू लागला. याचाच अर्थ दोरावरून गनिमांनी चढायला सुरुवात केली होती. अगदी हळूच त्यांनी आपल्या तलवारी म्यानातून बाहेर काढल्या. मशालीच्या मंद प्रकाशात त्या तलवारी अगदीच तळपत होत्या. अगदी दबक्या आवाजात एकेक जण दोराजवळ भिंतीच्या आडोशाने उभे राहिले. प्रत्येक जण आता पूर्णतः सज्ज झाला होता. अगदी काही क्षणच गेले असतील आणि प्रत्येक दोर लावलेल्या ठिकाणी मुगल सैनिकांची डोकी दिसू लागली. ते सर्वजण गडावरील परिस्थितीचा अंदाज घेत होते तेवढ्यात मराठयांच्या सगळ्या तलवारी हवेत फिरल्या. तोंडातून कोणताही आवाज न करता एकेक शीर धडावेगळे झाले. इतके होते न होते तोच काही जण कुऱ्हाडी घेऊन पुढे झाले. एकेका वारात एकेक दोर तुटला आणि त्याला लटकलेले मुगल सैनिक खाली उभ्या असलेल्या सैनिकांच्या अंगावर कोसळले.

“या अल्ला... काफिर आया... भागो...” असा एकच गलका पिकला. पण कुणालाही जिवंत जाऊ देण्याच्या मनस्थितीत किल्लेदार नव्हता. त्याचा आवाज आसमंतात फिरला...

“गड्यांनो... येकबी गनीम जित्ता जाऊ द्यायाचा नाई... टाका धोंडे समद्यांवर...” किल्लेदाराचा हुकुम होण्याचा अवकाश आणि वरून मोठमोठे दगड खाली उभ्या असलेल्या सैन्यावर पडू लागले. एकच ओरडा चालू झाला. वरून हर हर महादेव, जय शिवाजी, जय शंबूराजे अशा असंख्य घोषणांनी आसमान दणाणले. मुगल सैन्याने पळून जाण्याचा पूर्ण प्रयत्न केला पण रात्रीच्या अंधारात त्यांना ते शक्य झाले नाही. कित्येक जण फक्त तोल गेल्यामुळे दरीत कोसळले. कित्येकांनी स्वतःला वाचविण्यासाठी आपल्या समोर असलेल्या आपल्यास शिपायास धक्का देऊन दरीत पाडले. मराठ्यांच्या या हल्ल्यात स्वतः सैय्यदशा देखील स्वतःचे प्राण वाचवू शकला नाही. आलेली पूर्ण तीनशे जणांची तुकडी अगदी थोडक्या अवधीत स्वतःचे प्राण गमावून बसली. काही वेळ खालून काही आवाज येत नाही हे पाहून किल्लेदाराने दगडांचा मारा बंद करण्यास सांगितले आणि परत एकदा गडावर जयघोष चालू झाला.

गडावरून येणारे आवाज कुणाचे आहेत हे तोफखान्याच्या आवाजात फतेहखानाला नीटसे समजले नाहीत. तो मात्र सैय्यदशाने

गड काबीज केलाच असणार अशाच भ्रमात राहिला. पण बराच वेळ होऊनही जेव्हा गडावरून खुणेची मशाल दिसली नाही तेंव्हा मात्र त्यांने दोन तीन शिपायांना सैय्यदशाच्या तुकडीची हाकहवाल घेण्यासाठी पाठवले. शिपाई जेव्हा तिथे पोहोचले तेंव्हा पूर्वेकडे तांबडे फुटू लागले होते. हळूहळू दिवसाचा प्रकाश वाढत गेला आणि त्यांना त्यांच्याच माणसाची प्रेते दिसू लागली. बरेच जण फक्त अंगावरील पोशाखावरून हे मुगल सैनिक आहेत हे समजत नव्हते. जवळपास ८/१० धडांवर शिरेच नव्हती. ती दूर कुठेतरी जाऊन पडली होती. स्वतः सैय्यदशाचे शिरही गायब होते. त्याच्या पोशाखावरून त्याची ओळख पटली. आपण मराठ्यांच्या नजरेस पडलो तर आपल्याला देखील परत जाणे शक्य होणार नाही हा विचार करून तिघेही मुगल सैनिक आल्या पावली परत फिरले. गडावरून किल्लेदारासह त्याचे शिपाई त्या तिघांवर लक्ष ठेवून होते. किल्लेदाराचा हुकुम झाला असता तर तेही परत गेले नसते पण किल्लेदाराने मुद्दाम त्यांना जिवंत सोडले होते. जेणेकरून ही गोष्ट मुगलसैन्यात पसरली जाईल आणि मुगल सैन्याचे धैर्य आणखीन खचेल.

*झुंज : भाग १६ -*

आपला सर्वात खास पराक्रमी योद्धा, सैय्यदशाला आलेला असा मृत्यू फतेहखानाच्या जिव्हारी लागला. खरे तर सैय्यदशाला मरण्याआधी तलवार काढण्याचीही संधी मिळाली नाही हेच मुळी त्याच्या पचनी पडत नव्हते. मुगल तुकडीच्या मागावर गेलेले तीनही शिपाई त्याच्या समोर मान खाली घालून उभे होते. त्याने परत त्यांना विचारले.

“क्या सब मारे गये?”

“जी हुजूर…” खाली मानेनेच तिघांमधील एक जण म्हणाला.

“सैय्यदशा के बारे में बताव…”

“हुजूर… जब हम वहां पहुचे, तो सैय्यदशा का जिसम पडा हुवा था. उनकी समशेर भी मियानमे ही थी. पर उनके जिसमपर सिर नही था…” काहीसे बिचकत त्याने सांगितले.

“अगर सिर नही था तो वो सैय्यदशा था या कोई और ये तुमको कैसे मालूम?” काहीसे संतापाने खानाने विचारले.

“हुजूर… उनके कपडोंसे…” त्याने उत्तर दिले आणि खान विचारमग्न झाला. सैय्यदशाने बरोबर घेतलेला प्रत्येक जण कसलेला योद्धा होता आणि युद्ध न करताच त्यांच्यावर ही वेळ आली होती.

मुगल सैन्यात जेव्हा ही बातमी समजली तेंव्हा त्यांच्यात हळूहळू कुजबुज सुरु झाली. प्रत्येक जण या घटनेला वेगवेगळे रंग देऊ लागला. त्यातच अनेक अफवाही निमार्ण झाल्या. कुणी म्हणत की गडावरील किल्लेदार जादुगार आहे. कुणी म्हणे त्याने भूत प्रसन्न करून घेतले आहे. मुगल सैन्यातील जे लोकं हिंदू होते त्यांनी याचा संबंध एकदम रामाशी जोडला होता. त्यांच्या मते स्वतः रामराया गडाचे राखण करतो आहे. याचा परिणाम असा झाला की मुगल सैन्यातील अनेक अधिकारी मोहिमेवर जाण्यास टाळाटाळ करू लागले. अनेक जण हे आपण माणसाशी लढू शकतो, भूतांशी नाही हे खाजगीत बोलू लागले.

रोज कोणती ना कोणती नवीन वावडी खानाच्या कानावर येऊ लागली. हे सगळे थांबवणे खूप गरजेचे झाले. एकदा का सैन्याने माघार घेतली तर एकटा खान काहीही करू शकणार नव्हता. शेवटी याचा काहीतरी सोक्षमोक्ष लावायचे खानाने ठरवले.

परत एकदा सभा भरली. यावेळेस खानाने फक्त सगळ्यांचे ऐकून घ्यायचे ठरवले.

“हुजूर… गुस्ताखी माफ…” एका अधिकाऱ्याने काहीसे बिचकत सुरुवात केली.

“हां… बोलो… क्या बोलना है…”

“हुजूर… सब केहेते है…” इतके बोलून तो थांबला…

“हां… बोलो…”

“हुजूर… वो किलेदार है ना, उसने भूत को प्रसन्न किया है…” एका दमात त्याने वाक्य बोलून टाकले.

“क्या बकते हो?” खान संतापला.

“हुजूर… मै नही, बाकी सब बोलते है…” अधिकारी पुरता गडबडला.

“गधे है सब… भूत, जिन्न ऐसा कुछ नही होता… सब वहम है… इतना भी तुम्हे पता नही?” खान भडकला.

“गुस्ताखी माफ हुजूर… पर…” अधिकारी बोलायचे थांबला.

“पर क्या?”

“हुजूर... आप ही सोचो... हमने क्या क्या नही किया... पर हर बार हमारा ही नुकसान हुवा... सरदार शहाबुद्दीनखान ने इतना बडा दमदमा बनाया था... दोन दिन मे खाक हो गया... हम शामतक किलेकी दिवार तोडते है, सुबह वो वैसी की वैसी दिखाई देती है. हमारे तीनसौ लोग रात के अंधेरेमे वहां गये और उनको लडना भी नसीब नही हुवा. वो किलेदार तो रात के अंधेरेमे भी साफ साफ देखता है और हमपे हमला भी करता है. हमारे सात हजार सिपाही मरते है और उनका एक भी आदमी नही मरता... सबको पता है किलेपर एक भी तोप नही है पर तोप के गोले हमपर गिरते है. और उसकी आवाज भी नही आती. क्या ये कोई आम आदमी कर सकता है?”

अधिकाऱ्याचे बोल ऐकून खानही विचारात पडला. आतापर्यंतच्या सगळ्या घटना पाहिल्या तर त्या अविश्वसनीयच होत्या. कडव्या राजपुतांचे बंड मोडून काढणारा शहाबुद्दीन खान दोन वर्ष प्रयत्न करूनही यशस्वी झाला नव्हता. स्वतः फतेहखान देखील काही महिन्यांपासून किल्ला मिळविण्याचा आटोकाट प्रयत्न करत होता पण परिणाम शून्यच.

“ठीक है... अब?” खानाचा स्वर मवाळ बनला.

“हुजूर... नासिकमे ऐसे बहोत मांत्रिक है... अगर उनकी मदत ली तो?” अधिकाऱ्याचा स्वर बदलला.

“लेकीन मुझे अबभी लगता है... भूत या जिन्न नही होते...” यावेळेस बोललेले खानाचे वाक्य अगदीच गुळमुळीत होते.

“हुजूर... इतना किया है तो ये भी करके देखते है...” दुसरा अधिकारी काहीसा शूर बनला.

“ये भी ठीक है... बुलाव फिर...” खानाने परवानगी दिली आणि सभा संपली.

दोन दिवस खान आणि तोफखाना दोन्ही शांतच होते. नेहमीप्रमाणे त्याचा शामियान्यात फेऱ्या घालण्याचा उद्योग चालू होता आणि तेवढ्यात हुजऱ्या आत आला. खानाला लवून कुर्निसात करत त्याने सैन्य अधिकारी भेटायला आल्याची वर्दी दिली.

“अंदर भेजो...” हुजऱ्याकडे लक्षही न देता खानाने हुकुम सोडला. काही वेळातच जवळपास तीन सैन्य अधिकारी आणि एक मांत्रिक खानापुढे हजर होते.

खानाने मांत्रिकाकडे निरखून पाहिले. काळी कफनी, गळ्यात कवड्यांच्या आणि पोवळ्यांच्या माळा, कपाळी काळे गंध आणि हातात मोरपिसांचा झाडू घेतलेला मांत्रिक उभा होता. मध्येच त्याचे डोळे फिरवणे, तोंडाने समजणार नाही असे काहीतरी बडबडणे आणि मधूनच हातवारे करणे चालू होते. त्याचा तो अवतार पाहूनच खानाचा पारा चढला. असे लोकं फक्त पैसे उकळतात इतकेच त्याला माहित होते. पण त्याने महत्प्रयासाने स्वतःच्या रागावर नियंत्रण मिळवले. ही गोष्ट त्याला स्वतःला जरी पटणारी नव्हती तरीही मुगल सैन्याच्या भीतीवर काही प्रमाणात मलमपट्टी ठरणार होती. आणि तोच विचार करून त्याने मांत्रिकाला बोलावले होते.

*झुंज : भाग १७ -*

“तुम किला फतेह कर सकते हो?” खानाने प्रश्न केला.

“जी हुजूर... पर...” मांत्रिकाच्या चेहऱ्यावर धन कमाविण्याची हाव खानाला स्पष्ट दिसली. त्याचे माथे ठणकले. पण याच्यावर काही धन खर्च करून फौजेचे मनोबल वाढणार असेल तर तो सौदा देखील खानासाठी फायद्याचा ठरणार होता. म्हणूनच तो गप्प राहिला.

“पर??? आगे बोलो...” काहीशा चढ्या आवाजात खानाने फर्मावले.

“हुजूर... वहां एक नही बहोत सारे भूत है... उन सबको वशमे करना पडेगा... उसका खर्च थोडा जादा होगा...” मांत्रिकाने सांगितले. त्याच्या चेहऱ्यावरील कुटिल भाव स्पष्ट जाणवत होते.

“आगे बोलो...”

“हुजूर... इसके लिए मुझे एक सोनेका नाग बनवाना पडेगा... फिर उसकी पूजा होगी, तो वो सिद्ध हो जायेगा. उसके बाद वो अपनी हर इच्छा पुरी करेगा. तो एक क्या सौ भूतोंपर भारी पडता है...”

“ठीक है... इसके लिए कितना खर्च होगा?” खानाने विचारले.

“उसके लिए सौ तोला सोना चाहिये...” काहीसे अडखळत मांत्रिकाने सांगितले.

“ठीक है... सबकुछ मिल जाएगा...”

“हुजूर... दो दिन बाद पुनव है... उसी दिन हम उस नाग की मदत से किला जीत लेंगे...” खानाला खुश करण्यासाठी मांत्रिक म्हणाला आणि त्यांची भेट संपली.

दोन दिवसांनी १०० तोळे सोन्याचा नाग हातात घेऊन मांत्रिक खानापुढे हजर झाला. खानाच्या शामियान्याच्या बाहेर त्याने पूजा मांडली. त्या पूजेच्या मधोमध त्याने सोन्याचा नाग ठेवला आणि तोंडाने असंबद्ध शब्दोच्चार चालू झाले. जवळपास सर्वच सैन्य अधिकारी त्याची पूजा पाहण्यास हजर झाले होते. स्वतः खान देखील मांत्रिकाचा खेळ पहात होता. जवळपास घटकाभर त्याचा हा खेळ चालला. त्यानंतर त्याने तो नाग स्वतःच्या हातात घेतला आणि गडावर आक्रमण करण्यासाठी खानाची परवानगी मागितली.

काही वेळातच खानाचे सैन्य पुन्हा तयार झाले. यावेळेस सैन्याच्या सगळ्यात पुढे डोक्यावर नाग घेऊन मांत्रिक चालत होता. त्याच्या मागोमाग काही अधिकारी आणि त्यांच्या मागे जवळपास तीन ते चार हजार पायदळ. सर्वांनी गड चढायला सुरुवात केली.

हे सगळेच किल्लेदार त्याच्या साथीदारांसह तटबंदीवरून पहात होता. आज कुणीतरी काळे कपडे घातलेला माणूस त्या सगळ्या सैन्याचे नेतृत्व करत होता. त्याच्या डोक्यावर काहीतरी चमकत होते पण ते नक्की काय आहे हे मात्र त्याला नीटसे समजले नाही. ते जसे अर्धा डोंगर चढून वर आले तेंव्हा किल्लेदाराच्या लक्षात सगळा प्रकार आला. त्याला खानाच्या या कृत्याचे हसू आले.

“कामून हासून ऱ्हायले किल्लेदार?” तात्याने विचारले.

“ह्यो खान तर लैच येडा हाये तात्या...” किल्लेदार हसून म्हणाला.

“येडा? आन त्यो कसा?” तात्या गोंधळला.

“तात्या... आपन ऐकत नाई म्हनून त्यानं मांत्रिकाला बोलीवला... आता त्यो मांत्रिक काय करनार हाय?”

“पन किल्लेदार... त्याच्या मागं फौज बी हाय की...”

“असू दे ना... आपल्याकडं दगड धोंडे काय कमी हायेत का?” किल्लेदार हसला आणि तात्यालाही हसू आले.

“तात्या... आपल्या समद्या पोरास्नी बोलव... आन त्येंना सांग बरुबर तुमची गलोरीबी घिवून या...”

“जी किल्लेदार...” खरे तर किल्लेदार पोरांना का बोलावतो आहे हेच मुळी तात्याच्या ध्यानात आले नाही. पण किल्लेदाराने बोलावले म्हटल्यावर नाही तरी कसे म्हणणार?

काही वेळात पोरं गलोरी घेऊन किल्लेदारासमोर हजर झाले.

“कारं पोरांनो... आज युध करनार का?” त्याने विचारले आणि पोरांना आनंद झाला.

“व्हय किल्लेदार...” सगळ्यांनी एक सुरात उत्तर दिले.

“आज म्या तुमची नेमबाजी पहानार हाये... तुमी दावणार ना?”

“व्हय...”

“मंग आता गडाच्या खाली पघा... त्यो काळा डगला घातलेला मानुस हाय नव्हं, त्याच्यावर समद्यांनी गलोरी तानायची.” गड चढत असलेल्या मांत्रिकाकडे बोट दाखवत किल्लेदाराने सांगितले. मांत्रिकाकडे पाहिल्यावर पोरे थोडीशी गडबडली.

“त्येच्यावर?” त्यांच्या स्वरात गोंधळ उडालेला पूर्णतः दिसून येत होता.

“व्हय...”

“पर किल्लेदार...”

“का? काय झालं?” किल्लेदाराने विचारले.

“माजी आय म्हनते, सादूच्या आन मांत्रिकाच्या नादी लागायचं नाय...” त्यांच्यातील एक जण उत्तरला.

“कामून?”

“आवं... त्ये लोकं आपल्यावर खाक फुकून पाखरू बनिवता, उंदीर बनिवता. कदी कदी त दगुड बी बनतो मानसाचा...” त्याने सांगितले आणि किल्लेदाराला हसू आले.

“आरं... असं काय बी नस्तं. आन त्यानं अशी खाक फुकली त आपला देव हाय ना... ह्यो रामाचा गड हाये. रामाचं नाव घेतलं की भूतं बी पळत्यात. ह्यो तर मानुस हाये...” किल्लेदाराने सांगितले आणि पोरं विचारात पडली.

“काय बरुबर ना?”

“जी किल्लेदार...” पोरांनी एकसुरात उत्तर दिले.

“मंग घ्या रामाचं नांव आन ताना गलोरी त्या बाबावर...” किल्लेदाराने सांगितले आणि मुलांच्या गलोरी ताणल्या गेल्या.

मधूनच वर पहात अगदी सावधपणे डोक्यावर नाग घेऊन मांत्रिक गड चढत होता. त्यालाही तटावर माणसे दिसत होती. मनातून तो पूर्णतः घाबरला होता. कुठून आपण सोन्याच्या मोहाला बळी पडलो आणि या ठिकाणी आलो असेच त्याचे मन

त्याला सांगत होते. पण आता वेळ निघून गेली होती. मागे मुगल सैन्य असल्यामुळे परत फिरणे त्याला शक्यच नव्हते. त्याचा हाच विचार चालू होता आणि एक छोटासा दगड त्याच्या कपाळावर लागला. त्याच्या तोंडून आवाज निघतो न निघतो तोच एका पाठोपाठ एक दगड त्याच्या अंगावर आपटू लागले. त्याच्या हातून सोन्याचा नाग केंव्हाच दूर जाऊन पडला. तो खाली कोसळला तरीही दगडांचा मारा संपला नव्हता. त्या छोट्या दगडांनी त्याला कित्येक जखमा केल्या होत्या. त्याच्या आरोळ्यांनी आसमंत दणाणून गेले. आजपर्यंत त्याने सांगितले म्हणून कित्येकांना दगडाने ठेचून मारले गेले होते. त्या सगळ्याचे फळ त्याला या रूपाने मिळत होते. काही वेळातच त्याचा आवाज बंद झाला आणि गडावरून परत एकदा मोठे दगड गडगडत येण्यास सुरुवात झाली. खानाच्या सैन्यात हाहाकार माजला. यावेळेस जो मोठे दगड वाचवत होता त्याला गलोरीचा प्रसाद मिळत होता. दोन ते तीन घटकातच जवळपास हजारएक लोकं कामास आले आणि मागे असलेले सैनिक पुढच्या तुकडीची ही गत पाहून मागच्या मागे पळून गेले.

खानाच्या हा डाव देखील नेहमीप्रमाणे त्याच्यावरच उलटला.

*झुंज : भाग १८ -*

जरी खानाने वरवर दाखवले नाही तरी ही घटना त्याच्यावर खूपच नकारात्मक परिणाम करून गेली. त्यानंतरही त्याने काही दिवस वेगवेगळे प्रयत्न केले पण त्याचा एकही प्रयत्न यशस्वी झाला नाही. पण त्याला माघार घेणेही कमीपणाचे वाटत होते आणि त्यामुळेच आपले सैन्य हकनाक बळी पडत आहे हे माहित असूनही त्याला गड घेण्यासाठी प्रयत्न करत रहावे लागत होते. बरे कोणतीही शक्कल लढवली तरी त्याचा परिणाम फक्त एकच होता. आणि तो म्हणजे त्याची हार.

आजही खान आपल्या शामियान्यात नेहमीसारख्या फेऱ्या घालत होता, तेवढ्यात हुजऱ्या आत आला. त्याने खानाला कुर्निसात केला आणि बादशहाकडून जासूद आल्याची वर्दी दिली. क्षणाचाही विलंब न लावता खानाने त्याला आत बोलावले. बादशहाने कोणता हुकुम पाठवला असणार हे खानाने आधीच ओळखले. जासुदाने बादशहाचा खलिता खानाच्या स्वाधीन केला. जी गोष्ट घडू नये असे खानाला वाटत होते तीच गोष्ट त्याच्या नशिबी आली. बादशहाने त्याला रामशेजच्या स्वारीची सूत्रे कासम खानाच्या सुपूर्द करायला सांगितली आणि त्याची तळकोकण प्रांतात परस्पर रवानगीही केली होती. पण जो पर्यंत कासम खान मोहिमेची सूत्रे हातात घेत नाही तो पर्यंत मात्र फतेहखानाला तिथेच थांबण्याचा आदेशही देण्यात आला होता.

शहंशहाचा खलिता मिळाल्यापासून जवळपास ५ दिवसांनी कासम खान बरोबर १० हजाराची फौज घेऊन हजर झाला. ही फौज पूर्णतः नवीन दमाची होती. जवळपास १५ हजाराची फौज तिथेच ठेवून उरलेली फौज घेऊन फतेहखान तळकोकणाकडे रवाना झाला.

पुढील काही दिवस कासमखानाने देखील गड घेण्याचे आटोकाट प्रयत्न केले पण सगळे विफल झाले. शेवटी त्याने गडाला वेढा देऊन वाट पाहण्याचे ठरवले.

गडावरील रसदही संपत आली होती. कासमखानाने गडावरील हमला पूर्णतः बंद केला आणि त्यामुळेच हळूहळू किल्ल्यावरील लोकांची बेचैनी वाढत होती. पण त्यांच्या हातात यावर उपाय करण्यासारखे काहीही नव्हते.

रायगडावर संभाजी महाराज चिंताग्रस्त वाटत होते. त्रंबक गडावरून रामशेज बद्दलची माहिती आठवडा / १५ दिवसांच्या अंतराने त्यांना मिळतच होती पण अगदी इच्छा असूनही त्यांना रामशेजच्या मदतीला जाणे शक्य होत नव्हते. स्वतः बादशहा औरंगजेब औरंगाबादला तळ ठोकून होता. जंजीऱ्याचा सिद्धी, गोव्याचे पोर्तुगीस, औरंगजेब बादशहाने स्वतःकडे फितूर केलेले मराठे सरदार आणि पोर्तुगीजांनी फितूर केलेला मराठा सरदार सावंत यांच्याशी महाराजांच्या चकमकी उडत होत्या. आणि त्यामुळेच त्यांना रामशेजकडे लक्ष देणे जमत नव्हते. जवळपास तीन वर्षांपासून रामशेज एकटा झुंजत होता. आणि अजूनही त्याने हार मानली नव्हती. असा किल्ला मुगलांच्या हाती जाऊ द्यायला महाराजही तयार नव्हते. शेवटी त्यांनी मनाचा निश्चय केला आणि रामशेजच्या मदतीला कुमक पाठवायचे निश्चित केले. गडाला वेढा घालून बसलेल्या मुगल फौजेचे संख्याबळ जवळपास २५००० होते. तेवढे सैन्य पाठवणे महाराजांना शक्य नव्हते. शेवटी त्यांनी रुपाजी भोसले आणि मानोजी मोरे या दोन सरदारांना रायगडावर बोलावले.

दोन दिवसातच दोघेही सरदार महाराजांपुढे हजर झाले.

“आज्ञा महाराज…” महाराजांना मुजरा करून रुपाजी उभे राहिले.

“रुपाजी, मानोजी… बसा…” महाराजांनी त्यांना बसायला सांगितले. दोघेही स्थानापन्न होताच महाराजांनी सुरुवात केली.

“तुम्ही तर जानताच सध्या स्वराज्यासाठी आपणा सर्वांनाच जीवाचे रान करावे लागत आहे. एकही दिवस उसंत नाही. आणि याचाच फायदा मुगल बादशाह उचलतो आहे. त्याने नाशिकप्रांतात धुमाकूळ माजवला आहे. गेल्या तीन वर्षांपासून रामशेजचा किल्लेदार एकटा मुगल फौजेशी झुंज देतोय. तसे त्याला त्र्यंबक गडाचा किल्लेदार आणि अहिवंत किल्ल्याचा किल्लेदार यांनी रसद पुरवली पण ती कितीशी असणार? औरंगजेबाने या दरम्यान तीन सरदार बदलले आहेत. रामशेजचा किल्लेदार स्वतः शूर आहेच पण आपल्या रयतेचे काय? रसद संपली तर स्वतःच्या प्राणांचे बलिदान किंवा मुगलांचा अमल यापैकी एक गोष्ट त्यांच्या

वाट्याला येईल. आणि असे झाले तर आम्हाला राजा म्हणवून घेण्यास काय अभिमान वाटणार? हे राज्य रयतेचे आहे. इथे आपण रयतेसाठी लढा देत आहोत. त्यामुळे तुम्ही दोघांनी तत्काळ रसद घेऊन रामशेजच्या मदतीला जा. पण एक लक्षात ठेवा... कोणताही आततायी निर्णय घेऊ नका. यावेळेस आपल्याला लढाई करायची नाही तर किल्लेदाराला रसद पुरवायची आहे.” महाराजांनी नेमकी गोष्ट दोघांना सांगितली.

“आपल्या मनाप्रमानंच हुईल महाराज... काळजी नसावी...” मानोजींनी त्यांना आश्वस्थ केले.

“आणि किल्लेदाराला आमचा निरोपही कळवा... तुमच्या सारखे मर्द मराठे स्वराज्याचे रक्षक असल्यामुळेच आम्ही निश्चिंत आहोत...”

“जी महाराज...” महाराजांना मुजरा करून दोघांनीही राजांच्या निरोप घेतला.

दोघेही सरदार बरोबर फक्त पाचशे घोडेस्वार घेऊन निघाले. खरे तर रुपाजी मनातून काहीसे हिरमुसले होते. महाराजांनी स्पष्ट शब्दात त्यांना शक्यतो लढाई न करण्यासाठी बजावले होते. एकावेळेस पाच पन्नास माणसांना अंगावर घेण्याची धमक असलेला शूर गडी खानाच्या सैन्यासमोर जाऊनही फक्त लपून बसून वाट पाहणार ही गोष्ट त्यांना काहीशी खटकत होती. पण स्वराज्यासाठी प्रसंगानुरूप वागण्याची कलाही दोघांनी चांगलीच साधली होती आणि याच गोष्टीमुळे महाराजांनी त्यांची निवड केली होती.

मराठा तुकडी जशी नाशिक प्रांतात शिरली तशी त्यांनी सगळ्यात पहिली भेट पट्टा किल्ल्याला दिली. तेथील किल्लेदाराकडून संपूर्ण रसद स्वतःच्या ताब्यात घेऊन त्यांनी रामशेजकडे प्रयाण केले.

*झुंज : भाग १९ -*

दोघेही सरदार जसे रामशेज जवळ पोहोचले त्यांना किल्ल्याच्या चहुबाजूला मुगल सैन्य दिसत होते. काहीशा दुरूनच त्यांनी कुठे वेढा कमजोर पडला आहे हा याची पाहणी केली. पण यावेळेस त्यांना वेढ्यात कुठेही थोडीही ढिलाई दिसली नाही. त्यातून मुगल फौज संख्येने इतकी जास्त होती की त्यांच्याशी समोरासमोर लढाई करणे म्हणजे स्वतःहून आत्महत्या करण्यासारखे होते. अर्थात एरवी त्यांनी याही गोष्टीला मागेपुढे पाहिले नसते पण राजांचा हुकुम होता. त्यांच्या हातात वाट पाहण्याखेरीज काहीच नव्हते. तरीही एक दोन वेळेस सरदार रुपाजींनी आपल्या काही निवडक स्वरांना घेऊन वेढा तोडण्याचा प्रयत्न केलाच. पण त्यात त्यांना यश येऊ शकले नाही.

गडावरील रसद मात्र दिवसेंदिवस संपत होती. जास्तीत जास्त १५ दिवस पुरेल इतकेच धान्य गडावर होते. किल्लेदाराच्या चेहऱ्यावर उमटणारी चिंता त्याच्या बायकोला दिसत होती पण ती तरी काय करणार?

तीन दिवस असेच गेले आणि किल्लेदाराने परत एकदा सभा बोलावली.

“गड्यांनो... तीन वर्स झालं... आपन किल्ला झुंजवला. बादशानं सरदार बदलले पन आपन हार मानली नाई. पर आता ह्यो सरदार येगळाच हाये. निस्ता येढा दिवून बसून ऱ्हायला. आपन त्याच्यासंग टक्कर घ्यायची तर आपन फक्त ५०० आन त्ये २५०००. आपन खाली उतरलो तर हकनाक मरनार. नाय गेलो तर उपासमारी. तुमाला काय वाटतं? आपन काय कराया पायजेल?” त्याने सगळ्यांपुढे प्रश्न टाकला.

“किल्लेदार... ज्ये काय व्हयाचं त्ये हु दे... पर आपन माघार घ्यायची नाई.” एक तरुण पुढे येत उत्तरला.

“हा किल्लेदार...” इतरांनी देखील त्याच्या सुरात सूर मिसळला. तात्या मात्र यावेळेस गप्पच होता. किल्लेदाराने त्याच्याकडे पाहिले.

“तात्या... काय झालं?” किल्लेदाराने प्रश्न केला.

“मनात येक इचार आला...” तात्या अनवधानानं बोलून गेला.

“कसला?” किल्लेदाराने विचारले.

“आपन येक काम करू शकतो... आपल्याकडं १५ दिसांची रसद हाये. पन आपण एकाच वक्ताला जेवन घ्येतलं तर ती रसद आपल्याला २५ दिस पूरंल.” त्याने आपला विचार बोलून दाखवला.

“तात्या... दोन दिस एका वक्ताला खानं येगळं. पन आपलं समदं पोटावर चालतं. बरं आपन निभाऊन निऊ पन आपल्या संग बायकापोरं बी हायेत...” किल्लेदार उत्तरला. आणि तात्या शांत बसला. शेवटी एकभुक्त राहणे एक दोन दिवस ठीक पण त्यानंतर माणसातील शक्ती क्षीण होत जाते हे किल्लेदार चांगलेच जाणून होता. शेवटी काही गोष्टी ह्या दैवाधीन बनतात. ही गोष्टही आता त्याच बाजूला झुकत चालली होती. किल्ल्यावरील कित्येक स्त्रियांनी तर देवाधर्माचे नाव घेऊन उपास करायला सुरुवात केली. किल्लेदाराला देखील हे समजत होते पण त्याचा नाईलाज होता.

जवळपास १० दिवस झाले. प्रत्येकाच्या चेहऱ्यावरील तेज दिवसेंदिवस कमी होत होते. चेहरे कोमेजले होते. देवाचा धावा करण्याशिवाय त्यांच्याकडे दुसरी कोणतीच गोष्ट उरली नव्हती.

खानालाही गडावरील हालचाली मंद झालेल्या जाणवल्या आणि तो मनातून सुखावला. त्याचा उत्साह वाढला. त्याने वेढा अजूनच कडक केला. जी गोष्ट या पूर्वीच्या सरदारांना जमली नाही ती गोष्ट आपण कमीतकमी लोकं गमावून मिळवणार आहोत याची त्याला जणू खात्रीच पटली. अजून काही दिवस आणि गड काहीही न करता आपल्या ताब्यात येणार ही गोष्टच त्याला खूप सुखदायक वाटत होती.

गडावरील लोकं वेगवेगळ्या देवाचा धावा करत होते आणि त्यांची हाक देवाने ऐकली. उन्हाचा कडाका कमी होऊन पावसाळ्याला सुरुवात झाली. तसेही नाशिक भागातील पाऊस तो. एकदा सुरु झाल्यावर कित्येक वेळेस तर तीन तीन दिवस उघडत नाही. जसा पाऊस सुरु झाला तसे रुपाजी आणि मानोजी यांचे चेहरे खुलले. याच पावसाचा आधार घेऊन आपण आपली कामगिरी फत्ते करावी याची त्यांनी मनात खुणगाठ बांधली.

तीन दिवस सलग पाऊस चालू असल्यामुळे मुगल सेनेची पुरती त्रेधातिरपिट उडाली. सगळीकडे चिखलाचे साम्राज्य पसरले. दोन तीन वर्षांपासून सारखे युद्ध चालू असल्यामुळे आणि त्यात अनेकांनी आपले प्राण गमावल्यामुळे कित्येक मृतदेह तसेच पडले होते. पावसामुळे ते सडले आणि त्याची दुर्गंधी पूर्ण परिसरात पसरली. तो वास इतका त्रीव्र होता की कित्येकांना तिथे श्वास घेणे दुरापास्त होऊ लागले. कित्येक जण त्यामुळे होणाऱ्या रोगाला बळी पडले. याचा परिणाम असा झाला की दोन दिवस खानाला वेढ्यामध्ये ढील द्यावी लागली. जंगलाकडील भागातील लोकं दोन दिवसांसाठी तिथून बाजूला झाले आणि मराठा सैन्याला जागा मिळाली.

तो दुर्गंधीयुक्त परिसर तुडवत प्रत्येकाने गडाची वाट धरली. सगळ्यात पुढे दोन्ही मराठे सरदार होते. पाऊस काहीसा उघडला म्हणून किल्लेदार पाहणीला निघाला होता. त्याला दोन्ही सरदार गडाच्या दिशेने येताना दिसले. खानाने नवीन डाव टाकला असा समज करून त्याने आपल्या साथीदारांना बोलावले. भुकेने अर्धमेल्या झालेल्या लोकांमध्ये युद्धाचे नांव ऐकताच चैतन्य फुलले. तटाभोवती मोठमोठे दगड ठेवले गेले आणि आता फक्त किल्लेदाराची आज्ञा होण्याची ते वाट पाहू लागले.

दोन्ही सरदार अजून काहीसे जवळ आले आणि किल्लेदाराने त्यांना ओळखले. त्यांच्या बरोबर संभाजी महाराजांचे निशाण होते. सैन्य तुकडीच्या मागे किल्ल्यासाठी रसद असलेल्या गाड्या होत्या. आपल्याला मदत आली आहे हे किल्लेदाराने ओळखले. पण खात्री करून घेणेही तितकेच गरजेचे होते.

दोन्ही सरदार किल्ल्याच्या दरवाज्यात येताच किल्ल्याच्या दरवाज्याची झडप उघडली गेली.

“कोन हाये?” दाराच्या झडपेमधून डोकावलेल्या माणसाने प्रश्न केला.

“म्या सरदार रुपाजी भोसले आन ह्ये सरदार मानोजी मोरे... राजांनी रसद पाठविली हाये...” रुपाजींनी उत्तर दिले. झडपेतून बाहेर आलेले डोके बाजूला झाले. काही वेळ गेला आणि परत ती व्यक्ती दिसू लागली.

“खून दावा आदी...” त्याने फर्मान सोडले. एरवी एवढे मोठे सरदार दारात उभे आहेत म्हटल्यावर त्याने धावत जाऊन दरवाजे उघडले असते. पण यावेळेस परिस्थिती आणीबाणीची होती. कुणावरही पटकन विश्वास ठेवणे धोक्याचे होते.

“ही पहा...” मनोजींनी खुणेची मुद्रा बाहेर काढली. त्याकडे त्याने एकदा निरखून पाहिले आणि मग तत्काळ दरवाजा उघडला गेला. स्वतः किल्लेदाराने दोन्ही सरदारांचे स्वागत केले. रुपाजींनी किल्लेदाराला महाराजांचा निरोप कळवला. किल्लेदाराच्या अंगावर मुठभर मांस चढले.

कामगिरी फत्ते करून दोन्ही सरदार परत फिरले. जेव्हा पाऊस उघडला तेंव्हा खानाने परत वेढा कडक केला. पण त्याला गडावरील हालचाली वाढल्याचे जाणवले. महाराजांचा जयघोष ऐकू येऊ लागला. आता मात्र खान कोड्यात पडला. अगदी क्षीण झालेल्या मराठ्यांमध्ये एकदम इतका जोष आलेला पाहून त्याचे डोके ठणकले. आणि त्याला दोन दिवस वेढा उठविल्याची आठवण झाली. त्याने डोक्यावर हात मारून घेतला. शेवटी त्याने बादशहाला पत्र पाठवून सगळी परिस्थिती सांगून वेढा उठविण्याची परवानगी मागितली. अगदी नाईलाजाने बादशाहने ती परवानगी दिली आणि जवळपास साडेतीन वर्षांनी रामशेजचा वेढा उठला.

*झुंज - भाग २०*

संभाजी महाराज आपल्या तंबूत पुढच्या मोहिमेबद्दल विचार करत होते आणि तेवढ्यात हुजऱ्या आत आला. त्याने छत्रपतींना लवून मुजरा केला.

“महाराज... जासूद आलाय...” त्याने सांगितले.

“आत पाठव त्याला...” छत्रपतींनी हुकुम सोडला. जासुदाने आत येताच महाराजांना मुजरा केला.

“काय खबर?”

“महाराज... आपल्याच मानसांनं घात केला. सरदार नागोजी मानेनं फितुरी केली. त्यांच्या संग आजूक काई मराठे सरदारबी बदशाला फितूर झाले...” त्याने एका दमात खबर सांगितली.

“काय? स्वराज्याशी फितुरी? स्वधर्माशी बेईमानी? शिवशंभू...” छत्रपतींच्या चेहऱ्यावर क्रोध दिसू लागला.

“जी म्हाराज...” जासुदानं खाली मानेनेच होकार दिला.

“अजून काय खबर?” स्वतःच्या रागावर नियंत्रण मिळवत छत्रपतींनी विचारले.

“सरनौबत हंबीरराव आन सरदार संताजी विजापूरकडं रवाना झाले. पन मिरज आन बेळगाववर मुगलांचा चांदसितारा फडकला.” त्यांने सांगितले आणि महाराज काहीसे विचारात पडले.

“ठीक आहे...” छत्रपतींनी जासूदाला निरोप दिला. सध्या त्यांना मिळणाऱ्या बातम्या बऱ्याचशा अशाच पद्धतीच्या होत्या. एक चांगली बातमी मिळाली की त्याबरोबर दोन वाईट बातम्या त्यांच्या कानावर पडत होत्या. एक तर त्यांना एक दिवसही व्यवस्थित आराम मिळत नव्हता. आणि त्यात या गोष्टींची भर. त्यांचे विचारचक्र जोराने फिरत होते आणि तेवढ्यात पुन्हा हुजऱ्या आत आला.

“रामशेजवरनं जासूद आलाय...” त्याने वर्दी दिली. रामशेजचं नांव ऐकलं आणि छत्रपतींचे मन काहीसे बेचैन झाले. गेल्या साडेतीन वर्षांपासून तेथला किल्लेदार अगदी तुटपुंज्या साधनानीशी बादशहाच्या हजारोंच्या मुगल सैन्याशी झुंजत होता. इतर कुणी किल्लेदार असता तर आतापर्यंत किल्ला मुगलांच्या ताब्यात गेला असता पण या पठ्ठ्याने अजूनही हिंमत सोडलेली नव्हती. आता मिळणारी बातमी चांगली की वाईट याचा मात्र त्यांना अंदाज लागेना.

“आत पाठव...” त्यांनी आपले मन काहीसे कठोर करून हुकुम केला.

“म्हाराजांचा विजय असो...” आलेल्या जासुदाने महाराजांना लवून मुजरा केला.

“काय खबर?”

“आनंदाची खबर हाये म्हाराज... मुगल सैन्याचा रामशेजचा येढा उठला...” त्याने अगदी आनंदाने सांगितले...

“आई भवानीमातेची कृपा...” म्हणत छत्रपतींच्या चेहऱ्यावर आनंद दिसू लागला.

“किल्लेदाराला आम्ही बोलावल्याचे सांगा...” असे म्हणत त्यांनी जासूदाला निरोप दिला.

जवळपास ५ दिवसांनी रामशेजचा किल्लेदार संभाजी महाराजांच्या छावणीत आला.

“या किल्लेदार... तुम्ही पराक्रमाची शर्थ केलीत... आम्ही खुश आहोत. आई भवानीचा आशीर्वाद आणि मोठ्या महाराजांचा

मान तुम्ही राखलात. तुमची जितकी तारीफ करावी तितकी कमीच आहे...” छत्रपतींनी किल्लेदाराच्या पाठीवर शाब्बासकीची थाप दिली.

“म्या भरून पावलो... आमच्यासाठी राजं देवाचा अवतार... त्योच आमच्यासाठी देव. आज देवाचा आशीर्वाद मिळाला आम्हास्नी... पन या समद्यात गडावरील हरेक मानसानं शिकस्त क्येली...” किल्लेदार म्हणाला आणि महाराजांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला. तसेही हल्ली असे आनंदाचे क्षण त्यांच्यासाठी दुर्मिळच झाले होते. काही दिवसांपूर्वीच काही महत्वाचे सरदार मुगलांना स्वतःच्या स्वार्थापायी मिळत असताना असे काही किल्लेदार मात्र स्वराज्याशी इमान राखून होते हीच गोष्ट राजांसाठी खूप अभिमानाची होती.

“किल्लेदार... तुमच्या या पराक्रमावर आम्ही बेहद खुश आहोत... आमच्याकडून तुम्हाला नजराणा तर मिळेलच पण तुमच्यावर आनखी मोठी जबाबदारी टाकण्याचा आमचा मानस आहे...” छत्रपतींनी सांगितले.

“आज्ञा म्हाराज... माज्यासाठी ह्योच मोठा नजराना हाये... हुकुम करा... मोहिमेवर रुजू होन्यास येका क्षनाचीबी देरी व्हायची नाई...” तलवारीच्या मुठीवर आपला हात ठेवत किल्लेदार उत्तरला.

“आम्हाला हीच अपेक्षा होती... १० दिवसांनी विजापूरकडे जायचे आहे... नागोजी माने फितूर झाले. आता तुम्हाला सरनौबत हंबीररावांना मदत करायची आहे...” छत्रपतींनी सांगितले आणि किल्लेदाराचा चेहरा उजळला. सरनौबत हंबीररांव मोहिते हे साक्षात छत्रपतींचे सासरे. पराक्रमाच्या बाबतीत ते कितीतरी वरच्या बाजूला. त्यांच्या बरोबर असलेले सरदार देखील त्यांच्या तोडीचे. आणि त्यांच्या बरोबर आपल्याला युद्धावर जाता येणार यातच किल्लेदाराला स्वतःचा अभिमान वाटला.

“तुमच्या जागी आता रामशेजवर नवीन किल्लेदाराची आम्ही निवड करत आहोत. त्याच्या ताब्यात गडाच्या किल्ल्या द्या आणि तुम्ही तिकडूनच मोहिमेवर रुजू व्हा...” छत्रपतींनी किल्लेदाराला आज्ञा केली आणि त्यांचा निरोप घेऊन किल्लेदार रामशेजच्या वाटेला लागला.

*झुंज : भाग २१ -*

दोन दिवसांनी किल्लेदार रामशेजवर पोहोचला. आल्या बरोबर त्याने आपल्या पत्नीला छत्रपतींच्या भेटीचा वृत्तांत कथन केला. तसेच लगेचच नवीन किल्लेदाराच्या ताब्यात गड देऊन सरनौबत हंबीरराव मोहित्यांच्या मदतीला जाण्याचे छत्रपतींचे फर्मानही सांगितले. आपल्या पतीला मिळालेला हा बहुमान पाहून त्याची पत्नीचे उर अभिमानाने भरून आले. ही बातमी काही क्षणातच संपूर्ण गडावर पसरली. ज्याच्या त्याच्या तोंडी संभाजी महाराजांनी केलेल्या किल्लेदाराच्या बहुमानाचाच विषय होता. खरे तर दर चार सहा वर्षांनी किल्लेदार बदलत होता. कित्येक वेळेस तर एक किल्लेदार एका ठिकाणी फक्त काही महिनेच अधिकारी म्हणून काम बघत असे. त्यामुळे गडावरील लोक आणि किल्लेदार यांच्यात सहसा तितका जिव्हाळा दिसून येत नसे. पण इथे मात्र चित्र पूर्णतः बदलले होते. किल्लेदारावर प्रत्येक जण जीव ओवाळून टाकत होता. त्याने तसा सगळ्यांनाच लळा लावला होता. एकीकडे किल्लेदारावर छत्रपतींनी टाकलेल्या विश्वासाचा अभिमान आणि दुसरीकडे यामुळेच होणारी त्यांची ताटातूट. आणि हेच कारण होते की प्रत्येक जण एकच विषय बोलत होता.

किल्लेदार आल्याच्या तिसऱ्याच दिवशी नवीन किल्लेदार गडावर हजर झाला. हा नवीन किल्लेदार जुन्या किल्लेदारापेक्षा वयाने काहीसा लहान होता. नवीन दमाचा. सहा फुट उंच, सावळा रंग, रुंद बांधा आणि सरदार म्हणून शोभू शकेल असा तरणाबांड गडी.

जुन्या किल्लेदाराने त्याचे खुल्या दिलाने स्वागत केले. परत एकदा सभा बोलवली गेली.

“गड्यांनो... आपलं राजं म्हंजी देवाचाच अवतार... त्यांच्याच आज्ञेनं आपन ह्यो गड बादशाला मिळू दिला नाई. शेवटी त्योबी त्रासला आन येढा सुटला. पन त्याचा काय भरोसा नाय. त्यो अवरंगाबादला तळ ठोकून हाये. त्याचा कोनचा बी सरदार कदीबी परत हमला करू शकतो. म्हनून आपन सावध ऱ्हायला पायजे. धाकल्या म्हाराजांनी मला इजापूरच्या मोहिमेवर जायला सांगितलं हाये. माह्या जागी ह्ये नवीन किल्लेदार आता गडाचं राखन करनार हायेत. तवा जी मदत तुमी मला केली तीच मदत यांना बी करायची हाये. आपन समदे स्वराज्याची रयत. याचपायी आपन जीव द्यायला बी तयार असलं पायजेल. पुना आपली भेट हुईल, ना हुईल... पन जवर बादशा हितं हाय तवर आपली झुंज संपलेली नाई... ह्ये समद्यांनी ध्यानात ठिवा आन आमचा रामराम घ्या...” इतके बोलून किल्लेदार उठून उभा राहिला. अनेकांच्या डोळ्यांच्या कडा ओलावल्या.

“हर हर महादेव...” असंख्य घोषणांनी वातावरण दुमदुमले.

दुसऱ्याच दिवशी किल्लेदाराने गडावरील आपला गाशा गुंधाळला. गडाच्या चाव्या नवीन किल्लेदाराच्या स्वाधीन केल्या. बरोबर काही निवडक स्वार आणि आपला कुटुंबकबिला घेऊन किल्लेदार रामशेजचा गड उतरू लागला.

रामशेजच्या किल्लेदाराने गड सोडून जवळपास ४/५ महिने झाले होते.

औरंगजेब बादशहाचा दरबार भरला होता. प्रत्येक ठिकाणचे हेर येऊन बादशहाला बातम्या देत होते. आज बादशहा जरा खुश होता आणि त्याचे कारण म्हणजे कोकणातील अनेक मोहिमेत त्याच्या फौजांनी चांगली कामगिरी केली होती. आणि एवढ्यात एक हेर त्याच्या पुढ्यात आला. बादशाहाला त्याने लवून कुर्निसात केला.

“क्या खबर है?” बादशहाने विचारले.

“हुजूर... त्रंबकगडके किलेदारको संबाने वापस बुलाया है...” त्याने खबर दिली आणि त्रंबकचे नांव ऐकताच बादशहाला रामशेजची आठवण झाली. मध्यंतरीच्या काळात त्याला या गडाचा पूर्णतः विसर पडला होता. तसे त्याला तिथे नवीन किल्लेदार आल्याचे समजले होते पण कुतुबशाहीचा पूर्ण बिमोड करण्यासाठी त्याने या बातमीकडे जरासे दुर्लक्ष केले होते. त्याचे डोळे आनंदाने चमकले. ज्याने रामशेज झुंजवला तोही बदलला होता आणि त्याला मदत करणारा त्र्यंबकचा किल्लेदार

देखील बदलला म्हटल्यावर त्याच्या मनात परत एकदा रामशेजची जखम ताजी झाली.

“इखलास खान...” त्याने इखलास खानाला आवाज दिला.

“जी जहांपना...”

“तुम दस हजार फौज लेकर रामशेज जाव... जो भी हो... जैसे भी हो... रामशेजपे अपना चांदसितारा फडकाना...”

“ऐसा ही होगा जहांपना...” तलवारीच्या मुठीवर हात ठेवत खान उद्गारला.

“ये बात तो शहाबुद्दीन खान, फतेहखान और कासम खान भी बोला था... पर हुवा क्या? सबको खाली हाथ लौटना पडा... इसलिये अब मुझे सिर्फ फतेह चाहिये...” बादशहा काहीसा उखडला. कारण हेच वाक्य तो चौथ्यांदा या छोट्याशा किल्ल्याबद्दल ऐकत होता. शहाजहानने आपली कारकीर्द हाच किल्ला जिंकून सुरु केली होती आणि तोच किल्ला औरंगजेबाला घेता येत नव्हता.

दहा हजारांची फौज घेऊन इखलासखानाने रामशेजच्या तळाशी आपले ठाण मांडले. खरे तर रामशेज साठी ही गोष्ट नवीन राहिलेली नव्हती. त्यामुळे आलेल्या नवीन किल्लेदाराने तेच धोरण स्वीकारले जे पहिल्या किल्लेदाराने स्वीकारले होते. अनेक दिवस झाले पण इखलासखानाला यश मिळत नव्हते. अजून काही दिवसांनी आपली देखील बादशहाकडून खरडपट्टी काढली जाणार या एकाच गोष्टीची त्याला चिंता वाटत होती. तेवढ्यात त्याच्या मनात विचार आला. किल्लेदार तर बदलला आहे. मग पुन्हा पहिल्या पासून सुरुवात केली तर? काय हरकत आहे? कोणताही विलंब न करता त्याने त्या योजनेचे पहिले पाऊल टाकले.

*झुंज : भाग २२ -*

औरंगजेब बादशहा आपल्या आपल्या शामियान्यात बसला होता. शेजारीच तीन मौलवी कुराण आणि हदीसच्या प्रती घेऊन त्यात तोंड खुपसून बसले होते. बहुतेक कोणत्या तरी मोठ्या विषयावर बादशहाने त्यांचे मत मागितले होते आणि त्यावर धर्मशास्त्र काय सांगते याच गोष्टीची ते पडताळणी करत होते. तेवढ्यात हुजऱ्या आंत आला. त्याने बादशहाला कुर्निसात केला आणि नाशिकहून जासूद आल्याची वर्दी दिली. नाशिकचे नांव ऐकताच बादशहाने लगबगीने त्याला आत पाठवण्यास सांगितले.

“बोलो... क्या संदेसा लाए हो?” त्याने विचारले. जासुदाने कुर्निसात करून आपल्या जवळील इखलासखानाचा संदेश बादशहाच्या सुपूर्द केला. बादशहाने तो स्वतःच वाचायला सुरुवात केली. बादशहा संदेश वाचत असताना त्याच्या चेहऱ्यावर मात्र कोणतेच भाव दिसून येत नव्हते. संदेश वाचून झाल्यावर बराच वेळ बादशहा विचार करत होता.

“कौन है बाहर?” बादशहाने एकाएकी आवाज दिला आणि हुजऱ्या आत आला.

“जल्द से जल्द मुल्हेर के सरदार को यहां बुलानेका इंतजाम करो...” बादशाहने हुकुम सोडला.

पाचव्या दिवशी मुल्हेर किल्ल्याचा किल्लेदार सरदार नेकनामखान बादशहापुढे हजर झाला.

“नेकनामखान... तुम बडी चतुराईसे साल्हेरके किलेदारको पातशाहीकी खिदमतमे लाए थे... वहां जंग होती तो हमारा भी बहोत नुकसान होता. तुम्हारी सुझबुझसे हम बहोत खुश है... अब यही काम तुम्हे रामशेजके लिए करना है... अगर तुम ये काम करते हो तो तुमको पांचहजारी मनसबसे नवजा जायेगा और तुम्हे नगद १५००० दिये जाएंगे...” बादशहाने त्याला आमिष दिले.

“आपकी मेहेर है जहांपना... आपका फर्मान हमारे लिए खुदा का फर्मान है... थोडेही दिनोमे रामशेज आपका किला केहेलायेगा...” बादशहाला कुर्निसात करत नेकनामखान माघारी वळला.

मुल्हेर किल्ल्यावरील एका प्रशस्त दालनात तीन जण मसलत करीत बसले होते. एक होता मुल्हेर किल्लेदार नेकनामखान, दुसरा होता इखलासखान आणि तिसरा व्यक्ती होता पेठचा जमीनदार अब्दुल करीम. कसेही करून रामशेजवर चांदसितारा फडकवायचा ह्याच एका विषयावर त्यांचे खलबत चालू होते. बराच वेळ त्यांची मसलत चालू होती. शेवटी त्यांच्यात एकमत झाले आणि काहीशा प्रसन्न चेहऱ्याने अब्दुल करीम तिथून बाहेर पडला.

मुल्हेरवरून परतल्यावर इखलास खानाने आपला वेढा बराचसा ढिल्ला सोडला. वेढ्याच्या नावावर फक्त घटका दोन घटकांनी गडाच्या फेऱ्या चालू झाल्या.

आज रामशेज गडाच्या मुख्य दरवाजावर एक दूत उभा होता. त्याने दरवाजा ठोठावला. त्याची पूर्ण तपासणी करून त्याला आता घेण्यात आले. नवीन किल्लेदार आपल्या माणसांबरोबर सल्लामसलत करत बसला होता. इतक्यात हुजऱ्या आत आला.

“काये?” किल्लेदाराने विचारले.

“किल्लेदार... जमीनदार अब्दुल करीमचा मानुस आला हाये...” हुजऱ्याने सांगितले. अब्दुल करीम हा या परिसरातील एक नामवंत जमीनदार आहे हे किल्लेदार चांगले जाणून होता. पण त्याचे आपल्याकडे काय काम असावे? किल्लेदार विचारात पडला.

“आत पाठव...” किल्लेदाराने फर्मान सोडले. काही वेळातच जासूद आत आला. त्याने किल्लेदाराला मुजरा करून आपल्या जवळील खलिता किल्लेदाराच्या स्वाधीन केला. किल्लेदाराने तो स्वतःच्या ताब्यात घेऊन वाचायला सुरुवात केली. खलित्यात जमीनदाराने किल्लेदाराशी भेट घेण्याचा मानस बोलून दाखवला होता. काहीसा विचार करून आणि योग्य ती काळजी घेऊन

किल्लेदाराने त्याची भेट घेण्याचे ठरवले. कोणत्याही शस्त्राविना फक्त एका व्यक्तीसह जमीनदाराने भेटीस किल्ल्यावर यावे असा त्याने निरोप पाठवला.

दिवस ठरला. वेळ ठरली आणि ठरल्या वेळेला जमीनदार अब्दुल करीम आपल्या एका माणसाला बरोबर घेऊन किल्लेदाराच्या भेटीला आला.

“बोला जमीनदार... आज इकडं कुठं?” किल्लेदाराने विचारले.

“हुजूर... हम तो सुकून पसंद आदमी है... सियासतसे हमारा क्या लेना देना?” जमीनदाराच्या बोलण्यावरूनच त्याच्या स्वभावाचा अंदाज येऊ लागला.

“नाई म्हंजी... तुमी आसंच येनार नाई हे ठावं हाये आम्हाला...” यावेळेस किल्लेदाराचा स्वर अगदी रुक्ष होता.

“गुस्ताखी माफ हुजूर... पर हम आपके लिए मुल्हेरका किलेदार नेकनामखान का संदेश लाए है...” जमीनदार एकेक शब्द अगदी तोलून मापून बोलत होता.

“मुल्हेरचा किल्ला तर मुगल बादशहाने घेतलाय ना?” किल्लेदार सावध झाला.

“जी हुजूर...”

“मंग त्याचं माज्याकडं काय काम?”

“हुजूर... आप तो जानते है... साल्हेर मुल्हेरपर मुगलोन्का अधिकार हो गया है, त्र्यंबक और अहिवंत को भी उनकी फौजोने घेरा है. यहां भी इखलास खान डेरा जमाये बैठा है. इस किलेपर ना तोपे है ना लोग. पहेले रुपाजी और मानाजी के साथ त्रंबकका किलेदार भी मदत करता था. अब वो भी नही है. रुपाजी सातारामे है, मानाजीको आपके संभाजी महाराजने कैद कर लिया... अब अगर मुगल फौजोने घेरा कडक किया तो यहां के लोग भूखे मरेंगे... और ये बात आप भी जानते हों...” प्रत्येक वाक्यावर जोर देत अब्दुल करीम बोलत होता. त्याची प्रत्येक गोष्ट खरी होती.

“मंग? काय म्हनतोय नेकनाम खान?” किल्लेदाराचा आवाज खाली आला.

“हुजूरने आपके लिए संदेसा भेजा है, अगर आप किला हमारे हवाले करते हो तो आपको पचास हजार नगद दिये जाएंगे. इसीके साथ आपको बादशहाकी तरफ से तीन हजार की मंसब और खिलत दी जायेगी.” अब्दुल करीमने एकेक आमिष दाखवायला सुरुवात केली.

“ये भी सोच लिजिए... संबाजी आपको कोई वतन नही देगा... लेकीन बादशहा सलामत की मेहेर हुई तो आप वतनदार भी बन सकते हो...” हे वाक्य अब्दुल करीमने उच्चारले आणि किल्लेदाराने वर पाहिले. त्याच्या चेहऱ्यावर रागाची एक रेष दिसली पण अगदीच काही क्षण. त्याने लगेचच स्वतःला सावरले. आता मात्र त्याच्या डोक्यात जबरदस्त विचारचक्र सुरु झाले. कारण शेवटी निर्णय त्यालाच घ्यायचा होता. एकीकडे स्वराज्याशी बेईमानी करून स्वतःचा स्वार्थ साधायचा किंवा स्वराज्याशी इमानदारी करून येणाऱ्या संकटांना सामोरे जायचे. बरे संकटे देखील अशी की त्यात प्रत्येकाची गाठ मृत्यूशी. किल्लेदार विचार करत होता आणि जमीनदार अब्दुल करीम अगदी बारकाईने त्याच्या चेहऱ्याचे निरीक्षण करत होता.

*झुंज : भाग २३ -*

बराच वेळ गेल्यावरही किल्लेदार काही बोलत नाही हे पाहून अब्दुल करीमच्या मनातील चलबिचल वाढू लागली. नेकनामखानामार्फत बादशाहने त्यालाही खिलत, पाचशेची मनसब तसेच दहा हजार नगद स्वरुपात देण्याची तयारी दाखवली होती. आणि हे साध्य होणार होते ते किल्लेदाराच्या एका निर्णयावर.

"आप और अच्छी तरह सोच लिजिए..." अब्दुल करीमचे शब्द किल्लेदाराच्या कानावर पडले आणि किल्लेदार भानावर आला.

"ठरलं..." किल्लेदार उद्गारला.

"बहोत खूब... लेकीन?" अब्दुल करीम गोंधळला.

"तुमी म्हनताय त्ये बरोबर हाये. खानाला आमचा निरोप द्या... त्यांना सांगा... गड त्यांच्या ताब्यात द्यायला आमची तयारी हाये... पर त्ये... आमच्या लोकास्नी तुमी तुमच्या रायतेवानी वागवाया पायजेल..." किल्लेदाराने किल्ला ताब्यात देण्याची तयारी दाखवली आणि अब्दुल करीमच्या चेहऱ्यावर आनंद दिसू लागला.

"माशा अल्लाह... बहोत सही फैसला किया है आपने... आपका संदेसा खांसाबतक पहुंच जायेगा..." असे म्हणत अब्दुल करीम उठला. त्याला ही गोष्ट लवकरात लवकर खानाच्या कानावर घालायची होती. त्याच्या डोळ्यापुढे आता पाचशेची मंसब आणि दहा हजार नगद तेवढी दिसत होती.

दोनच दिवसात किल्लेदाराने गडाच्या किल्ल्या नेकनामखानाच्या हवाली केल्या. खाननेही तत्काळ पन्नास हजार नगद देऊन बादशहाकडून आलेली खिलत किल्लेदाराच्या स्वाधीन केली आणि किल्ल्यावर अनेक वर्षांनी मुगलांचा चांदसितारा फडकला.

या काळात संभाजी महाराजांनी औरंगजेबाच्या नाकीनऊ आणले होते. आणि त्यामुळेच बादशहा खूपच संतापला होता. तेवढ्यात नेकनामखानाचा जासूद आला.

"बोलो..." अगदी रुक्ष स्वरात बादशहा पुटपुटला.

"हुजूर... बहोत अच्छी खबर है..."

"बहोत अच्छी खबर? क्या रामसेज पे अपना चांदसितारा फडका?"

"जी हुजूर..." जासुदाने होकार दिला आणि बादशहाचा स्वतःच्या कानांवर विश्वासच बसेना.

"तुम सच बोल रहे हो?" बादशहाने त्याच्या संशयी वृत्तीने परत विचारले.

"जी हुजूर... नेकनामखानने किलेपर फतेह हासील कर ली..." जासुदाने सांगितले...

"और बताव..." खुशीत येऊन बादशहाने विचारले.

"हुजूर... हमे जंग की जरुरत ही नही पडी... ये काम पेठ के जमिदार अब्दुल करीमने किया... उसने रामशेजके किलेदार को पाचहजार की मनसब और पचास हजार नगद का लालच दिया. उसी के साथ बादशहा की उनपर इनायत होगी ये भी कहां... और फिर खून की एक बुंद गिरेबिना रामशेज अपने कब्जे मे आ गया..." त्याने उत्साहात सांगितले आणि बादशहाचा चेहरा पडला. आपल्या वडिलांनी जसा हा किल्ला लढून जिंकला तसाच तो आपणही जिंकावा हीच त्याची इच्छा होती आणि या

एका गोष्टीमुळे जरी गड त्याच्या ताब्यात आला होता तरी तो फितुरीमुळे. पराक्रमामुळे नाही.

“पता नही ये मरहट्टे कीस मिट्टीसे बने है? एक आदमी जितना इमानदार है, दुसरा आदमी उतनाही बेईमान...” बादशहा तोंडातल्या तोंडात पुटपुटला.

“तुम जाव...” त्याने फर्मान सोडले आणि जासूद माघारी वळला.

आज संभाजी महाराजांचे चित्त खूपच विचलित होते. एकाच वेळेस चार पाच मोहिमांवर त्यांना लक्ष ठेवावे लागत होते. कुठे मराठी सैन्य कमी पडू लागले तर त्यांच्यासाठी ज्यादा कुमक पाठवणे, कुठे रसद पाठवणे तर कुठे स्वतः हातात तलवार घेऊन मराठा शिलेदारांच्या मदतीला जाणे. एक क्षणही त्यांना निवांतपणा तो काय मिळत नव्हता. त्यांच्या मनात गोव्यातील मोहिमेबद्दल विचार चालू होते आणि हुजऱ्या काहीसा धावतच आत आला. आल्या आल्या त्याने राजांना मुजरा केला.

“काय खबर आहे?” छत्रपतींनी विचारले.

“म्हाराज, घात झाला... सरनौबत हंबीरराव कामास आले...” त्याने बातमी दिली आणि छत्रपतींच्या पायातील त्राणच गेल्यासारखे त्यांना झाले.

“काय?” महाराजांचा आपल्या कानावर विश्वासच बसेना.

“जी म्हाराज... त्यांनी पराक्रमाची शर्थ केली पन त्यास्नी गोळा लागला अन...” जासूद बोलायचे थांबला.

“जगदंब...” काहीशा हताश वाणीने छत्रपती उद्गारले. या धक्क्यातून ते स्वतःला सावरतात न सावरतात तोच नाशिकहून खबऱ्या नवीन खबर घेऊन आला. पाच वर्षे अगदी शौर्याने लढलेला रामशेज फितुरीने मोगलांच्या हाती गेला होता. छत्रपतींचे रक्त तापले पण घटना घडून गेली होती.

रामशेज मुगलांच्या हाती जाऊन १५ दिवस झाले असतील तोच रामशेजचा किल्लेदार पन्नास हजाराची थैली घेऊन राजांपुढे हजर झाला.

*झुंज : भाग २४ ( अंतिम ) -*

आपल्या समोर किल्लेदाराला पाहताच छत्रपतींच्या चेहऱ्यावर नापसंतीची एक पुसट रेषा उमटली. किल्लेदारालाही या गोष्टीची चांगलीच कल्पना होती.

“बोला किल्लेदार... याच साठी का आम्ही तुमची रामशेजवर नियुक्ती केली?” काहीशा नापसंतीने महाराजांनी विचारले.

“माफी असावी म्हाराज... पन किल्ल्यावरील रसद संपत आली व्हती. किल्ल्यावरील लोकंबी हवालदिल झाले. आन रयतेचा इचार करून मला ह्यो निर्नय घ्यावा लागला. तरी पन तुमाला यात आमी कसूर केली असे वाटत असेल तर तुमी द्याल ती शिक्षा मला काबुल हाये...” आपल्या हातातील पन्नास हजारांची थैली महाराजांच्या शेजारी उभ्या असलेल्या कारकुनाकडे सोपवत किल्लेदार हात बांधून उभा राहिला. महाराजांनी त्याच्या चेहऱ्याकडे एकदा रोखून पाहिले आणि किल्लेदार खरे बोलतो आहे याची त्यांना मनोमन खात्री पटली.

“ठीक आहे... झाले ते झाले... काही वेळेस माघार घेणेही गरजेचे असते. लवकरच तुम्हाला नवीन मोहिमेवर पाठवले जाईल. तो पर्यंत विश्राम करा...” इतके बोलून राजांनी किल्लेदाराबरोबरचे संभाषण संपवले.

इकडे बादशहा मात्र खूपच खुश होता. त्याच्या मार्गातील सगळ्यात मोठा काटा, हंबीरराव एकाएकी नाहीसा झाला होता. नाशिक आणि बागलाण प्रांतातील बराचसा प्रदेश मुगल राजवटीत सामील झाला होता. विजापूर आणि गोवळकोंडा मुगली अमलाखाली आले होते. आणि त्यातच अनेक वर्ष झुंजून देखील हार न जाणारा रामशेज त्याच्या ताब्यात आल्यामुळे ही आपल्यावर अल्लाची मेहेर असल्याची भावना बादशहामध्ये रुजली. रामशेज आपल्या ताब्यात येणे म्हणजे अल्लाची रेहमत म्हणून या गडाचे नांव रहीमगड असे बदलण्यात आले. या किल्ल्यावरून बादशहाला नाशिक, बागलाण, अहमदनगर, ठाणे आणि औरंगाबाद या सगळ्याच प्रांतावर लक्ष ठेवणे सोपे जाणार होते. तसेच हा किल्ला दिसायला जरी लहान असला तरी किती चिवट झुंज देऊ शकतो याचा त्याला चांगलाच अनुभव आला होता. त्यामुळेच या किल्ल्याला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले.

एक महिन्यापेक्षाही कमी कालावधीत रामशेजचा कायापालट झाला. पडझड झालेल्या भागांची नव्याने बांधणी केली गेली. गडावर दारुगोळा मुबलकप्रमाणात उपलब्ध करून दिला गेला. जवळपास २० एक लहान मोठ्या तोफा गडावर तैनात करण्यात आल्या आणि बादशाही अमलास सुरुवात झाली.

या प्रत्येक गोष्टीची माहिती संभाजी महाराजांचे हेर त्यांच्यापर्यंत पोहोचवत होते.

आणि एक दिवस छत्रपतींनी किल्लेदारास बोलावणे पाठवले. दोनच दिवसात किल्लेदार छत्रपतींसमोर हजर झाला.

“या किल्लेदार... आज तुम्हाला मोहिमेवर निघायचे आहे.” महाराजांनी सुरुवात केली.

“आज्ञा म्हाराज... मोठ्या मनाने तुमी आमच्या चुका पदरात घेतल्यात. आता स्वराज्याच्या कार्यात कोनतीबी कसूर व्हायाची नाई...” किल्लेदाराचा हात तलवारीकडे गेला.

“तुम्हाला रामशेज ताब्यात घ्यायचा आहे... पण आता रामशेज पूर्वीपेक्षा बलाढ्य बनला आहे हेही लक्षात असू द्या...” महाराजांनी फर्मावले आणि किल्लेदाराचा चेहरा खुलला. आपल्यावर लागलेला फितुरीचा डाग धुवून काढण्याची नामी संधी किल्लेदाराकडे चालून आली.

“काळजी नसावी म्हाराज... मावळा गडी काय चीज हाये त्येच बादशहाला दाखिवतो...” असे म्हणून त्याने महाराजांचा निरोप घेतला.

बरोबर अगदी मोजकेच ३०० स्वार घेऊन किल्लेदार रामशेजच्या दिशेने निघाला. काहीही झाले तरी ही संधी सोडायची नाही अशी त्याने जणू प्रतिज्ञाच केली होती.

रहीमगडावरील बादशहाचा किल्लेदार अगदीच बेसावध होता. एकतर जो किल्ला फितुरीने आपल्याकडे आला त्यावर इतक्या लवकर आक्रमण होईल हे त्याला स्वप्नात देखील वाटत नव्हते. समजा तसे झाले तरी जवळपास एक हजाराची शिबंदी बादशहाने गडावर ठेवली होती. लहान मोठ्या अशा २० तोफा आणि मुबलक दारुगोळा याच्या जोरावर या किल्ल्याकडे पाहण्याचे कुणाचे धाडस होणार नाही असेच तो समजून होता.

रात्रीच्या किर्र अंधारात मराठा सैन्याची तुकडी गडाचा डोंगर चढत होती. स्वतः किल्लेदार सर्वात पुढे राहून या तुकडीचे नेतृत्व करत होता. तटबंदीखाली येताच किल्लेदाराने सगळ्यांना सूचना द्यायला सुरुवात केली. अगदी मोजक्या शब्दात सगळ्या सूचना दिल्या गेल्या आणि गडावर दोर फेकले गेले. ते व्यवस्थित अडकले आहेत याची खात्री केली गेली आणि काही जण तटबंदी चढू लागले.

तटबंदीजवळ पोहोचताच सगळ्यात आधी प्रत्येकाने कोणता आवाज तर होत नाही याचा कानोसा घेतला. नंतर हळूच एकेक डोके तटबंदी पलीकडे पाहू लागले. सगळीकडे भयाण शांतता पसरली होती. पहाऱ्यावरील सैनिक काही जण अर्धवट पेंगत होते. कित्येक जण तर तलवार बाजूला ठेवून चक्क झोपले होते. गडावर मशालींचा अगदी मंद उजेड दिसत होता. सैनिकाने हळूच इशाऱ्याचा आवाज केला आणि उरलेल्या तुकडीने भराभर दोराने वर चढायला सुरुवात केली.

संपूर्ण तुकडी गडाच्या तटबंदीवर पोहोचली तरीही मुगल सैन्याला त्याचा सुगावा लागला नाही. सगळे जसे वर आले तसा हर हर महादेवचा गजर आसमंतात घुमला. आपल्या समोर इतके मराठी सैन्य पाहून खडबडून जागे झालेले मुगल सैनिक पुरते भांबावले. त्यातील काहींनी आपल्या तलवारी उचलल्या पण त्या म्यानातून बाहेर काढण्याचीही संधी त्यांना मिळाली नाही. एकेका वारासरशी एकेक शीर धडावेगळे होऊ लागले. डोळे चोळत उठलेल्या सैनिकांना समोरचे दृश्य पाहून थंडीतही घाम फुटला.

“भागो... भागो... दगा... या अल्ला... काफिर आया...” या आणि अशा अनेक वेगवेगळ्या आरोळ्या आणि त्याच बरोबरील किंकाळ्यांनी आसमंत दणाणून गेला. मुगल किल्लेदार या सगळ्या प्रकाराने जागा झाला. हातात शमशेर घेऊन तोही सैन्याच्या समोर आला. तो पर्यंत गडावरील जवळपास दोनशे मुगल सैनिक गारद झाले होते. कित्येकांनी तर मरहट्टयांना खरेच भूत वश आहेत असा समज करून घेतला होता. उरलेल्या मुगल सैन्याने हा हल्ला परतवून लावण्याचा नेटाने प्रयत्न केला पण मावळ्यांच्या जोरापुढे त्यांचे काहीही चालेना. आणि त्यातच अघटीत घडले. किल्लेदाराचा एक भयंकर वार अंगावर झाल्याने मुगल किल्लेदार धारातीर्थी पडला आणि मुगल सैन्याचा प्रतिकार संपला. या लढाईत जवळपास १०० एक मावळेही वीरगतीला प्राप्त झाले पण तो पर्यंत किल्लेदाराने गडाचा ताबा घेतला.

सूर्य उगवल्याबरोबर गडावर शिवरायांच्या स्वराज्याची भगवी पताका फडकू लागली. एक दूत संभाजी महाराजांकडे ही शुभवार्ता देण्यास रवाना झाला.

औरंगजेब बादशहाला जेव्हा हे वर्तमान समजले त्यावेळेस त्याचा चेहरा पाहण्यासारखा झाला. जो किल्ला कोणतीही साधने नसताना पन्नास हजाराची फौज पाठवूनही त्याला ५ वर्षे घेता आला नाही तोच किल्ला संभाजींच्या अवघ्या ३०० शिलेदारांच्या तुकडीने फक्त एका रात्रीत पराक्रमाची शर्थ करत परत जिंकून घेतला. बातमी ऐकल्या बरोबर त्याच्या संतापाचा पारा चढला. पण चिडून काहीही होण्यासारखे नव्हते. त्याच्या चेहऱ्यावर निराशेचे भाव स्पष्ट दिसून येऊ लागले.

“या परवरदिगार... ये मरहट्टे कीस मिट्टीसे बने है?” तोंडातल्या तोंडात शब्द पुटपुटत बादशहा खाली बसला.

आणि रामशेज मात्र पुढील १३० वर्षांसाठी सुरक्षित झाला होता.

*समाप्त*